विरोधकांचा बालेकिल्ला पुणे.

२१।१।६७

४० पैसे

# माणूस

साप्ताहिक





“ बाळ, तुझे उपोषण कशासाठी चालू आहे ? ”




एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : एकूणतिसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

संपादक मंडळ
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

व्यवस्था विभाग
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९९ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७४५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्रमैत्री

स. न. डिसें. २५

आपला 'माणूस' अंक (दिवाळी) प्रथमतःच हातात पडला. ओबडधोबड व थोडासा विचित्रच वाटला. पण अंतर्मुख होऊन तो वाचला. अत्यंत उद्बोधक वाटला. बुद्धीला चालना देणारा असून ज्ञानवृद्धीसाठी त्याचा उपयोग सातत्याने झाल्याशिवाय राहणार नाही. तेथून पुढे मी 'माणूस' अंकाचा वर्गणीदार झालो, तो आतापर्यंत. प्रत्येक आठवडयास अंक कधी हातात मिळतो याची वाट पाहत बसतो. अंकातील विशेष आकर्षण म्हणजे 'दिल्ली दरबार.' हे सदर मनाची पकड घेते. ज्या बारीक सारीक दिल्लीच्या हालचाली त्या येथे नमूद केल्या जातात. त्यामुळे आतील गोटातील खळबळजनक बातम्या आपोआपच वाचकांस विदित होतात. हे सदर थोडे विस्ताराने असावे.

त्याचप्रमाणे 'मुक्ताफळे,' 'विचारवारे', 'नाटच व पुस्तक परीक्षण', 'आस्वाद' व निरनिराळचा थरांतील विषयांवरील निवडणूक संवाद ही सदरेसुद्धा अत्युत्तम आहेत. त्याबद्दल तिळमात्र शंका नाही. आपण श्री. दयानंद बांदोडकर, कृष्ण मेनन, श्री आद्य शंकराचार्य यांची दुर्मिळ चरित्रे थोडक्यात देऊन तुम्ही वाचकांच्या ज्ञानात भरच घातली आहे. तरी येथून पुढे अशीच दुर्मिळ चरित्रे थोडक्यात देण्याची पूर्वीप्रमाणेच प्रथा चालू ठेवावी.

सो. मा. मोरे,
शिक्षक–कान्हाटी,
ता. बारामती

# इंदिराजींना वाढता पाठिंबा का ?

आगामी सार्वत्रिक निवडणुका ठरल्याप्रमाणे पार पडणारच. नवे गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी नुकतेच जाहीर केल्यामुळे या निवडणुकीसंबंधी राजधानीत वारंवार ज्या अफवा उठत असत व जे अंदाज व्यक्तविले जात असत त्यांना पायबंद बसला आहे. अशांत अंतर्गत परिस्थितीचे किंवा काही तरी तत्सम निमित्त पुढे करून सरकार निवडणुकांचा कार्यक्रम तूर्त तरी स्थगित करील, अशी शंका सर्वच राजकीय गोटात कमी अधिक प्रमाणात व्यक्त केली जात होती. राजगोपालाचार्य किंवा राम मनोहर लोहिया यांच्यासारख्या चाणाक्ष जाणकारांनीही ही शंका उघडपणे व्यक्त केली होती. यामुळे निवडणुकांसंबंधी एकप्रकारची अस्थिरता निर्माण झाली होती. गृहमंत्र्यांनी हा खुलासा केल्यामुळे ही अस्थिरता दूर झाली आहे. आता तर राष्ट्रपतींनी निवडणुकांचा राज्यवार कार्यक्रमही जाहीर केला आहे. ही अनिश्चितता दूर झाल्यामुळे या निवडणुका 'शांततेने' पार पडतील किंवा नाही यासंबंधी आता शंका घेण्यात येऊ लागली आहे.

ही शंका ध्यानात घेऊनच श्री. चव्हाण यांनी प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांची एक बैठक येथे बोलाविली होती. निवडणुकीच्या संदर्भात सर्व राजकीय पक्षांनी कोणती पथ्ये पाळावयाची याचा विचार करून एक आचारसंहिता तयार करणे हा या बैठकीचा उद्देश होता व त्याप्रमाणे या बैठकीत तशी संहिता तयार करण्यात आली. परंतु उजवा व डावा कम्युनिस्ट पक्ष आणि संयुक्त समाजवादी पक्ष यांच्या नेत्यांनी या बैठकीवर हे ना ते कारण सांगून बहिष्कार टाकला होता. काँग्रेस पक्ष आपल्या निर्विवाद बहुसंख्येच्या बळावर लोकशाही संकेत धुडकावून लावतो अशी टीका करणारे डावे पक्षही लोकशाहीची किती बूज राखतात असा प्रश्न या बहिष्कारामुळे येथे विचारला जात आहे. अर्थात् लोकशाही संकेतांची जपणूक करण्याची सर्वाधिक जबाबदारी राज्यकर्ता पक्ष या नात्याने काँग्रेसवर येते हे मान्य करावयास हवेच. प्रधानमंत्री इंदिरा गांधी काँग्रेस पक्षाच्या निवडणूक प्रचारासाठी जाताना हवाईदलाच्या विमानाचा वापर करतात यावर लोहियांनी टीका केली आहे ती यामुळेच. मंत्र्यांच्या बाबतीतही असा संकेतभंग झाल्याचे दिसून येते. सरकारी गाड्या व सरकारी नोकरवर्ग वापरून मंत्र्यांचे प्रचाराचे दौरे चालू असतात हे दृश्य केवळ दिल्लीतच नव्हे तर सर्वच ठिकाणी कमीअधिक प्रमाणात दिसून येते.

येत्या निवडणुकीत काँग्रेसचे बहुमत सध्यापेक्षा कमी होईल याविषयी कोणालाच

शंका नाही. विरोधी पक्षांच्या बळापेक्षा काँग्रेसमधील अंतर्गत फूटच या घटनेला कारणीभूत ठरणार आहे ! त्यामुळे भारताचे भावी सरकार किती स्थिर व किती प्रागतिक स्वरूपाचे असेल याविषयी येथे अनेक अंदाज बांधण्यात येत आहेत. केवळ केंद्रीय वा राज्यांतील मंत्रिमंडळे या दृष्टीनेच या प्रश्नाचा विचार न करता लोकसभेमध्ये व विधानसभांमध्ये कोणत्या पक्षाचे व त्या पक्षातील कोणत्या गटाचे उमेदवार बहुमताने निवडून येतात हेही महत्त्वाचे ठरते.

संसदेच्या मागील दोन अधिवेशनांमध्ये काँग्रेसपक्षीय सदस्यही स्वपक्षीय सरकारच्या मागे उभे न राहिल्यामुळे विरोधकांनी मंत्र्यावर जेव्हा टीकास्त्रे सोडली, तेव्हा त्यांची किती त्रेधातिरपीट उडाली हे ज्यांनी पाहिले आहे त्यांना मंत्र्यांइतकेच लोकप्रतिनिधींचे महत्त्व कळून आले. इंदिरा गांधी यांचे मंत्रिमंडळ तर एकजुटीच्या दृष्टीने इतके दुबळे आहे की एखाद्या विशिष्ट मंत्र्यावर मधु लिमये किंवा भूपेश गुप्ता हल्ला चढवीत असताना त्या गटाबाहेरचे मंत्री आपल्या विश्वासातील पत्रप्रतिनिधींजवळ आनंद व्यक्त करीत होते. " माझ्या खात्यात मी कोणाचा हस्तक्षेप सहन करणार नाही हे मी इंदिराजींनादेखील बजावले आहे, " असे उद्‍गार अनेक मंत्री आपल्या परिचितांजवळ काढीत असत. आगामी निवडणुकीनंतर कोणताही गट प्रभावी झाला तरी प्रधानमंत्रिपद इंदिरा गांधी यांच्याकडेच राहण्याची शक्यता आहे, असे जे मी मागे म्हटले होते त्याचे मुख्य कारण म्हणजे इंदिराजींचे आपल्या मंत्र्यांच्या बाबतीतील हे सैल धोरण आणि हळूहळू त्या दृष्टीने घोषणाही होण्यास प्रारंभ झाला आहे. प्रधानमंत्रिपदाची निवडणूक आपण लढविणार आहोत, असे इंदिरा गांधींनी काही दिवसांपूर्वी पत्रकारांना मुलाखत देताना सांगून टाकले. त्यानंतर आता आपण इंदिरा गांधी यांनाच पाठिंबा देऊ असे, गृहमंत्री श्री. चव्हाण यांनी जाहीर केले आहे. इंदिरा गांधी विरुद्ध मोरारजी देसाई असा सामना होणार हे उघडच आहे. असे असताना व प्रत्यक्ष निवडणुकीलाही महिना–दीड महिना अवधी असताना प्रत्येक शब्द सावधगिरीने बोलणाऱ्या यशवंतरावांनी आपली म्हणजेच पर्यायाने महाराष्ट्रातल्या पन्नास-साठ सदस्यांची मते इंदिरा गांधी यांच्या मत–पेटीत टाकली जातील, हे आगाऊ जाहीर करण्याने आपल्या पावलांची पुढची दिशा निश्चित केली आहे. इतर मंत्री व काही राज्यांचे मुख्यमंत्री यांच्याकडूनही हेच मनोगत व्यक्त केले जात आहे. खातेवाटप होताना मोक्याची खाती आपल्याकडे राहावीत किंवा यावीत, या हेतूने आगाऊ पाठिंबा जाहीर करणे सोयीस्कर ठरत असावे.

प्रधानमंत्रिपदाच्या निवडणुकीबाबत राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना जे विशेष महत्त्व आले आहे, त्यामुळे केंद्रसत्ता किती दुबळी झाली आहे हे दिसून येते. नेहरूंच्या काळात केंद्रीय नेतृत्वासंबंधी मुख्यमंत्री चकार शब्दही बोलत नसत. आज मात्र परिस्थिती नेमकी उलटी झाली आहे. जी राज्ये आर्थिकदृष्ट्या प्रगत आहेत किंवा जी ' धान्य-

दृष्टया शिलकीचे प्रदेश ' आहेत, अशा राज्यांनी मुख्यमंत्री वर दिल्लीला आले की अतिशय अरेरावीने वागतात. म्हणूनच काही राजकीय निरीक्षकांच्या मते राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचे सध्याचे अवास्तव महत्त्व वाढले आहे, ते कमी करण्याचे सामर्थ्य असलेली व्यक्ती प्रधानमंत्रिपदावर निवडून येणे आवश्यक आहे. भारताच्या सर्व विभागांची प्रगती व्हावी व सर्व राज्यांमध्ये एकात्म मनोभूमिका निर्माण व्हावी, असे ज्यांचे मत आहे त्यांचा कणखर प्रधानमंत्र्याला पाठिंबा राहील. परंतु काँग्रेस पक्षात आज तरी अशा व्यक्ती अगदी मोजक्या आहेत. राज्यांचा मोहब्बतीवर केंद्र-सत्तेने झुलावे, असा आग्रह धरणाऱ्यांचाच काँग्रेस पक्षात सुकाळ झाला आहे. मग तो काँग्रेसवाला डावा असो किंवा उजवा असो.

**' माणूस ' पाहून मतदान**

अशा परिस्थितीत मतदारांचे कर्तव्य कोणते हा प्रश्न उभा राहतो. मतदारांनी पक्षाची कसोटी न मानता उमेदवाराची वैयक्तिक पात्रता ध्यानात घेऊनच मतदान करावे, अशी सूचना येथे भरलेल्या राजकीय विचारवंतांच्या बैठकीत करण्यात आली आहे. आपल्या संकुचित प्रादेशिक हितसंबंधांपेक्षा साऱ्या भारताचे हित, स्थैर्य आणि प्रगती यांवर ज्याचा भर आहे व मूलतः ज्याची लोकशाही संकेतावर श्रद्धा आहे अशा चारित्र्यसंपन्न उमेदवारास निवडून देणे एवढेच मतदार म्हणून आपले कर्तव्य ठरते. हा विचार केवळ राजधानीतीलच नव्हे तर इतर प्रमुख शहरांतील सुशिक्षित तरुण वर्गामध्ये बळावत चालला आहे. दर पाच वर्षांनी जागी होणारी लोकशाही जर सदैव जागृत ठेवावयाची असेल तर, उमेदवारांची वैयक्तिक कसोटीवर निवड करणे हाच एक पर्याय या महान लोकसत्ताक राष्ट्रातील मतदारांना उपलब्ध आहे.

निवडणुकीचा विचार चालू असताना राजधानीतील सरकारी प्रवक्त्यांना देशात घडणाऱ्या हिंसक वा सामुदायिक निदर्शनांचीही दखल घ्यावी लागत आहे. प्रथम विद्यार्थ्यांचे, नंतर शिक्षकांचे व आता सरकारी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरू झाले आहे. अर्ज विनंत्या करून आपली बहिरी आणि आंधळी लोकशाही दखल घेत नाही असे आढळून आल्यामुळेच अशा सामुदायिक निदर्शनांचा मार्ग चोखळला जातो व शेवटी या असंतोषाचा फायदा समाजद्रोही प्रवृत्ती घेतात. परंतु या परिस्थितीची जबाबदारी आजच्या आपल्या सरकारी धोरणावरच पडते. परिस्थितीचे दडपण पडल्याखेरीज प्रश्नांचा विचार करावयाचा नाही असा इथला रिवाज आहे. शंकराचार्यांच्या मागे संघटित लोकमत नाही म्हणून त्यांची उपेक्षा करावयाची आणि अकाली समाजाच्या दडपणाला बळी पडून फत्तेसिंगांची आर्जवी करावयाची असा हा मामला आहे. शंकराचार्यांनी अनुसरलेला उपोषणाचा मार्ग उचित की अनुचित हा प्रश्न वेगळा. परंतु या उपोषणाची दखल न घेण्याइतकी बेपर्वाई सरकार का दाखवते याचे उत्तर सोपे आहे.

## फुटिरांचे आव्हान

केंद्र सरकारचे 'दुबळयाला लाथा व समर्थांस माथा' हे धोरण ध्यानात घेऊनच 'बंडखोर नागा' भारतीय संघराज्यातून फुटून निघण्याची भाषा येथे राजधानीत येऊन बोलू शकतात. नागांच्या पाठोपाठ मिझो आदी आसाममधील आदीवासी जमातीनीही आसामपासून फुटून निघण्याच्या प्रश्नावर आंदोलन उभारण्याची व त्यासाठी निवडणुकांवर बहिष्कार घालण्याची धमकी दिली आहे. नागा बंडखोरांशी वाटाघाटी आटोपून इंदिरा गांधी निवडणूक प्रचाराच्या दौऱ्यावर गेल्या व दौऱ्यावरून परत येताच मिझो-नेत्यांशी त्यांनी चर्चा केली. पूर्व सीमेवरचे हे बंड मोडून काढण्यासंबंधी जे कणखर धोरण स्वीकारावयास हवे त्याचाच येथे अभाव आहे. एक तज्ज्ञ लष्करी निरीक्षक म्हणतात की नागा, मिझो आदी बंडखोरांबावत सरकारचे धोरण चुकीचे आहे असे नसून याबाबत सरकारला कोणते धोरणच नाही ही वस्तुस्थिती आहे.

नागा मिझोप्रमाणे मास्टर तारासिंगांनी भारतीय संघराज्यात उत्तर राज्यापेक्षा खास दर्जा मागणाऱ्या स्वतंत्र शिखीस्तानचा पुकारा केला आहे. तर द्रविड मुन्नेत्र कळघमच्या अण्णा दुराईंनी स्वतंत्र द्रविडीस्तानसाठी दंड थोपटले आहेत. नागालँड, मिझोरॅम, द्रविडनाडू आणि शिखीस्तान या भारतीय संघराज्याच्या एकात्मतेला आव्हान देणाऱ्या मागण्यांबाबत सरकार प्रारंभापासून वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारीत आहे. आणि मधल्या काळात या फुटीर प्रवृत्ती अधिक जोरकस होत आहेत. आगामी निवडणुकीनंतर अधिकारावर येणाऱ्या सरकारला प्रथम लक्ष केंद्रित करावे लागेल ते या फुटीर प्रवृत्तींकडेच.

चीनमधल्या अंतर्गत यादवीची नेमकी काय परिस्थिती आहे याची अधिकृत माहिती येथे अद्यापही उपलब्ध झालेली नाही. चीनचे राष्ट्राध्यक्ष लिऊ शाओ चि आणि कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष माओ-त्से-तुंग यांच्यांतील सत्तासंघर्ष शिगेला पोहोचला असून शांघाय, नानकिंग, कँटाना, पेकिंग आदी शहरांत दंगली सुरू झाल्या आहेत एवढेच वृत्त येथे आले आहे. या बातम्यांना भरपूर प्रसिद्धी देण्याच्या सूचना परराष्ट्रखात्याने आकाशवाणीला व सरकारी प्रसिद्धी खात्याला दिल्या आहेत. चीनमधल्या या यादवीत कोणता गट यशस्वी ठरतो हे आज कोणालाच सांगता येणार नाही. शिवाय या दोन्ही गटांच्या भारतविरोधी धोरणात फारसा बदल होणार नाही. त्यामुळे या सुंदोपसुंदीबाबत भारत सरकारचे धोरण एवढेच आहे की हा संघर्ष असाच चालू राहावा. अंतर्गत भांडणात गुंतल्यामुळे चीनच्या विस्तारवादाला आपोआपच आळा बसेल. भारतासारख्या शेजारी राष्ट्राला या अंतर्गत यादवी युद्धामुळे दिलासा मिळतो तो एवढाच.

●

**– सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळे



## □ नंदीपुढचा शंकराचार्य !

जसजशी निवडणूक जवळ जवळ येत आहे व देशावर राज्य करण्याची चौथी पंच-वार्षिक 'कॉंग्रेस' योजना यशस्वी होणार, अशा बातम्या सर्व भारतातून येत आहेत, तसतसा कॉंग्रेसच्या नेत्यांना येनकेन प्रकारेण बदनाम करण्याचा प्रयत्न विरोधी पक्ष व वृत्तपत्रे करीत आहेत. परवा पाटण्याला गोळीबार होऊन नऊ विद्यार्थी ठार झाले, शेकडो जखमी झाले व एकंदर पाटणा पेटले. विद्यार्थ्यांच्या दंगलीची ही क्षुल्लक बातमी वृत्तपत्रांनी केवढाले मथळे देऊन प्रसिद्ध केली ! 'आंतरराष्ट्रीय वृत्तपत्रसंस्थे'च्या विद्यमाने झालेल्या खान्याच्या वेळी भाषण करताना पंतप्रधान इंदिराजी यांनी दिल्ली येथे नुकतेच तरी बजावले होते—

"जर विद्यार्थ्यांच्या दंगलींना वृत्तपत्रे देतात तेवढी प्रसिद्धी मिळाली नसती व ज्या पद्धतीने बातमी दिली जाते ती त्या पद्धतीने दिली गेली नसती तर विद्यार्थ्यांच्या दंगली देशभर पसरल्या नसत्या."

पंतप्रधानांचा उपदेश इतर देशांत वृत्तपत्रांनी मानला नसता तर संपादकांच्या माना छाटल्या गेल्या असत्या. परन्तु इंदिराजींच्या सौजन्याचा ही वृत्तपत्रे अंत पाहत आहेत. एकतर वृत्तपत्रांनी पाटण्याची बातमीच द्यायला नको होती, कारण आता-पर्यंत दिलेल्या प्रसिद्धीने देशभर दंगल पसरलीच आहे. आता अधिक प्रसिद्धीने ती शेजारपाजारच्या देशांत पसरण्याचा धोका निर्माण झालेला आहे. बरं, बातमी द्यायचीच होती तर नुसतेच 'पोलिसांच्या कोपामुळे नऊ विद्यार्थी घरी परत जाऊ शकले नाहीत,' अशी द्यायची. यामुळे बातमीचे सत्य व पावित्र्य राहून शिवाय विद्यार्थी मेले हे कुणाला कळले नसते ! बातम्यांविषयी हे तारतम्य का पाळा-वयाचे, याचाही खुलासा इंदिराजींनी केला होता. त्यांनी सांगितले होते—"भारत सध्या फार मोठी लढाई लढत आहे. गरिबी, मागासलेपणा, भ्रामक समजुती व अज्ञान यांविरुद्ध आपण विजयी होऊ तरच हा देश वाचेल."

हजरत बाल प्रकरण किंवा स्वर्गस्थ नेहरूंच्या लिखित इच्छेविरुद्ध त्यांचे केलेले क्रियाकर्मान्तर या गोष्टी या सुरू झालेल्या मोठ्या लढाईत बसत नाहीत ही गोष्ट खरी. परंतु कसलीही लढाई लढायला आधी निवडणुकीची 'लढाईतली लढाई' करावी लागते. तेव्हा निवडून यायला सोपे जावे म्हणून कधी कधी भ्रामक समजुती व अज्ञान यांच्याशीही जमवून घ्यावे लागते. परंतु एकंदर लढाई ही गरिबी, मागासलेल्या व भ्रामक समजुती यांच्याविरुद्ध आहे ही गोष्ट '**जनतेने**' विसरता कामा नये !

म्हणून तर पुरीच्या शंकराचार्यांचा राग एकीकडे सहन करीत करीत इंदिराजींना एकीकडे श्रृंगेरीच्या शंकराचार्यांचा प्रसाद घेण्याचे नाटक करावे लागते ! व त्याच्या छब्याही वृत्तपत्रांतून प्रसिद्ध कराव्या लागतात. १२ नोव्हेंबर १९६६ या दिवशीच्या 'हिंदुस्थान टाईम्स'मधली प्रसादग्रहणाची छबी तुम्ही अवश्य पाहा ! निदान 'टाईम्स ऑफ इंडिया'मधील १२–११–६६ ची राष्ट्राध्यक्ष–शंकराचार्य छबी तरी पाहाच पाहा ! आता श्रृंगेरीच्या शंकराचार्यांचा प्रसाद घेतला तोच द्वारकेचे शंकराचार्य म्हणतात की, "मी असंतुष्ट आहे." असा नाहीतर नसा ! तुम्हांला प्रसाद द्यायचा असला तर घेऊ, उपदेश नको.

आता गोवधबंदीसाठी केन्द्र सरकारने साधकबाधक विचार करून निर्णय घेण्यासाठी कमिशन नेमण्याची तयारी दाखविली आहे. म्हणजे ज्या राज्य सरकारांनी साधकबाधक विचार न करता संपूर्ण गोवधबंदी स्वीकारली, त्यांना "आपण हा काय मूर्खपणा केला" हे कळून येईल व त्यांच्या मागासलेपणावर हा उतारा योग्य लागू होईल. केन्द्र सरकारला न विचारता अज्ञानी साधुजनांच्या दबावाखाली गोवधबंदी करणाऱ्या राज्य सरकारला ताळ्यावर आणण्यासाठी ही चतुर योजना केलेली असताना वृत्तपत्रांची आपली टीका चालूच आहे–की सरकार हे उपोषणांना व आत्माहुतीच्या धमक्यांना घाबरते.

उपोषण करून सरकारने घेतलेले विचारपूर्वक निर्णय बदलायला शंकराचार्य किंवा फत्तेसिंग हे काय महात्माजी आहेत ! उपोषणाच्या दडपणाखाली भारत सरकारने पाकिस्तानला ५५ कोटी रुपये दिले––तो प्रसंग पहिला व शेवटचा ! आता ब्रह्मदेव जरी खाली आला व म्हणाला—उपोषण करतो किंवा जाळून घेतो तरी केन्द्र सरकार नमणार नाही. निदान पुढच्या बाजूने !

मागासलेल्या व भ्रामक समजुती यांच्याविरुद्ध हा लढा आहे. चारही शंकराचार्यांविरुद्ध हा लढा आहे. खरा शंकर म्हणजे काँग्रेस, खरा नंदी म्हणजे मतदार. हा नंदी जोपर्यंत आपल्या आईच्या हंबरड्याने जागा होत नाही, तोपर्यंत या शंकराचार्यांना विचारतो कोण ?

# □ अस्सल विनोद आणि तमाशा

औरंगाबाद येथे मराठी तमाशा परिषदेचे पाचवे अधिवेशन नुकतेच भरले. या अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांनी केले. त्यांनी भाषणात सांगितले.

"तमाशातील विनोद हा अस्सल विनोद असतो. शिवाजीच्या काळात ज्या-प्रमाणे तमाशाने लोकांत चैतन्य निर्माण केले, त्याप्रमाणे स्वातंत्र्य-काळात जनतेत तमाशाने देशभावना निर्माण करावी," (सकाळ दि. ६–१–६७).

शिवाजीच्या काळातील हा अस्सल विनोदी तमाशा, अधिवेशनाचे अध्यक्ष सोपानदेव चौधरी यांना ठाऊक नसावा हे दुर्दैव होय! ते आपल्या अत्यंत रसाळ व अभ्यासपूर्ण भाषणात सांगतात –

"पेशवाईच्या अखेरीस तमाशाचा उगम झाला. त्या वेळी लावणीकारांना व तमा-शाला राजाश्रय लाभला."

अरे तिच्या! मग शिवाजीच्या काळातल्या तमाशाचे काय? सोपानदेवा, ज्ञाने-श्वरांना का नाही कन्सल्ट करीत? शिवाजीच्या काळातील तमाशाने आपले देश-भावना निर्माण करण्याचे कार्य अविरत चालू ठेवले असते तर पेशवाई जाती ना. इंग्रज येते! ना मग कुठले महात्माजी आणि कसले काय?

तमाशाने देशभावना निर्माण करावी असे, दे. भ. बाळासाहेब यांनी सांगितल्या-बरोबर, 'मग तमाशा कोण करणार?' हा यक्षप्रश्न सोपानदेवांना पडला व त्यांनी गर्जना केली–

"तमाशा हा तमाशाच राहिला पाहिजे." आता तमाशा हे जर कष्टकरी-काम-करी गरीब जनतेचे करमणुकीचे एकमेव साधन असेल, तर तमाशा तमाशाच राहण्यासाठी बरीच जनता कायमची गरीब, कष्टकरी व कामकरी ठेवण्याचे काम कुणीतरी केलेच पाहिजे!"

सोपानदेव, म्हणतात आजच्या पिढीतला अस्सल लावणीकार म्हणजे ग. दि. माडगूळकर! माडगूळकर काँग्रेसमध्ये आले, कांग्रेसचे आमदार झाले याचे अनेकांना वाईट वाटते. परंतु लावणीकारांना पेशवाईच्या अखेरीस राजाश्रय लाभला ही गोष्ट कुणी नजरेआड करू नये. पेशवाईच्या अखेरीस घडलेल्या इतिहासाची पुनरावृत्ती झाली तर इतरांनी नाके का मुरडावी?

– ग्यानबा

●

# काय करायचं ते विलेक्षन न् फिलेक्षन

(पुण्यातील सुशिक्षित मध्यमवयीन घरांमध्ये भांडी घासण्याची कामे करणारी मध्यमवर्गीय मोलकरीण. सात–आठ घरी कामे करून पोटापुरते मिळवते. नवराही मिळवता. धुतलेली भांडी ठेवून लगबगीने पदराला हात पुशीत परत जात असताना मी 'माणूस' प्रतिनिधी तिला हटकतो—)

मी : अहो मथुराबाई, जरा इकडे येता का ?

बाई : अहो, धुतली की भांडी सगळी. दुसऱ्या घरी जायचं आहे मला आता.

मी : जास्त वेळ घेणार नाही तुमचा. मला तुम्हांला काही प्रश्न विचारायचे आहेत.

बाई : आँ ? (काही वेळ प्रश्नार्थक मुद्रेने पाहते—) मग इचारा की——

मी : नाही म्हणजे, तुम्ही या वेळी मत देणार आहात ना ?

बाई : आता ते कुनी सांगावं. हितं कुनाला ठावं हाय——

मी : म्हणजे ? निवडणुकीच्या यादीत तुमचं नाव आहे की नाही हे तरी माहीत आहे का ?

बाई : काय की बाई. हितं कुनी सांगितलंच नाही मला. जाते मी——

मी : अहो, अगदी थोडा वेळ——निवडणुकीसाठी कुणी तुम्हांला भेटलंच नाही ? कुणी काहीच सांगितलं नाही ?

बाई : नाय बा. आम्हांला अडाऱ्याला कोन कशापायी भटतो ?

मी : मग निवडणुका केव्हा आहेत हे तरी माहीत आहे का ?

बाई : अहो, लिवनं वाचनं ये ना तर विलेक्षन कशापायी समजल ?

मी : तुमच्या वॉर्डात कोण कोण उभे आहेत ?

बाई : अहो खरंच, काही माहीत नाही बगा. आपली भांडी घासली, दोन घास खाल्ले की संपलं. काय करायचं ते विलेक्षन न् फिलेक्षन. जाते मी——

मी : अहो थांबा. अगदी थोडा वेळ. मागे कधी निवडणुका झाल्याचं आठवतं ? तुम्ही मत दिलं होतं का ?

बाई : मोप आठवनं की, ही गर्दी आठवती. मी गेली हुती मत द्यायला.

मी : मग कुणाला मत दिलं.

बाई : आता ते कसं आठवनार ? घरच्यांनी सांगितलं तसं मत दिलं. एकदा गेली होती तेव्हा दिसभर लायनीत उभी होते. पन कुठे नावच दिसलं नाही तशी परत आले.

मी : म्हणजे मतच दिलं नाही ?

बाई : नाही.

मी : मत देणं हा केवढा मोठा अधिकार आहे माहीत आहे का ?

बाई : (नुसतीच आँ करून प्रश्नार्थक मुद्रेने पाहते.)

मी : नाही म्हणजे मत देऊन आपण सरकारला राज्यावर बसवतो हे तरी ठाऊक आहे ना ?

बाई : आता ? त्ये हो कसं समजनार मला अडानीला ?

मी : (चिडून स्वत:शीच) काय हे अज्ञान. च्-च्-च्. व्यर्थ तुमचं जिणं मथुराबाई. साध्या सामान्य गोष्टी तुम्हांला माहीत असू नयेत. ज्या स्वातंत्र्यासाठी लाखोंनी आपले रक्त आटविले, हजारोंनी देह झिजविले आणि शेकडोंनी प्राण दिले त्या स्वातंत्र्याची तुमच्या लेखी ही किंमत ? त्या लोकशाहीविषयी तुमची ही अनास्था ? छे ! छे !

बाई : (थोड्याशा रागाने) आता मी हो काय घोडं मारलं तुमचं ? शिव्या कशापायी द्येता. जातीच मी. दुसऱ्या घरची भांडी घासायचीत–

मी : अहो अहो,– छे छे. तुमचा गैरसमज झाला. तुम्हांला बोलत नव्हतो मी, स्वत:शीच बोलत होतो. आता अगदी थोडा वेळ. हां, तर मी तुम्हांला काय विचारणार होतो ? हां, आपल्या देशावर कुणाचं राज्य आहे ?

बाई : काँग्रेस सरकारचं –

मी : एकदम बरोबर. आता काँग्रेस सरकार राज्यावर कसं आलं ?– मी सांगतो. आपण मागच्या निवडणुकीत मतं देऊन काँग्रेसला निवडून दिलं म्हणून. काँग्रेसची निवडणुकीची खूण माहीत आहे ?

बाई : काय की बा–– नाही–

मी : नाही ? असो. दुसऱ्या कुठल्या पक्षाची निवडणुकीची खूण माहीत आहे ?

बाई : नाय बा –

मी : नाही ?– अं–– अं . . . आपल्या देशात–– चुकलो गावात कोणकोणते राजकीय पक्ष आहेत हे तरी माहीत आहे का ?

बाई : (नुसतीच प्रश्नार्थक मुद्रेने पाहते).

मी : (हताशपणे) हरे राम –! मथुराबाई, अहो मथुराबाई, सारे जग आपल्या भारतीय लोकशाहीच्या प्रयोगाकडे एवढ्या आशेने पाहते आहे आणि त्या लोकशाहीच्या अंमलबजावणीची तुम्हांला काडीचीही माहिती असू नये – भयंकर – भयंकर. अगदीचभयंकर !

बाई : (थोडीशी व्याकुळतेने) का हो तोंड टाकता असं ? आता मी काय केलं बाई ? तुमी प्रस्न इचारले न् मी सांगितलं. हितं कुनाला वेळ होता. दुसऱ्या घरची भांडी अजून पडली आहेत. जातीच मी–

(या वेळी मात्र ' अहो थांबा, अगदी थोडा वेळ, ' या माझ्या अजिजीच्या विनवणीला अजिबात भीक न घालता मथुराबाई तरातरा निघून जातात आणि मी आपले कुठे चुकते, राजकीय कार्यकर्त्यांचे, निवडणूक प्रचारकांचे काम कुठे कमी पडते म्हणून अज्ञानाची एवढी पोकळी राहावी हे दुःखित अंतःकरणाने तपासून पाहू लागतो–) ●

### कश्मीर

# काँग्रेसची पहिली चाचणी

" ग्रेत्या फेब्रुवारी महिन्यात कश्मीरात निवडणुका कशा होतात, ते मी पाहतोच. " कश्मीरचे माजी मुख्यमंत्री श्री. बक्षी गुलाम महंमद यांनी नुकतीच अशी प्रच्छन्न धमकी दिली आहे. नव्यानेच पुनरुज्जीवित केलेल्या नॅशनल कॉन्फरन्सचे बक्षीजी हे नेते आहेत. फेब्रुवारीमध्ये सबंध कश्मीर खोऱ्यावर शुभ्र हिमाची शाल पसरलेली असते. त्यामुळे कश्मीरमधील सार्वत्रिक निवडणुका देशातील इतर राज्यांबरोबरच घ्याव्यात की नंतर घ्याव्यात, याविषयी निवडणूक मंडळाने बराच खल केला होता. सर्व राज्यांच्या निवडणुकांच्या तारखा निवडणूक मंडळाने जाहीर केल्यानंतर बऱ्याच दिवसांनी कश्मीरातही फेब्रुवारीच्या मध्यालाच निवडणुका होतील असे जाहीर झाले ते बराच विचार केल्यानंतर. कश्मीरातील निवडणुका देशाच्या सार्वत्रिक निवडणुकांबरोबर न घेता इतर वेळी घेतल्या तर उगाचच कश्मीरचे वेगळेपण भारताबाहेर जाणवून पडेल. म्हणून हिम असो की काहीही असो, कश्मीरात इतर राज्यांबरोबरच सार्वत्रिक निवडणुका होतील, असे निवडणूक मंडळाने जाहीर करून टाकले.

निवडणुका फेब्रुवारीत न घेता पुढे केव्हातरी घेण्यात याव्यात असे म्हणण्यात, मतदारांची सोय बघण्यापेक्षा बक्षीजींचा काहीतरी वेगळाच डाव आहे. कश्मीरातील अत्यंत भ्रष्ट सरकार म्हणून बक्षीजींचे सरकार गाजले होते. शेवटी कामराज योजनेखाली बक्षीजींना गादी खाली करावी लागली. हे शल्य त्यांना अजून डाचते आहे. आणि म्हणून ते सध्याच्या सादिक सरकारचा ज्या ज्या ठिकाणी पाणउतारा करता येईल, त्या त्या ठिकाणी करतात. त्यासाठी त्यांनी काँग्रेस पक्ष सोडला आणि जुना, विर्सजित झालेला ' नॅशनल कॉन्फरन्स ' हा पक्ष पुनरुज्जीवित केला. हा पक्ष नसता तर कश्मीरात येत्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला कसलीच फिकीर नव्हती.

कश्मीरातील नॅशनल कॉन्फरन्स तथा राष्ट्रीय संघटना बरखास्त करून त्य जागी भारतीय काँग्रेसची स्थापना करण्याची कामगिरी श्री. सादिक यांचीच. भारत व्यापी राजकीय पक्षाला कश्मीरमध्ये आणणे हे त्यांच्या दृष्टीने कश्मीरच्या भारतातील सामीलीकरणाचा एक टप्पाच होता. परंतु सादिक आणि बक्षीजी है कश्मीरच्या मुख्यमंत्रिपदाचे प्रतिस्पर्धी. म्हणून बक्षींनी "नॅशनल कॉन्फरन्स बर खास्त करण्याचा सादिक यांना काय अधिकार आहे?" असा सवाल टाकून त्य संघटनेचे पुनरुज्जीवन करून श्री. सादिक यांना शह देण्याचा प्रयत्न चालविला.

म्हणून तसे पाहता कश्मीरमध्ये काँग्रेस हा अगदीच नवा पक्ष. पण एकदम राजा श्रयच प्राप्त झाल्याने शानदार रीतीने तो कश्मीरात वाढला. सध्याच्या कश्मीर विधानसभेच्या ७० जागांपैकी ५२ काँग्रेसच्या ताब्यात आहेत. आणि चौदा पुनरुज्जीवित झालेल्या नॅशनल कॉन्फरन्सच्या. त्या खालोखाल ताकद असलेला पक्ष म्हणजे जनसंघ. जनसंघाच्या ताब्यात विधानसभेच्या तीन जागा आहेत.

नॅशनल कॉन्फरन्स ही कश्मीरचे भारतात सामीलीकरण व्हावे या मताचा हिरी रीने प्रचार करणारी संघटना. कश्मीरात काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर खरे पाहता या संघटनेची गरज उरली नव्हती. पण केवळ सत्तास्पर्धेसाठी ती पुन्हा निर्माण करण्यात आली. आता काँग्रेस, जनसंघ, डेमोक्रॅटिक कॉन्फरन्स हे पक्ष असताना आणि कश्मीरचे भारतात वेगाने सामीलीकरण होत असताना सादिक सरकारला बक्षी गटाचा वैयक्तिक विरोध एवढेच कार्य नॅशनल कॉन्फरन्सकडे उरले आहे. व्यक्तिशः श्री. सादिक हे निःस्वार्थी आणि भ्रष्टाचारापासून अलिप्त आहेत, असे बक्षी गटातील लोकही कबूल करतात. त्यांचा विरोध आहे तो श्री. सादिक यांच्या-भोवती जमलेल्या मंत्रिमंडळाला आणि लोकांना. अतिशय स्वार्थी आणि भ्रष्टाचारी गटाच्या हाती श्री. सादिक सापडले असून त्यामुळे त्यांचे सरकारही भ्रष्टाचारी बनले आहे, असा बक्षी गटाचा आरोप आहे. सादिक सरकारला पराभूत करण्या-साठी नॅशनल कॉन्फरन्स येत्या निवडणुकीत जोराचे प्रयत्न करीत असून त्यासाठी जनसंघादी पक्षांशी हातमिळवणीही करीत आहे.

कश्मीरच्या भारतातील संपूर्ण सामीलीकरणासाठी खऱ्या अर्थाने प्रथमपासून झगडणारा पक्ष म्हणजे म्हणजे जनसंघच. जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी त्यासाठी बलिदान केले. परंतु दुर्दैवाने जनसंघाला प्रत्यक्ष कश्मीर खोऱ्यात काहीच अनुयायी नाहीत. जम्मू खोऱ्यातील हिंदू वस्तीत मात्र जनसंघाची जबरदस्त पकड आहे. कश्मीरमधील बरेच मुस्लिम जनसंघाचे सभासद आहेत, असे म्हणतात. पण प्रत्यक्षात मात्र मुस्लिम वस्त्यांमध्ये जनसंघाच्या उमेदवारांना चांग-लाच मार बसत आला आहे. येत्या सार्वत्रिक निवडणुकीत जनसंघ जम्मू विभागा-तील सर्वच्या सर्व ३१ जागांसाठी उमेदवार उभे करणार आहे. परंतु या ३१ मत-दारसंघांपैकी ९ मतदारसंघांत मुस्लिमांचे प्राबल्य आहे तर सहा मध्ये हरिजनांचे.

उरलेल्या जागांपैकी ७ किंवा ८ जागा मिळून मागील निवडणुकांपेक्षा जनसंघ आपले बळ दुपटीहून अधिक वाढवील, असा अंदाज आहे. प्रत्यक्ष कश्मीर खोऱ्यातही जनसंघ ९ उमेदवार उभे करीत आहे. पण त्यांपैकी कुणाकुणाचे डिपॉझिट जप्त होणार याची शाश्वती नाही. जम्मू विभागातील लोकसभेच्या दोन जागांसाठीही जनसंघाने आपले उमेदवार उभे केले आहेत. नॅशनल कॉन्फरन्ससकट इतर विरोधकांनी त्यांना पाठिंबा दिला तरच ते निवडून येण्याची थोडीफार शक्यता आहे.

## ' नया कश्मिर 'चे आकर्षण

परंतु गेल्या अवघ्या दोन वर्षांच्या कालावधीत काँग्रेसने आपली मुळे कश्मीरात इतकी पक्की रुजविली आहेत की, नॅशनल कॉन्फरन्स आणि जनसंघ यांनी कितीही प्रयत्न केले तरी येत्या सार्वत्रिक निवडणुकीत ते काँग्रेसला राज्यावरून खाली खेचू शकणार नाहीत. काँग्रेसचे बहुमत मात्र ते निश्चितपणे कमी करू शकतील. गेल्या दोन वर्षांत कश्मीरात आपली ताकद वाढविण्यासाठी काँग्रेसने आटोकाट प्रयत्न केले आहेत. दूरदूरच्या दुर्गम प्रदेशांत कार्यकर्ते पाठवून काँग्रेसने आपल्या शाखा वाढविल्या आहेत आणि सभासद नोंदविले आहेत. नाही म्हटले तरी शेख अब्दुल्ला आणि बक्षी गुलाम महंमद यांच्यापेक्षा सादिक सरकारचा कारभार कमी भोंगळ, कमी अकार्यक्षम आणि थोडातरी शिस्तबद्ध आहे. शिवाय काँग्रेसची धर्मातीततेची घोषणा, चौथ्या योजनेचे आकर्षण आणि नॅशनल कॉन्फरन्सनेच दहा वर्षांपूर्वी पुरस्कृत केलेल्या ' नया कश्मीर ' योजनेचे काँग्रेसनेच केलेले पुनरुज्जीवन. यांमुळे जनतेचा काँग्रेसवरील विश्वास वाढू लागला आहे. कश्मीरातील येत्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसची पहिली चाचणी आहे. तीमध्ये उत्तीर्ण होऊच, असा पुरेपूर विश्वास काँग्रेसला आहे.

डाव्या कम्युनिस्टांनी कश्मीरात डेमोक्रॅटिक कॉन्फरन्स या नावाखाली शिरकाव केला आहे. सध्याच्या कश्मीर विधानसभेत डाव्या कम्युनिस्टांना एकच जागा आहे. परंतु त्यांची संघटना उत्कृष्ट आहे. जम्मू विभागातच त्यांचा जोर विशेष आहे. येत्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण २५ जागा या राज्यात लढविण्याचा त्यांचा मानस असून जम्मू विभागातील कमीत कमी तीन जागा तरी आपण मिळवू शकू, असा त्यांचा विश्वास आहे.

ज्या ज्या विरोधकांशी हातमिळवणी होईल त्यांच्या त्यांच्या जागा सोडून बाकीच्या विधानसभेच्या आणि लोकसभेच्या सर्व जागा नॅशनल कॉन्फरन्स लढविणार आहे. या नव्या नॅशनल कॉन्फरन्सची ताकद किती आहे आणि बक्षी गुलाम महंमद श्री. सादिक यांच्याविरुद्ध आपली संघटना किती राबवू शकतात, हे आता नॅशनल कॉन्फरन्सला निवडणुकीत किती जागा मिळतात यावरूनच समजू शकेल.

●

समीर

# विचार वारे

## □ आजची युरोपीय स्त्री

आजच्या युरोपीय स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिला आता समाजात जे स्थान आहे, त्याची कल्पना ' बेटर हाफ् ' या शब्दांनी मुळीच येणार नाही. सुमारे शंभर वर्षांपूर्वी प्रेमाबद्दल काही काव्यमय कल्पना प्रचलित होत्या तेव्हा पत्नीचे वर्णन पतीचा ' बेटर हाफ् ' असे करणे ठीक होते; पण आता तो काळ बदलला. त्या वेळी स्त्रीने पुरुषासाठी त्याग करण्याची कल्पना फॅशनेबल होती. पतीने सोडले तर नदीत उडी घेऊन जीव देणारी स्त्री हा त्या वेळचा आदर्श होता. कदाचित् अशी आदर्श स्त्री त्या वेळीही फक्त साहित्यातच दिसली असेल, पण हा आदर्श तत्कालीन स्त्रीवर्गासमोर होता एवढे मात्र नक्की. आता ती कल्पना उखडली गेली आहे. आजची युरोपीय स्त्री कशी आहे या विषयावरचे हे विचार श्रीमती इस्से लँग्नर या सुप्रसिद्ध जर्मन लेखिकेने काही दिवसांपूर्वी नव्या दिल्लीत एका पत्रकाराशी बोलताना प्रकट केले. ' समाजात स्त्रीचे स्थान ' या विषयावर ठिकठिकाणी भाषणे देण्यासाठी श्रीमती लँग्नर या भारतात आल्या आहेत.

युरोपात ' अर्धांगी 'ची कल्पना ' सफ्रेजेट ' चळवळीबरोबर विलयाला गेली. सफ्रेजेट स्त्रियांमध्ये स्त्री-सुलभ शालीनता नव्हती. कित्येकदा त्यांच्यांत पुरुषी अरेरावी दिसे व ' स्त्रियांसाठी समान हक्कां 'च्या त्यांच्या तत्त्वाचा प्रसंगी विपर्यासही झाला. परंतु त्यांच्या लढ्यामुळे ते तत्त्व युरोपीय समाजात आता दृढमूल झाले आहे यात संदेह नाही. हे तत्त्व तसे पाहिले तर अगदी साधे आहे. स्त्री व पुरुष हे समान आहेत; स्त्रियांवर असलेली सामाजिक बंधने ही सामाजिक उत्क्रांतीच्या नैसर्गिक प्रक्रियेमुळे त्यांना स्वीकारावी लागलेली नसून ती त्यांच्यावर बाहेरून लादली गेलेली आहेत. आजच्या स्त्री-पुरुषांचे नाते सहकाऱ्याचे आहे. परावलंबित्वाचे नाही. एवढे असूनही मुले, पती व घर यांच्या बाबतीतली स्त्रीची जबाबदारी तिने सोडलेली नाही. उलट, मुलांच्या जोपसनेसाठी व संसार चालविण्यासाठी युरोपीय स्त्री नोकरी करू लागली. हिटलरच्या काळात स्त्री-स्वातंत्र्याच्या प्रगतीत खूपच मोठा अडथळा आला. हिटलर अशा स्त्रियांचा द्वेष करी, व जर्मनीतच नव्हे तर सबंध युरोपात स्वतंत्र बुद्धीच्या स्त्रियांची गळचेपी करण्यात आली. परंतु हिटलर गेल्यानंतर युरोपीय समाजाची विस्कटलेली घडी पुनः बसविण्यात आली.

आताचा काळ असा आहे की स्त्रीला नवऱ्याचे लाड करायला फुरसतच नाही. ती लक्षाधीशाची मुलगी असो, नाहीतर झाडूवाली असो, आता नोकरी किंवा इतर काही काम करीत असते. पैसा मिळविण्यासाठी म्हणून नव्हे तर कामाची हौस म्हणून ती काम करीत असते. संध्याकाळी ती घरी परतते तेव्हा ती नवऱ्याइतकीच दमलेली असते. अशा परिस्थितीत काव्यमय प्रेमाला थारा कुठून मिळणार ? त्यामुळे केवळ पश्चिम युरोपाच्याच नव्हे तर सबंध जगाच्या इतिहासात आता प्रथमच स्त्री-पुरुष 'रोमान्स' चा कैफ न चढलेल्या दृष्टीने एकमेकांना स्वच्छपणे पाहू शकत आहेत.

काव्याचा झिरझिरीत आडपडदा न ठेवता वास्तवतेवर आधारलेले हे स्त्री-पुरुषांचे साहचर्य आजच्या अणुयुगात तर विशेष अर्थपूर्ण आहे. अणयुगात विध्वंसाची शक्यता हिटलर-युगापेक्षाही अधिक आहे. कारण आता केवळ अज्ञानामुळे किंवा हिशेब चुकल्याने मानव-संहार होऊ शकेल. उदाहरणार्थ, अणुबाँब आपोआप फुटू नये म्हणून त्याला चार संरक्षक खटके लावलेले असतात. एखादा अणुबाँब चुकून विमानातून खाली पडला व त्याचा एखादा खटका बिघडला असला तर कोण अनवस्था प्रसंग ओढवेल ?—आणि अणुबाँब अशा रीतीने चुकून पडण्याच्या घटना घडलेल्या आहेत! असे अणुयुग म्हणजे मानवी स्वभावाला एक आव्हान-आहे. हे आव्हान स्वीकारू शकणारा समाज घडविण्याच्या कामी युरोपातले आजचे स्त्री-पुरुष नाते ही पहिली पायरी आहे.

## □ पाणी आणि सार्वजनिक स्वास्थ्य

औद्योगीकरणाच्या अधिकाधिक आहारी जाऊ लागलेल्या बहुतेक सर्व मोठ्या भारतीय शहरांत शुद्ध पाण्याचा व सांडपाण्याचा प्रश्न विकट होऊ लागला आहे. या विषयातले एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तज्ज्ञ प्रा. आयझॅक नुकतेच दिल्लीला आले होते. तेव्हा म्हणाले की, पाणी, सांडपाणी व विरघळणारा गाळ हे तीन प्रश्न सोडविणे सार्वजनिक स्वास्थ्यसंबंधी वास्तुशास्त्राचे काम आहे. यापुढे सांडपाणी शुद्ध करून मगच सोडून देणे आवश्यक होणार आहे.

दिल्लीच्या शुद्ध पाण्याच्या व सांडपाण्याच्या प्रश्नाबद्दल काय करता येईल ? साधारणपणे कारखानांतल्या प्रक्रिया अशा रीतीने चालवाव्यात की सांडपाणी शक्य तेवढे कमी तयार होईल व मग तेही शुद्ध करून नदीत सोडावे. समुद्राचे पाणी शुद्ध करून वापरता येणार नाही का ? घरकामासाठी ते वापरणे फारच महाग पडेल. नदीचे १,००० गॅलन पाणी शुद्ध करायला तीन पेन्स खर्च येतो, तर तेवढेच समुद्राचे पाणी शुद्ध करायला सात शिलिंग खर्च येईल.

●

# विरोधकांचा बालेकिल्ला

# पुणे

पुण्यामधील सदाशिव पेठेशी जोडलेला विधानसभेचा मतदारसंघ एक अत्यंत महत्त्वाचा आणि सर्वच राजकीय पक्षांना आव्हान देणारा मतदारसंघ गणला जातो. सामान्यपणे अरण्येश्वरापासून ओंकारेश्वरापर्यंत आणि शुक्रवारपासून लकडीपुलापर्यंत पसरलेला सुमारे ७८,००० ते ८०,००० मतदारांचा हा अतिशय आटोपशीर आणि सलग मतदारसंघ आहे. या मतदार संघामध्ये सामाजिक घटकांचा विशेष समतोल आणि समन्वय आढळून येतो आणि यांमध्ये सर्व तऱ्हेच्या विचार प्रवाहांचे प्रतिबिंब पडलेले दिसते. राजकीय दृष्टचा अतिशय जागरूक असलेला बहुजनसमाज आणि अधिक बोलका पांढरपेशावर्ग यांचे जवळ जवळ तुल्यबळ या मतदारसंघात आहे.

त्यामुळेच या मतदारसंघासाठी आपापल्या उमेदवारांची निवड करणे, हे राजकीय पक्षांना मोठ्या जिकिरीचे जाते. मतदारसंघाच्या वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक घटकांमुळे उमेदवार निवडण्यावरही साहाजिकच बंधने येतात. सुशिक्षित पांढरपेशावर्ग व बहुजनसमाज या



दोघांनाही स्वीकारार्ह असलेला आणि पुन्हा काही व्यक्तित्व असलेला असा बलवान उमेदवारच येथून निवडून येतो. या वेळी या मतदारसंघातील शिवाजीनगर काढून टाकून त्या जागी शुक्रवार पेठ आणली आहे. पण त्यामुळे मतदारसंघाचे स्वरूप फारसे बदललेले नाही.

गेल्या तीन निवडणुकांमध्ये या मतदारसंघातून निवडून आलेले उमेदवार असेच समाजाच्या या दोन्ही थरांना स्वीकारार्ह होते. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेसचे श्री. बाबासाहेब घोरपडे निवडून आले होते तर १९५७ साली संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे श्री. जयवंतराव टिळक निवडले गेले होते. १९६२ साली श्री. स. गो. बर्वे निवडून आले.

येत्या सार्वत्रिक निवडणुकीतही या मतदारसंघाची निवडणूक गाजणार आहे. कोणताही प्रश्न या मतदारसंघात धसाला लावला जात आहे म्हणून नव्हे तर जनसंघाचे श्री. रामभाऊ म्हाळगी निवडून येण्याच्या जिद्दीने येथे उभे आहेत म्हणून.

## रामभाऊ म्हाळगी

### चुरशीची लढत

श्री. म्हाळगी यांचे प्रतिस्पर्धी म्हणून काँग्रेसचे श्री. बा. पां. आपटे, समितीपुरस्कृत हिंदुसभा उमेदवार श्री. ल. गो. सहस्रबुद्धे, श्री. प्र. बा. जोग अपक्ष म्हणून आणि प्रजा समाजवाद्यांतर्फे श्री. कोतवाल हे उभे आहेत. चुरशीची खरी लढत होणार ती श्री. म्हाळगी आणि आपटे यांच्यातच हे नक्की.

मागील वर्षीची आकडेवारी पाहिली तर या मतदारसंघातील यंदाच्या निवडणुकीची दिशा कोणती आहे हे समजायला थोडी मदत होईल. मागील निवडणुकीतही या वेळच्या उमेदवारांपैकी श्री. म्हाळगी हे एकटेच उमेदवार हा मतदारसंघ लढवीत होते. सुमारे ७५ टक्के मतदान झाले असताना श्री. स. गो. बर्वे यांच्याविरुद्ध त्यांना सुमारे १५,००० मते पडली. हिंदुसभेचे श्री. ग. म. नलावडे यांना ४,००० आणि समितीचे श्री. निळुभाऊ लिमये यांना १,५०७ मते मिळाली होती. श्री. बर्वे सुमारे ३०,००० मते मिळवून जिंकले होते. पण बर्व्यांची ही सारीच मते काँग्रेसची मते नव्हती. म्युनिसिपल कमिशनर म्हणून श्री. बर्वे यांनी केलेली कामगिरी आणि मंत्रिमंडळात त्यांचा समावेश करण्याविषयी श्री. चव्हाण यांनी केलेली घोषणा व पानशेत पुराच्या वेळी केलेले कार्य यांमुळे बरीचशी मते त्यांनी खेचून आणली होती. याच मतदारसंघातून लोकसभेसाठी कै. शंकरराव मोरे यांना अवघी १३,२२० मते पडली होती. तेवढीच या मतदारसंघातील काँग्रेसची फुटू न शकणारी किमान खरी मते संयुक्त महाराष्ट्र समितीच्या काळातही काँग्रेसच्या नलिनीबाई शिंदे यांना श्री. जयंतराव टिळकांविरुद्ध १३,००० मतेच पडली होती.

या उलट श्री. म्हाळगी यांची १५,००० मते हीही किमान फुटू न शकणारी मते आहेत. मागील निवडणुकीच्या मतदार संघाच्या मतातील गेल्या पाच वर्षांत झालेली वाढ लक्षात घेता हा आकडा १८,००० वर जातो. श्री. आपटे यांच्या बाबतीत हा आकडा १६,००० पर्यंत जातो.

आता बर्व्यांना मागील निवडणुकीत किमान काँग्रेस मतांच्यावर जी १७,००० मते मिळाली होती ती या वेळी श्री. आपटे यांना सर्वच्या सर्व जाणे शक्य नाही. त्या मतांचे स्वरूप लक्षात घेता त्यातील बरीचशी पांढरपेशी मते श्री. म्हाळगी खेचून घेतील. स्वतःच्या विशिष्ट सामाजिक स्थानामुळे श्री. कोतवाल काही मते खेचतील आणि फारच थोडी श्री. सहस्रबुद्धे आणि जोग खेचतील. म्हणजे या पांढरपेशा मतांतील जास्तीत जास्त किती मते श्री. म्हाळगी खेचून घेऊ शकतात त्यावरच निवडणुकीतील त्यांचे यशापयश अवलंबून आहे. आपल्या किमान १८,००० मतांच्यावर ६,००० मते जरी श्री. म्हाळगी यांनी खेचली तरी त्यांना यशाची खात्री आहे. कारण, इतर तीन उमेदवारांमध्ये वाया जाणारी मते व श्री. म्हाळगी आणि आपटे यांच्या किमान मतांचे तुल्यबळ यांमुळे या सामन्याच्या निकालात फार तफावत राहणार नाही. आपल्या व्यक्तित्वावर आणि आपल्या कार्यावर डॉ. आपटे

अधिक मते खेचू शकतात की श्री. म्हाळगी, हा खरा प्रश्न आहे.

## मतदारसंघाची जोपासना

श्री. रामभाऊ काशिनाथ म्हाळगी हे हा मतदारसंघ 'आपला' मतदार संघ मानतात. गेली सार्वत्रिक निवडणूक, त्यांनी याच मतदारसंघातून मोठ्या शर्थीने लढविली. पराभूत झाले तरी गेली पाच वर्षे सतत या मतदारसंघातील उमेदवार या नात्याने ते मतदारसंघाची जोपासना करीत आले आहेत. मतदारसंघातील अथवा सबंध पुण्यातील कोणताही प्रश्न असो ते जिद्दीने पुढे मांडीत आले आहेत. गेली पाच वर्षे त्यांचे व्यक्तिशः या मतदारसंघात काम आहे. तसेच त्यांच्या पक्षाचेही आहे. पण पुण्यातील मतदार जनसंघापेक्षा श्री. रामभाऊ म्हाळगींनाच अधिक ओळखतात. आपल्या गाऱ्हाण्यांची इतर कुणी दखल घेतली नाही तरी म्हाळगींच्या-तर्फे प्रयत्न झाला तर त्यांची दाद नक्कीच लागेल अशी लोकांची खात्री असते. त्यामुळे श्री. म्हाळगी यांच्याबद्दल मतदारसंघात बराच अनुकूल विश्वास उत्पन्न झाला आहे. आणि म्हणून त्यांना विजयाची जवळ जवळ खात्री आहे.

श्री. म्हाळगी पुणे जिल्ह्यातलेच. १९२० साली त्यांचा खेड तालुक्यातील कडूस गावी जन्म झाला. त्यांचे शिक्षण पुण्यातच झाले. मॅट्रिकनंतर संघप्रचाराचे काम करीत असतानाच नोकऱ्या करून बी. ए.; एम्. ए.; एल्. एल्. बी. या पदव्या त्यांनी मिळवल्या. १९४० साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून ते मद्रासमध्ये गेले. १९४२ पासून सात वर्षे सोलापूर जिल्हा हे त्यांचे कार्यक्षेत्र होते. १९४९ ते ५१ या काळात ते अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे मंत्री होते.

१९५१ साली जनसंघ स्थापन झाल्यावर श्री. म्हाळगी यांनी राजकारणात 'उडी घेतली. जनसंघाचे ते प्रथमपासूनचे कार्यकर्ते. ५१–६६ या काळात ते महाराष्ट्र प्रदेश जनसंघाचे मंत्री होते. त्याच काळात ते पक्षाच्या अखिल भारतीय कार्यकारिणीवरही होते. प्रथमपासूनच ते जनसंघाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीवर आणि पार्लमेंटरी बोर्डावर आहेत.

१९५७ साली श्री. म्हाळगी हे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीत मावळ मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले, तेव्हा त्यांच्या कर्तृत्वाला खरे कार्य-क्षेत्र उपलब्ध झाले. विधानसभेत ते समितीचे उपप्रतोद होते. विधानसभेतील आपला पाच वर्षांचा - काळ त्यांनी चांगलाच गाजवला. ५६ ते ६२ या काळातील मुंबई विधानसभेतील प्रश्नोत्तरांची पुस्तके चाळली तर अक्षरशः पानापानांवर रामभाऊंनी विचारलेले प्रश्न. या अवधीत विचारल्या गेलेल्या ८ हजार प्रश्नांपैकी १५०० प्रश्न एकट्या म्हाळगींचे आहेत.

श्री. म्हाळगी यांच्या प्रश्नांची व्याप्ती विशाल होती. रत्नागिरी जिल्ह्यातील काजू कारखान्यांपासून तो भंडारा जिल्ह्यातील पटवाऱ्यांच्या पेन्शनीपर्यंत महा-राष्ट्राच्या साऱ्या कानाकोपऱ्यातील विषयांना त्यांनी वाचा फोडली. पुण्याच्या

ससून हॉस्पिटलमधील आऊटडोअर पेशंटच्या इमारतीची हलाखी यांपासून तो जलमंदिर चोरी प्रकरणी पोलिसांचे गैरवर्तन आदी अनेक प्रकार त्यांनी आपल्या प्रश्नांद्वारा उजेडात आणले. मंत्र्यांचे दौरे, त्यांचे समारंभ यांवर त्यांनी टीकेची धार धरली. जपानी भातशेती, कापसावरील दह्यारोग, वासुदेव बळवंत फडक्यांचे स्मारक, ठाणे जिल्ह्यातील मिशनऱ्यांच्या कारवाया, रायफल क्लब्स् आदी कुठलाही विषय त्यांच्या प्रश्नांना वर्ज्य नव्हता. एक अत्यंत जागरूक आणि तळमळीचा आमदार म्हणून त्यांनी आपल्या कारकीर्दीत चांगलाच लौकिक कमाविला होता.

## विरोधकांतही आदर

त्या त्यांच्या जागरूकतेमुळे महाराष्ट्रातील दूरदूरच्या ठिकाणाहून लोक तक्रारी पाठवीत. अशा प्रत्येक प्रश्नाची श्री. म्हाळगी फाईलच करीत. तक्रार आली की, त्यावरील अधिक माहिती मागवावयाची, तिची शहानिशा करायची आणि मगच विधानसभेत प्रश्न मांडायचा. श्री. म्हाळगी सांगतात, "विधानसभेसाठी एकदा प्रश्न दिला रे दिला की कामाची चक्रे वेगाने फिरू लागतात. बहुधा विधानसभेत प्रश्न येण्यापूर्वीच तक्रार करणाऱ्याचे माझ्याकडे पत्र येई, 'कामाला सुरुवात झाली आहे.' आणि प्रश्नोत्तराच्या वेळी मंत्री सांगतात, 'काम झालेले आहे.' आणि तोवर काम खरोखरच झालेले असे."

श्री. म्हाळगी यांनी विधानसभेत केलेली बरीच भाषणेही गाजली. गृहनिर्माण मंडळाच्या बिलावरील त्यांचे भाषण, गोवधबंदीच्या समर्थनार्थ त्यांनी केलेले प्रभावी भाषण, पानशेत चर्चेतील त्यांचे भाषण, ही त्यांची काही भाषणे अजूनही त्या वेळच्या आमदारांच्या स्मरणात असतील. मागील निवडणुकीत श्री. म्हाळगी पडले. पण निरुत्साही झाले नाहीत. पुण्याचे आणि आजूबाजूचे प्रश्न दुप्पट जोमाने त्यांनी हाताळावयास सुरुवात केली. पूररेषा, वीजदरवाढ, मध्यम वर्गीयांचे, घरमालकांचे प्रश्न, अन्नधान्य चळवळ यांमध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेतला.

आपला वकिलीचा व्यवसाय सांभाळून श्री. म्हाळगी हे पूर्णवेळचे राजकारण करतात. त्यांच्या पत्नी सौ. विजयाबाई म्हाळगी याही बी. ए. बी. टी असून शिक्षिका आहेत. नोकरी करून त्या घर सांभाळतात. त्यांना एक मुलगाही आहे.

श्री. म्हाळगी राजकारणात आणि समाजातही आब राखून आहेत. विरोधकांतही त्यांच्याबद्दल आदर आहे. विरोधक, सरकारी यंत्रणा, सामान्य जन या सर्वांशी त्यांचे संबंध आहेत आणि जुळवून घेण्याची त्यांची वृत्ती आहे. त्यांच्या भाषणांमध्ये आत्मविश्वास आणि आवेश पुरेपूर भरलेला असतो. तसेच खाजगी संभाषणात त्यांची समजून घेण्याची वृत्तीही दिसून येते.

"पाच वर्षे माझ्या मतदारसंघात काम करून मग निवडून जाण्यावर माझा भर आहे," श्री. म्हाळगी सांगतात. "याचा अर्थ आंदोलने करून त्या जोरावर निवडणुका लढविणे चुकीचे असे मी म्हणत नाही, पण नुसतीच आंदोलने नकोत.

आंदोलन आणि भरीव काम यांचा नीट समन्वय हवा. माझा भर काही भरीव काम करण्यावर आहे–"

श्री. म्हाळगी म्हणतात, "कर्तव्याची हाक आली म्हणून मी राजकारणात शिरलो. काही लोक धंदा म्हणून राजकारणात शिरतात तर काही लोक फॅशन म्हणून राजकारण करतात. मी एक पवित्र निष्ठा म्हणून राजकारण करतो–"

## जनतेचा प्रत्यक्ष सहभागी

राजकारणात घाण असते, बजबजपुरी असते, ढोंग असते म्हणून राजकारणाच्या जरा दूरच राहावे हे मत त्यांना पटत नाही. त्यात त्यांना शहाणपणा वाटत नाही. राजकारणात घाण असली तरी जनतेच्या भल्यासाठी व्रतस्थ राहून ते स्वीकारलेच पाहिजे असे त्यांना वाटते. तसेच भारताच भविष्य काळंकुट्ट आहे, ही अखेरचीच निवडणूक आहे, हा निराशावादही त्यांना मान्य नाही. "पुढे चलण्याची जिद्द दाखवा, भविष्य आपले आहे," असे ते म्हणतात.

"आपल्या समाजात स्वयंकेंद्रितता फार मोठ्या प्रमाणात येण्याची शक्यता आहे, ही गोष्ट बरी नव्हे," श्री. म्हाळगी म्हणतात. "लोकांचे जीवनमान वाढवावे. पण केवळ त्याचा हव्यास नको. आजकालच्या वैयक्तिक प्रेरणा आणि सरकारी कायदे यांच्या चौकटीतून सुटून सामाजिक कर्तव्य बजाविण्याची संधी मिळणे कठीण जाते. म्हणून ज्या स्वयंकेंद्रित प्रेरणा आणि जे कायदेकचाटे सामाजिक कार्यांच्या आड येत असतील त्यांच्यावर बोट ठेवून ते बाजूला सारले पाहिजेत."

निवडून आल्यानंतर आपण काय करू, हे सांगताना श्री. म्हाळगी म्हणतात, "पुण्यातील या बुद्धिजीवी आणि हुशार मतदारसंघाचा आजवर कुणी उपयोगच करून घेतला नाही. तो मी करणार आहे. प्रत्यक्ष कायदे करण्याच्या बाबतीत जनतेची मदत कधीच घेतली जात नाही. एखादे बिल तयार झाल्यानंतर ते गॅझेटमध्ये प्रसिद्ध होते आणि त्यावर मग आक्षेप मागविण्यात येतात. त्या बिलाशी संबंधित असलेल्या वर्गांपर्यंत तर ते गॅझेट पोचतही नाही. त्यापेक्षा एखादे बिल तयार होत असतानाच ते ज्या वर्गाशी संबंधित असेल त्यांची चर्चा घडवून, त्यांची मते घेऊन, त्यांचे आक्षेप जाणवून घेऊन मगच विधानसभेत त्याची चर्चा करणे शक्य नाही का? आजपर्यंत तसे कुणीच केले नाही. मी ते करणार आहे. म्हणजे बिलाचा कायदा करण्यामध्ये खरोखरच जनतेचा हातभार लागल्यासारखे होईल. पुण्यातील ४०० वकिलांपैकी २२० वकील माझ्या मतदारसंघात आहेत. त्यांचाही या गोष्टीला चांगलाच उपयोग होईल.–"

याशिवाय पुण्याचे आणि विशेषत:, या मतदारसंघाचे विशेष असे प्रश्न आपण जिद्दीने धसाला लावू, असा विश्वास श्री. म्हाळगी व्यक्त करतात. पूरग्रस्तांचे प्रश्न, झोपडपट्ट्यांचे प्रश्न, विद्यार्थ्यांचे प्रश्न, मध्यवर्गीयांच्या घरांचे प्रश्न, अन्नप्रश्न आदी अनेक प्रश्न पुण्यातील लोकांना भेडसावतात. ज्याला कामच करायचे आहे, त्याला

काम करायला भरपूर वाव आहे, असे त्यांना वाटते आणि संधी मिळाली तर या सर्व प्रश्नांवर आपण कडाडून हल्ले चढवू अशी ईर्ष्या त्यांना आहे.


## शिस्तबद्ध प्रचार

आणि जनसंघाची निवडणूकसंघटना जबरदस्त आहे. श्री. म्हाळगींच्या एकूण निवडणूक प्रचारात, हस्तपत्रके, भित्तीपत्रके यांमध्ये जरी पक्षीय उमेदवार म्हणून भर देण्यापेक्षा एक लोकप्रिय नेता म्हणून भर देण्यात येत असला तरी जनसंघाचे कार्यकर्ते या निवडणुकीसाठी अहोरात्र खपत आहेत. ही त्यांची प्रतिष्ठेची जागा आहे. स्वत: श्री.म्हाळगी घरोघरी जात असतात, वाड्यावाड्यांमधून चर्चात्मक सभा घेऊन सर्व प्रश्नांची खुली चर्चा करीत असतात. सुरुवातीला श्री. म्हाळगी यांनी आपल्या निवडणूक कार्यकर्त्यांच्या सभा घेऊन सुमारे दोन हजार कार्यकर्ते तयार केले. प्रत्येक कार्यकर्त्याला निश्चित काम वाटून दिले असून कामाची पद्धत स्पष्ट केली आहे. २३ डिसेंबरपासून जनसंघाने आपल्या खुल्या प्रचाराला सुरुवात केली आहे. त्यांच्या योजनेत एकूण २१ चर्चात्मक सभा आणि १७ सार्वजनिक सभा अंतर्भूत आहेत. एकेक कार्यकर्ता त्याला वाटून दिलेल्या मतदारांची निवडणुकीपूर्वी तीन-चार वेळा भेट घेईल, अशी व्यवस्था आहे.

निवडणुकीत अपप्रचार होतो, पैसे वाटले जातात. त्यावरही उपाययोजना करण्याचे या वेळी जनसंघाने ठरविले आहे. पैसे वाटले जातात म्हणून आम्ही पडतो, अशी पराभूत मनोवृत्ती नको, त्याचा बंदोबस्त झाला पाहिजे, असे ठरवून जनसंघाने या वेळी खास ' टेहळणी ' पथके तयार केली आहेत. कॅमेऱ्यांसह ही टेहळणी पथके सर्वत्र फिरतील आणि लबाडीच्या केसेस पुराव्यासह उजेडात आणतील. अशा पैसे देणाऱ्यांवर खटले भरण्याचाही जनसंघाचा विचार आहे.

एक जागरूक नेता म्हणून पुण्याच्या लोकांच्या मनात श्री. म्हाळगी यांची प्रतिमा निश्चित ठसली आहे. काँग्रेसविरोधी उमेदवारांना सध्या दिवस अनुकूल आहेत.

श्री. म्हाळगी यांचा प्रचारही जबरदस्त आहे. आता प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरायला थोडेच दिवस उरले असले तरी लोकांच्या चर्चांवरून निर्णय कोणता लागणार हे उघड आहे. ठिकठिकाणी श्री. म्हाळगी यांच्या प्रचारसभा होतात. त्यांमध्ये होणारी गर्दी आणि इतर कोणत्याही सार्वजनिक सभेत ते बोलायला उठले असता होणारा टाळ्यांचा स्वयंस्फूर्त कडकडाट यांवरून त्यांच्या निवडणुकीचा कुणीही अंदाज बांधावा.



# एस. एम्. जोशी

सदाशिव पेठेशी संलग्न असलेल्या शुक्रवार विधानसभा मतदारसंघासारखेच स्वरूप पुण्याच्या लोकसभा मतदारसंघाचे आहे. निम्मे निम्मे जरी नाही, तरी पांढरपेशांच्या बोलघेवडेपणामुळे बहुजन समाज आणि पांढरपेशे यांचे जवळ जवळ तुल्यबळच या सुमारे साडेचार लाखांच्या मतदारसंघात आहे. त्याचप्रमाणे साऱ्या मतप्रवाहांची प्रतिबिंबेही या मतदारसंघात उमटतात. संपूर्ण महाराष्ट्र समिती पुरस्कृत, संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष श्री. एस्. एम्. जोशी आणि काँग्रेसचे बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यांच्यामध्ये या वेळी या लोकसभेच्या जागेसाठी सरळ सामना होणार, हे जवळ जवळ निश्चित झाले आहे. त्यामुळे या निवडणुकीविषयी मोठेच कुतूहल निर्माण झाले आहे. सामना चुरशीचा होणार असून निकाल केवळ दहा-पंधरा हजार मतांनी तुटणार, असा अंदाज आहे.

पुण्याच्या लोकसभा मतदारसंघात विरोधी पक्षांना थोडासा प्रतिकूल असा ठरणारा बदल या निवडणुकीसाठी करण्यात आला आहे. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत पुणे शहरातील सर्व विधानसभा मतदारसंघाला हवेली तालुका मतदारसंघ जोडून पुणे लोकसभा मतदारसंघ तयार केला होता. नव्या रचनेत त्यातून हवेली तालुका काढून टाकून त्याऐवजी मुळशी तालुका मतदारसंघ जोडण्यात आला आहे. हवेली तालुका मतदारसंघात समाजवादी पक्षाचे चांगले काम होते. गेल्या निवडणुकीत हवेली मतदारसंघात प्रजा समाजवादी पक्षाचे श्री. रामभाऊ तुपे यांना वीस हजार मते विधानसभेसाठी मिळाली होती आणि तेवढीच मते तेथून श्री. ना. ग. गोरे यांना लोकसभेसाठी मिळाली होती. त्याऐवजी आता नव्याने जोडण्यात

[पृष्ठ ६२ वर]

# तो नदीकाठ

तो नदीकाठ, ती
दरड मातीची लाल
मज आठवते, ती
धूमिळ संध्याकाल ।।

तो कलरव, तेथिल
तृणांकुराची मस्ती
ती ओष्ठ शलाका
मनात फिरवी गस्ती ।।

ती नजर शराबी
आशा ओघळणारी
तिज संगत ती ही
भाषा अडखळणारी ।।

चलजली प्रलोभन
कुजबुजता आवाज
ती अधीर काया
आणि निसटती लाज ।।

ते अधोवदन, ती
सलज्ज गोरी कांती
ती अतृप्ती ती
एकांतातील शांती ।।

—वि. के. देशपांडे



# वाळवंटातून जन्मे....

रंग विरले तेज पुसले रात्र झाली
बाहुल्यांची आकृतीहि भार झाली
राजल्या अंधाररेखा... व्यस्त गात्रा
विस्मृतीचा का खिळेना जाड पत्रा ?

बंदराला बांधलेले स्वप्नतारू
पापणीचे शीड देईना झुगारू
ओठ येईना जुईच्या पाकळीला
—लक्तरांच्या काळजाला या कशाला ?

नितळ भोळे चंद्रपाणी... पूर होते
कृष्णपापांचे किनारे, गात जाते
वाकल्या जन्मांतल्या जळत्या स्मृती
पापण्या पोळून झाल्या खालती !

आतल्या ज्वालामुखींचा फवारा
चुंबणे मीही नव्याने अंबरा
सावल्यांची भास-आशा नीट आता—
वाळवंटातून जन्मे... येरझारा !

—रवीन्द्र बोरगावकर

## बाळ

**वत्सलता स्तनातली**
**यावी बनुनिया स्वाती**
**बाळ कुशीत वाढवा**
**जसा शिंपल्यात मोती १**

**त्याची इवलीशी मिठी**
**माय मायेत भिजावी**
**घट्ट मिटल्या मुठीत**
**सुखे अंकुरास यावी २**

**पाक्षरल्या पान्हचामध्ये**
**सप्ततीर्थे उसळावी**
**असे यावे सूर्यफूल**
**ओटी भाराने लवावी ३**

**असा सांडता बहर**
**जन्मभरी ओटी घ्यावा**
**मोठा होईना का बाळ**
**रिता शिंपला नसावा ४**

*—सौ. इंदिरा कुलकर्णी*

## आस्वाद

निसर्गाच्या रहस्यात वात्सल्याइतके सुंदर रहस्य दुसरे कोणते नसेल. म्हणूनच मातेची थोरवी मोठी. प्रत्येक वेळी अपत्यसंभवाच्या वेळी मृत्यूच्या सीमेपर्यंत आनंदाने जाऊन येणारी माउली वंदनीयच होय. या माउलीचे मन सौ. इंदिरा कुलकर्णी रंगवितात. 'बाळ' हेच तिचे ध्येय आणि प्रेम. 'रिता शिंपला नसावा' हीच तिची हुरहूर आहे. कदाचित् आजच्या कुटुंबनियोजनाच्या काळात ही हुरहूर विचित्र वाटेल. पण ती असते हे काही नाकारता येणार नाही. सूर्यफुलाची उपमा बहारदार आहे. सूर्यफूल जसे सूर्याकडे सतत तोंड करून असते तसे बाळ मातेकडेच पाहत असते.

'तो नदीकाठ–' एका स्मरणचित्राला चौकटीसारखा झाला आहे. विजनात केवळ योगसाधनाच करता येते असे नाही. प्रेमसाधनेलाही अरण्य आणि नदीकाठ अवश्य असतो. श्री. वि. के. देशपांडे यांनी सारे चित्र विरोधी कल्पनांचे रंग भरून सजविले आहे. कवितेला वापरलेली जाति या चित्रणास अनुकूल वाटते. आशा ओघळणारी तर भाषा अडखळणारी. प्रलोभन आहे, लाजही आहे. अतृप्तीला एकान्तात शांतीची सोबत मिळालेली आहे !

रवीन्द्र बोरगावकरांनी वाळवंटातून जलस्थान निर्माण होण्याची गोष्ट रंगविली आहे. वरच्या कडव्यातले पापणीचे शीड खाली पोळून निघाले आहे ! विस्मृतीचा जाड पत्रा हे प्रतिमान नवलाईचे आहे. स्वप्नतारू बांधलेले आहे. जळत्या स्मृती प्रवाही आहेत. ज्वालामुखीचा फवारा बाहेर उसळला. त्याचबरोबर मीही आकाशाला स्पर्श करीत आहे, असे कवीला म्हणावयाचे काय ? यातले काही दुवे हाती येत नाहीत. विशेषतः, शेवटच्या दोन ओळी वाचून कानांवर काही काव्यमय आदळल्यासारखे वाटते. पण अर्थबोध व्हावा तितका होत नाही. सर्व कवितेतला भाव मात्र हृदयाला हलवून सोडतो.

**—गोपीनाथ तळवलकर**

ऐंशी दिवसांच्या अहोरात्र शोधानंतर स्पेनमध्ये हरवलेला चौथा हैड्रोजन बॉंब अमेरिकेने परत मिळविला. ताबडतोब वॉशिंग्टन, माद्रिदला संदेश रवाना झाले.

*" This mission is complete."*

ही सर्व हकीकत गेल्या अंकात वाचकांना सादर केली होती.

त्याच हैड्रोजन बॉंबच्या शोधासाठी रशियाने केलेल्या प्रयत्नांची ही कथा–

# तुटलेला बाण

मूळ लेखक : जॉन ह्युबेल
संक्षिप्त रूपांतर : कमलाकर

## १७ जानेवारी १९६६

१७ जानेवारी १९६६ ला स्पेनच्या समुद्रकिनाऱ्यावर बी–५२ व के. सी – १३५ ह्या दोन अमेरिकन विमानांचा जेव्हा अपघात झाला, त्या वेळी स्पेनच्या समुद्रात रशियाची एक मच्छिमार बोट नांगर टाकून होती. बाहेरून दिसायला ती बोट अत्यंत निरुपद्रवी होती, पण तिच्या आत शक्तिशाली ट्रान्समिटर्स बसविलेले होते व त्यांद्वारे रशियाशी तिला सतत संपर्क ठेवता येत होता.

अपघात झाल्याची बातमी ज्या वेळी वॉशिंग्टनला समजली त्याच्या अगोदर ती मॉस्कोला पोचली होती. अपघात झालेल्या विमानात काय होते, ह्याची बातमी

मॉस्कोला अगोदरच मिळाली होती. त्यामुळे मॉस्कोहून पॅरिसला लगोलग संदेश गेला– 'ताबडतोब पॅलोमेअरला पोहोचा व अमेरिकेचे हैड्रोजन बॉंब प्रथम हस्तगत करा.'

हा संदेश जिच्यासाठी होता ती होती रशियातील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. व्हॅलेरिया ट्राईटस्काय !

डॉ. व्हॅलेरिया ही पदार्थविज्ञानशास्त्र व गणितशास्त्र ह्या विषयांत डॉक्टरेट मिळालेली रशियन महिला होती. पृथ्वीचे चुंबकीय क्षेत्र हा तिच्या संशोधनाचा विषय होता. निरनिराळ्या विज्ञान–परिषदांतून तिने आजवर ५० वर संशोधन-पत्रिकांचे वाचन केले होते. ब्यूरो ऑफ इंटरनॅशनल युनियन ऑफ जिओफिजिक्सची ती एकमेव स्त्रीसदस्य होती.

फ्रान्समधील डॉ. सेल्झर व पायलट फ्रॉबरव्हिले यांच्या सहकार्याने भूमध्य समुद्राचे ८,५०० फुटांपर्यंत तिने संशोधन केले असल्यामुळे, भूमध्य समुद्राचा इंचन् इंच तिच्या परिचयाचा होता आणि या समुद्रातच अमेरिकेचा एक हैड्रोजन बॉंब हरवलेला होता !

रशियन सरकारने ह्या कामासाठी डॉ. व्हॅलेरियाची निवड केली, ती या एकमेव कारणामुळेच. तिच्या भूमध्य समुद्राच्या सफरीमुळे ती 'सागर–कन्या' (Deep Sea–woman) म्हणूनच फ्रान्समध्ये ओळखली जात होती.

## व्हॅलेरिया निघाली

१७ जानेवारी १९६६ ला अपघात झाला आणि त्याच वेळी व्हॅलेरिया पॅरिसहून पॅलोमेअरला जाण्यास निघाली होती. तिचे पॅरिसहून अचानक निघून जाणे कुणाच्याच लक्षात आले नाही.

व्हॅलेरिया पॅरिसहून निघाली ती सरळ 'ली–हेवर' ह्या बंदराकडे जाण्यास निघाली. पण नंतर तिने आपला बेत बदलला. 'ली–हेवर'कडे न जाता तेथून काही मैलांवर असलेल्या निर्जन अशा समुद्रकिनाऱ्याकडे ती जाण्यास निघाली.

नंतर मिळालेल्या संदेशानुसार ती ज्या ठिकाणी पोचली, त्या ठिकाणी तिची वाट पाहत एक रशियन पाणबुडी उभीच होती. त्या पाणबुडीने तिला उचलून घेतले. ह्या रशियन पाणबुडीत ६० माणसे बसू शकतील अशी व्यवस्था होती व तिला २१ इंची टॉरपेडो बसविलेले होते. जगभर समुद्रावर पहारा देत असलेल्या चारशे पाणबुड्यां-पैकी ती एक होती. व्हॅलेरिया पाणबुडीवर चढताच, पाणबुडी बोट पाण्याच्या आतल्या भागात गेली व तिचा भूमध्य सागराच्या दिशेने प्रवास सुरू झाला !

व्हॅलेरिया अशी कामगिरीवर निघाली असतानाच रशियाची गुप्तहेर संघटना हैड्रोजन बॉंबची अधिक माहिती मिळविण्याच्या कार्यास लागली होती.

त्यांनी प्रथम स्पेनमधील अपघात झालेल्या ठिकाणची किरणोत्सर्गी धूळ पळ-

विण्याचा प्रयत्न केला, पण अमेरिकेच्या नियंत्रक तुकडीने स्पेन पोलिसांच्या मदतीने रशियाचे सारे प्रयत्न निष्फळ ठरविले. ज्या ठिकाणी किरणोत्सर्गी धूळ आढळात आली त्या ठिकाणची माती खणून ती पिपांतून भरण्यात आली व ती अमेरिकेस रवाना करण्यात आली. अमेरिकेत एका खास ठिकाणी ही माती पुरण्यात आली. अशा तऱ्हेने पंचावन्न गॅलनची धारण-क्षमता असलेली ५,००० पिपे अमेरिकेत पाठविण्यात आली. ह्यामुळे ज्यांच्या पिकांचे नुकसान झाले त्यांना नुकसानभरपाई म्हणून प्रत्येक व्यक्तिगणिक १५,००० डॉलर्स इतकी रक्कम अमेरिकेतर्फे दिली गेली!

## त्या स्पॅनिश शास्त्रज्ञाचा शोध

किरणोत्सर्गी धूळ पळविण्याचा प्रयत्न अशा रीतीने फसल्यानंतर, रशियाचा दुसरा प्रयत्न झाला एका स्पॅनिश वास्तुशास्त्रज्ञाला पळवून नेण्याचा. बी-५२ ला अपघात झाला, त्या वेळी ह्या वास्तुशास्त्रज्ञाला एका शेतकऱ्याच्या आवारात पडलेला हैड्रोजन बॉंब अगदी जवळून पाहण्याची संधी मिळाली.

शेतात पडलेली सिगारेटच्या आकाराची वस्तू काय आहे हे पाहण्यासाठी तो खाली वाकला. जमिनीवर गुडघा टेकताच त्याच्या गुडघ्याला चटका बसला व त्या ठिकाणी गोल चट्टा पडला. ह्या वास्तुशास्त्रज्ञाने हैड्रोजन बॉंब अगदी जवळून बघितला असल्याची वार्ता पॅलोमेअरमध्ये हां हां म्हणता पसरली. रशियाच्या हेर-संघटनेला ही बातमी महत्त्वाची वाटली. हा माणूस आपल्याला हैड्रोजन बॉंबचे अधिकृत वर्णन करू शकेल, असे त्यांना वाटले. त्याप्रमाणेच त्याचा गुडघा ज्या किरणोत्सर्गामुळे भाजला होता, त्या चट्ट्याचे संशोधन करून हैड्रोजन बॉंबच्या अणु-घटनेचे ज्ञान मिळविणे शक्य आहे, असे वाटून त्यांनी त्या स्पॅनिश गृहस्थाला पळविण्याचा घाट घातला. त्यासाठी ते त्याच्या घरी पोचले, तेव्हा त्यांना कळले की, अमेरिकन सरकारने त्याला अज्ञात स्थळी रवाना केले असून तेथे तो 'निरीक्षणाखाली' आहे. त्या वेळी अमेरिकन सरकारने ज्या तडफेने प्रत्येक घटना हाताळली त्यामुळेच रशियाचे दोन्ही प्रयत्न निष्फळ झाले.

तिसरा प्रयत्न डॉ. व्हॅलेरिया ही करीत होती. तिचे काम धाडसाचे होते. आतापर्यंत तीन हैड्रोजन बॉंब सापडल्याचे जाहीर करण्यात आले होते; पण चौथ्या बॉंबविषयी कमालीची गुप्तता राखण्यात आली होती. त्याचा शोध घेण्याचे कार्य भूमध्य समुद्रात मोठ्या त्वरेने सुरू होते. हा शोध सुरू असताना रशियाची मच्छिमार बोट सतत एके ठिकाणी ८० दिवस उभी होती व अमेरिकन नौदलाच्या हालचालींवर लक्ष ठेवीत होती. तिला तेथे राहण्यापासून प्रतिबंध करणे अमेरिकेला शक्य नव्हते. कारण ती आंतरराष्ट्रीय समुद्रात उभी होती. पण तिने थोडी जरी हालचाल केली असती तरी अमेरिकन नौदलाने तिचा तेव्हाच विध्वंस केला असता!

डॉ. व्हॅलेरियाला नेणारी पाणबुडी भूमध्य समुद्रात येताच आपल्या दिशेचा

अंदाज घेण्यासाठी समुद्राबाहेर आली. बाहेर येताच डेकवर येऊन डॉ. व्हॅलेरिया ही दुर्बिणीतून भोवतालचा प्रदेश न्याहाळू लागली आणि तेथेच तिचे दुर्दैव आडवे आले !

व्हॅलेरिया ही जेव्हा पाणबुडीतून बाहेर आली, त्याच वेळी फ्रॅन्सिस्को सिमो ओर्टस् ह्या कोळ्याने आपल्या दुर्बिणीतून त्या पाणबुडीच्या हालचाली न्याहाळायला सुरुवात केली होती. केवळ कुतूहल म्हणून फ्रॅन्सिस्को हे काम करीत होता. पण जेव्हा त्याला व्हॅलेरिया बाहेर आलेली दिसली, तेव्हा त्याला त्या पाणबुडीचा संशय आला. त्याने अगदी सहजपणे स्पॅनिश अधिकाऱ्यांच्या कानांवर ही घटना घातली !

जी घटना फ्रॅन्सिस्कोला क्षुल्लक वाटली, ती स्पॅनिश अधिकाऱ्यांना फार महत्त्वाची वाटली. त्यांनी लगोलग ही बातमी अमेरिकन अधिकाऱ्यांच्या कानांवर घातली.

पाणबुडीवरील ती स्त्री डॉ. व्हॅलेरियाच असावी, असा दाट संशय पेन्टॅगॉनच्या लष्करी संघटनेला आला. त्यांनी 'व्हॅलेरियाचा पाठलाग करा. तिला शारीरिक इजा करू नका. तसेच रशियन पाणबुडीचे नुकसान पण करू नका. व्हॅलेरिया बॉंबपर्यंत पोचणार नाही, याची फक्त काळजी घ्या,' असा आदेश आपल्या अधिकाऱ्यांना दिला.

त्यानंतर अमेरिकन अधिकाऱ्यांनी काय काय हालचाली केल्या, व्हॅलेरियाला त्या बॉंबपर्यंत पोचण्यापासून परावृत्त करण्यासाठी काय काय केले ह्याबाबत कमालीची गुप्तता राखण्यात आली आहे. त्यामुळे बॉंब मिळविण्यासाठी व्हॅलेरियाने केलेले प्रयत्न व तिला अडकवून ठेवण्यासाठी अमेरिकेने केलेले प्रयत्न ह्यांविषयी केवळ कल्पना करीत बसणेच आपल्या हाती उरलेले आहे. एवढे मात्र खरे की चौथा हैड्रोजन बॉंब हस्तगत होताच, व्हॅलेरियाला तिच्या पॅरिसमधील निवासस्थानी सोडून देण्यात आले !

हैड्रोजन बॉंब पळवून नेण्याचा रशियाने घातलेला घाट अमेरिकेने असा उधळून लावला !

●


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ५१९ नारायण, पुणे २.

# आणि ड्रॅगन जागा झाला

## अरुण साधू

### उत्तरार्ध : लेखांक तिसरा

चीनच्या स्झेचुआन प्रांताच्या पश्चिम विभागाची परिस्थिती अगदी तिबेटसारखी आहे. उंच उंच बर्फाळ डोंगर, सरळ उभे कडे आणि खाल दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या. सीमेपलीकडेच तिबेट आहे. अशाच दोन सरळ तुटलेल्या कड्यांमधून तातू नदी वाहते.

यांगत्से नदी ओलांडून लाल सैन्याने स्झेचुआनमध्ये प्रवेश केला आणि ते झपाट्याने उत्तरेच्या दिशेने जाऊ लागले. स्झेचुआनमध्ये बरेच प्रदेश असे होते की जिथे कुठल्याही चिनी सैन्याने पाऊलही ठेवले नव्हते. अत्यंत क्रूर अशा रानटी जमाती तेथे वस्ती करून होत्या. त्या डोंगरी घनदाट अरण्यात लोलो या जमातीचे अधिराज्य चालत होते. कोणत्याही चिनी राजाला या जमातीला वश करून घेण्यात यश मिळाले नव्हते म्हणून या प्रदेशाला लोलोलँड म्हणत. हे लोलो चिन्यांचे कट्टर शत्रू. कुठलेही चिनी सैन्य आसपासच्या प्रदेशातून जाऊ लागले की त्यावर सारखे हल्ले करून त्याला ते बेजार करून टाकीत. लोलोलँडमधून जाताना लाल सैन्य आणखीच खच्ची होईल आणि ते तातू नदीवर येईपर्यंत आपण आपले सैन्य गोळा करून त्यांना चांगला चोप देऊ शकू असा चँग-कै-शेकला विश्वास होता.

परंतु आदिवासी आणि रानटी जमातींबरोबर वागण्याची लाल सैन्याची पद्धत वेगळी होती. क्वेचोव आणि युनान प्रांतांमधून हिंडताना लाल सैन्याला अनेक आदिवासी जमातींशी संबंध ठेवावे लागले होते. त्यांनी त्यांची सहानुभूती मिळविली होती. इतकेच नव्हे तर अनेक आदिवासी तरुणांना आपल्या सैन्यात भरतीही करून घेतले होते. लोलो जमातीचा चिन्यांविषयीचा द्वेष त्यांना माहीत होता. म्हणून लोलोलँडमध्ये शिरण्यापूर्वी त्यांनी आपले काही दूत लोलो प्रमुखांशी बोलणी करण्यास पुढे धाडले. लोलोलँडच्या सीमेवरील सात शहरे लाल सैन्याने कोमिन्टांग आणि सरंजामी सरदारांच्या सैन्याकडून जिंकून घेतली. या शहरांत अनेक लोलो प्रमुखांना लष्करी सरदारांनी पकडून तुरुंगात ठेवले होते. त्यांना लाल सैनिकांनी मुक्त केले. आणि ते लोलो पुढारी लाल सैन्याला दुवा देत आपापल्या भागात परत गेले.

**लोलोंना आपलेसे केले**

लाल सन्याच्या आघाडीच्या पथकांमध्ये पूर्वी स्झेचुआनच्या लष्करी सैन्यात असलेला आणि बऱ्याच वर्षांपासून लाल सैन्यात दाखल झालेला लीऊ-पै-शेंग हा होता. लीऊला लोलो जमातीची चांगली माहिती होती आणि त्याला थोडीशी लोलो भाषा-देखील अवगत होती. आपल्या एका लहानशा तुकडीसह त्याने लोलोलँडमध्ये प्रवेश केला आणि लोलो प्रमुखांशी बोलणी करण्यास त्याने सुरुवात केली. त्याने मोठ्या खुबीने लोलोंना पटविले की, जसे लष्करी सरदारांना आणि कोमिन्टांग सैन्याला लोलो विरोध करतात ना, तसेच लाल सैन्यही करते! लोलोंना स्वतःचे स्वातंत्र्य अबाधित राखायचे आहे ना? लाल सैन्याचे धोरणच ठिकठिकाणच्या अल्पसंख्याक जमातींना आपल्या विभागापुरती स्वायत्तता मिळावी असे आहे! लोलो चिन्यांचा द्वेष करतात; कारण चिनी लोक त्यांच्यावर आक्रमणे करून जुलूम करतात, परंतु सर्व चिनी लोक सारखे थोडेच आहेत! चिन्यांतही श्वेत चिनी आणि लाल चिनी असे भेद आहेत. आम्ही लाल चिनी आहोत आणि या जुलमी श्वेत चिन्यांशीच आम्ही लढत आहोत!

लोलोंना हे एकदम पटले. मग या श्वेत चिन्यांशी लढण्यासाठी त्यांनी लाल सैन्याशी तावडतोब हातमिळवणी केली. लीऊ आणि लोलो प्रमुख यांनी लोलो प्रथेप्रमाणे एक कोंबडी मारून तिचे ताजे रक्त प्राशन करून आपल्या मैत्रीवर शिक्कामोर्तब केले. लोलोलँडमधील निबिड जंगला-डोंगरातून लोलोंनी लाल सैन्याला सोपा व सुरक्षित रस्ता दाखवून तातू नदीपर्यंत नेले. एवढेच नव्हे तर अनेक लोलो तरुण श्वेत चिन्यांशी लढण्यासाठी म्हणून लाल सैन्यात भरती झाले.

आघाडीची लाल पथके भराभर लोलो वाटाड्यांसह उत्तरेस तातू नदीकडे निघाली. लोलोलँडच्या घनदाट जंगलांमुळे एकदा आत शिरलेले लाल सैन्य नेमके कुठे गेले आहे याचा कोमिन्टांगच्या बाँबर वैमानिकांना पत्ताच लागत नव्हता. त्यामुळे तेवढा एक त्रास कमी होता. अनेक दिवस जंगल तुडविल्यानंतर लाल आघाडी

जंगलातून बाहेर आली आणि तातू नदीच्या काठी असलेल्या आन-जेन-शेंग या छोटया खेड्यापाशी पोचली. दुरूनच त्यांना नदीकाठी एक लहान बोट दक्षिण किनाऱ्यावर दिसली आणि उत्तर किनाऱ्यावर आणखी दोन बोटी होत्या. त्यांच्या आनंदाला पारावर उरला नाही.

## दुथडी भरून वाहणारा पराक्रम

वास्तविक पाहता साऱ्या बोटी उत्तर किनाऱ्यावर हलविण्याच्या चँग-कै-शेकने आज्ञा सोडल्या होत्या. त्याप्रमाणे बोटी हलविण्यातही येत होत्या. परंतु योगायोगाने आन-जेन-शेंगजवळ तातू नदीच्या उत्तर किनाऱ्यावरील कोमिन्टांग तुकडीचा सेनापती स्झेचुआनच्या त्याच प्रदेशांत राहणारा होता. त्यामुळे त्याला लोलोलँडची चांगली माहिती. त्या रानटी प्रदेशातून सुखरूपपणे जंगल तुडविण्यास लाल सेनेला कित्येक दिवस लागतील याची त्याला खात्री होती. शिवाय त्याची बायको आन-जेन-शेंगची होती. त्या दिवशी तो आपल्या सासरी जेवायला म्हणून बोटीने आला होता. लाल सैन्याने गावाला वेढा घातला आणि तो जेवत असतानाच त्याला पकडले.

सुमारे शतकापूर्वी तैपिंग बंडखोर एक लाख सैन्यानिशी तातू नदीच्या किनारी पोचले होते. त्यांच्या पाठलागावर मांचू सैन्य होते. आणि त्यांना तावडतोब नदी पार करायची होती. पण त्याच सुमारास त्यांचा पुढारी शिह-ता-कै याला एक मुलगा झाला. आणि त्या जन्मोत्सवात त्यांचे दोन दिवस तसेच गेले. तेवढ्या अवधीत मांचू सैन्य त्यांच्या पाठीशी येऊन ठेपले होते. शेवटी नदी पार करता न आल्याने त्यांचे संपूर्ण शिरकाण झाले.

लाल सैन्याने मात्र या दिरंगाईच्या चुकीची पुनरावृत्ती होऊ न देण्याचे ठरविले. तातू नदीच्या दक्षिण किनाऱ्यावरील एक एक बोट ताब्यात येताच त्यांपैकी काहींनी त्यामधून नदीपार करून इतर बोटी ऐलतीरावर आणण्याची तयारी दर्शविली. पलीकडच्या तीरावरील शत्रूसैन्याच्या छोटया तुकडीत एव्हाना गडबड झालेली समजली होती आणि ती तयार होऊन बसली होती. लाल सैन्याच्या आघाडीच्या पथकामधील ८० सैनिक पहिल्या बोटीतून पलीकडे जावयास तयार झाले. लाल सैन्याने उंचावर मशीनगन्स लावून या बोटीला संरक्षक गोळीबार करायला सुरुवात केली. पलीकडच्या बाजूनेही गोळीबार सुरू झाला.

तो मे महिना होता. पर्वतावरील बर्फ वितळल्यामुळे तातू नदीला भलताच पूर आला होता. दुथडी भरून वाहणाऱ्या नदीचे पात्र यांगत्सेपेक्षाही वाढले होते. पाण्याला वेगही भलताच होता.

लाल स्वयंसैनिकांनी नदीच्या खूप वरच्या प्रवाहातून बोट सोडली. आणि तब्बल दोन तासांनंतर त्यांची बोट पलीकडच्या किनाऱ्याला लागली. अलीकडच्या किनाऱ्यावरील लोक श्वास रोखून आता काय होते हे पाहत होते. बोट लागताच त्या लाल सैनिकांनी भराभर किनाऱ्यावर उड्या घेतल्या आणि चटकन उंच खडकांच्या

आडोशाला जाऊन आपल्या मशीनगन्स उभारावयास सुरुवात करून गोळीबार सुरू केला.

लाल सैनिकांचा आवेश तुफान होता. या गडबडीत त्यातील दहा-बारा सैनिक मेले होते. तरी जिवाची पर्वा न करता त्यातील काही सैनिक आडोशाबाहेर येऊन शत्रू सैन्यावर हातबाँब फेकू लागले होते. बोटीचा धक्का लाल सैनिकांच्या ताब्यात आला होता आणि पहिली बोट आणखी एका बोटीस घेऊन दक्षिण किनाऱ्याकडे परतूही लागली होती. झाले, श्वेत सैनिकांचे धैर्य गळाले आणि ते हळहळू माघार घेऊ लागले. नंतर तिन्ही बोटींतून लाल सैनिक येत आहेत असे दिसताच ते चक्क पळून गेले.

लगेच लाल सैन्याने नदी पार करण्यास सुरुवात केली. पण पूर व वेग वाढतच होता. बोटी तीनच होत्या. तीन दिवसांत रात्रंदिवस फेऱ्या मारूनही तीन ते चार हजार सैनिकच नदी पार करू शकले. शेवटी शेवटी नदी पार करायला एकेका बोटीला चार-चार तास लागू लागले. सगळी लाल सेना, स्त्री-पुरुष, सामान, जनावरे या गतीने पार करण्यास कित्येक आठवडे लागले असते. तेवढ्यातच कोमिन्टांग बाँबर विमानांनी ती जागा शोधून काढली होती आणि त्यांनी आन-जेन-शेंगवर बाँबवर्षावाचा धडाका लावला होता. शत्रुसैन्य दक्षिणेकडून पाठलागावर येत होतेच. उत्तरेकडूनही ते येण्याचा संभव होता.

## विश्रांतीतही ‘ क्रांती ’

—प्रसंग तर मोठा बाका आला होता. काय करायचे हा प्रश्न पडला. लिन पियाओ आघाडीच्या तुकडीत होता. त्याने एक तातडीची लष्करी सभा बोलावली. माओ-त्से-तुंग, चाऊ-एन-लाय, चुह-तेह आणि पेंग तेह हुरी यांच्याही तुकड्या आता तातू नदीवर येऊन पोचल्या होत्या. मग त्या सगळ्यांनी मिळून ताबडतोब एक महत्त्वाचा निर्णय घेतला.

आन-जेन-शेंगच्या पश्चिमेला सुमारे १३० मैलांवर तातू नदीच्या उत्तर प्रवाहावर एक अतिशय जुना असा लोखंडी साखळ्यांचा झुलता पूल आहे. या ठिकाणी नदी खूप खोलवर वाहते आणि दोन्ही बाजूचे कडे भयानक रीतीने एकदम वर आलेले आहेत. लिऊ नावाच्या जुन्या चिनी राजाने कित्येक शतकांपूर्वी हा पूल बांधला होता. या पुलाच्या दिशेने आता नदीच्या दोन्ही बाजूंचे लाल सैन्य निघाले. उंच उंच कड्यांवरून अतिशय बिकट वाटेने त्यांना जावे लागत होते. खालून नदी खळाळून वाहत होती. कधी कधी त्यांना एकदम कित्येक हजार फूट उंचावर चढून जावे लागत होते तर कधी गुडघा-गुडघा चिखलातून मार्ग काढावा लागत होता. लिऊचा पूल त्यांच्या ताब्यात येणे अत्यावश्यक होते. ते जर शक्य झाले नाही तर त्यांना पुन्हा लोलोलँड, युनानमधून तिबेटमध्येच लढत लढत जाण्याशिवाय गत्यंतर उरले नसते. रात्रंदिवस झोपेची, विश्रांतीची पर्वा न करता ते चालत होते.



चुह्-तेह् आणि माओ

रात्रीच्या वेळी ते मशाली पेटवीत. तेव्हा नदीच्या दोन्ही बाजूंनी चाललेल्या मशालींच्या लांबच लांब रांगांचा उजेड आजूबाजूच्या कड्यांवर पडून ते अधिकच भयानक दिसत. कधी कधीं नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवरच्या या दोन्ही रांगा एकमेकांच्या इतक्या जवळ येत की ते मोठमोठ्याने ओरडून एकमेकांशी बोलू शकत. परंतु त्यांच्यामध्ये भयानक दरी होती.

काही मिनिटे तें कुठे एखाद्या आडोशाला विश्रांतीसाठी थांबले की त्यांच्याबरोबर असलेले राजकीय प्रचारक लगेच भाषणे देऊ लागत. " क्रांती... क्रांतीसाठी आपण हे सारे कष्ट सोसतो आहोत. गरिबांसाठी, दलितांसाठी आपण ही कुर्बानी करतो आहोत. आमच्यातून शेवटचा दम निघेपर्यंत, शेवटचा रक्ताचा बिंदू सांडेपर्यंत आम्ही लढत राहू. अंतिम विजय आमचाच आहे," ते ओरडून सांगत. पण ते स्वतःसुद्धा एवढे थकलेलें असायचे की त्यांच्यापैकी काही काही बोलतानाच बेशुद्ध होऊन पडत.

दोन दिवसांनंतर उत्तर किनाऱ्यावरील लाल तुकडीला श्वेत सैनिकांच्या एका तुकडीस तोंड द्यावे लागले आणि ती मागे पडली. दक्षिण किनाऱ्यावरील तुकडी पुलाच्या दिशेने पुढे जातच होती. उत्तर किनाऱ्यावरून आता दुसरेच एक

सैन्य धावत असलेले दक्षिणेकडील लाल सैन्याला दिसले. तें शत्रुसैन्य होते आणि तेही झपाट्याने लिऊ पूल अडविण्यासाठी जात होते. तातू नदीच्या दोन्ही बाजूंच्या कड्यांवरून त्या दिवसभर कोण पुढे जातो ही शर्यतच लागून राहिली होती. परंतु लाल सैन्याला पुलावर आधी पोचण्याची गरज होती. नाहीतर मरण अटळ होते. भाडोत्री श्वेत सैनिकांत एवढी विशेष ईर्ष्या नव्हती. हळूहळू लाल सैन्याने श्वेत सैन्याला मागे टाकले.

**तीस तरुणांचा आत्मयज्ञ**

लिऊचा पूल हा कित्येक शतकांपूर्वी पाण्यासारखा पैसा खर्च करून आणि शेकडो-हजारो कामगारांचे बळी देऊन बांधला होता. आजूबाजूच्या शेकडो मैलांच्या परिसरात तो एकमेव पूल तातू नदीवर होता. दोन कड्यांमध्ये सुमारे तीनशे फुटांचे अंतर होते. आणि सोळा जाड लोखंडी साखळ्या दोन्ही कड्यांना जोडत होत्या. त्या साखळ्यांची टोके दोन्ही बाजूंच्या खडकांमध्ये पक्की रोवून बसविली होती आणि त्या साखळ्यांवर लाकडाच्या पाट्या टाकून मार्ग बनवला होता.

परंतु कम्युनिस्टांची पथके पुलाच्या दक्षिण टोकाला पोचली तेव्हा त्यांच्या बाजूच्या अर्ध्या पुलावरील त्या लाकडी पाट्या काढून टाकलेल्या आढळल्या. आणि पुलाच्या पुढच्या दुसऱ्या टोकाला मशीनगन्स आणि तोफा डागून श्वेत सैन्य जय्यत तयार होते. लाल सैनिकांच्या समोर दूरदूर अंतरावर असलेल्या त्या नुसत्या रिकाम्या लोखंडी साखळ्या लोंबत होत्या.

वास्तविक पाहता श्वेत सैनिकांना तो पूल संपूर्ण उखडून टाकण्याची आज्ञा मिळाली होती. परंतु स्झेचुआन प्रांतात अगोदर पूल कमी. त्यातल्या त्यात तातू-सारख्या भयंकर नदीवर अगदीच कमी. आणि शिवाय हा लिऊचा पूल बांधायला आजबाजूच्या १८ प्रांतांतील संपत्ती कामी आणली होती, अशी दंतकथा होती. त्यामुळे तिथल्या श्वेत सैन्याने पूलच न उखडता साखळ्यांवरच्या पाट्याच काढून टाकल्या. वरून मशीनगन्सचा मारा चालू असताना नुसत्या साखळ्यांवरून लोंबकळत येण्याचा वेडेपणा लाल सैनिक करणार नाहीत, अशी त्यांना खात्री होती.

पण ईर्ष्येला पेटलेल्या लाल सैनिकांनी मात्र तो वेडेपणा केला. वेळ गमावणे मूर्खपणाचे होते. उत्तर किनाऱ्यावरील श्वेत सैन्याला मागून येणारी कुमक मिळण्याच्या आत तो पूल काबीज करणे आवश्यक होते. साखळ्यांवरून लोंबत पलीकडे जाण्यासाठी अनेक लाल तरुण तयार झाले. त्या स्वयंसेवकांतील तीस घष्टपुष्ट आणि अती चपळ तरुणांना निवडण्यात आले आणि त्यांच्या पाठीवर पिस्तुले आणि हातबॉम्ब बांधण्यात आले. जिवावर उदार झालेले ते तीस तरुण त्या साखळ्यांवरून हाताने पायाने-लोंबकळत वेगाने पुढे सरकू लागले. खालून खोलवर वेगाने वाहणाऱ्या तातू नदीचा कानठळ्या बसविणारा आवाज येत होता. त्यातच दोन्ही बाजूंनी आता मशीनगन्सच्या गोळ्या झडू लागल्या.

एका तरुणाला गोळी लागली आणि मोठी किंकाळी मारून तो खालच्या फेसाळ प्रवाहात पडला. दुसरा पडला, तिसरा पडला. पण इतर भरभरा पुढे जातच होते. ते लाल तरुण त्या हलत्या साखळ्यांच्या आधारे जात असल्याने मशीनगन्सचा मारा करणाऱ्यांच्या आड पलीकडच्या अर्ध्या पुलावरील लाकडी फळ्या येत होत्या. त्यामुळे त्यांचे नेम चुकत होते. त्या भाडोत्री श्वेत सैनिकांनी एवढ्या जिद्दीने जिवावर उदार होऊन लढणारे चिनी सैनिक पाहिले नव्हते. मशीनगन्सच्या वर्षावांतही भराभरा पुढे सरकणाऱ्या त्या लाल सैनिकांना बघून त्यांचे धाबे दणाणले. त्यांचे धैर्य गळाले. सरतेशेवटी एक लाल तरुण त्या लाकडी फळ्यांपर्यंत जिवंत पोहोचला. पालथे पडून पाठीवरचा हातबाँब त्याने काढला आणि नेम धरून समोर फेकला. अगोदरच तिकडे घबराट उडाली होती. आणखी काही लाल तरुण आता त्या लाकडी फळ्यांपर्यंत पोचले होते आणि गोळ्यांचा मारा चुकविण्यासाठी पालथे पडून हळू हळू पुढे सरकू लागले होते. एका हाताने हातबाँब्स् भराभर समोर फेकीत होते. शेवटी श्वेत सैनिकांनी त्या लाकडी फळ्यांवर पॅराफिन ओतले आणि त्यांना आग लावून दिली. समोरच्या लाकडी फळ्यांना आग लागलेली दिसताच फळ्यांवर पोचलेले लाल तरुण उठून उभे राहिले आणि त्यांनी वेगाने शत्रूच्या रोखाने धावायला सुरुवात केली. दक्षिण किनाऱ्यावरून जोराच्या उत्तेजनाच्या आरोळ्या येऊ लागल्या आणि आणखी लाल सैनिकांचा एक लोंढा साखळ्यांवरून लोंबकळत सरकू लागला.

झाले. श्वेत सैनिकांचे उरले सुरले नीतिधैर्य पार गळाले आणि आपल्या बंदुका टाकून ते मागे पळू लागले. इकडे लाकडी फळ्यांवर पोचलेल्या लाल तरुणांनी उसळत्या ज्वालांतून सरळ पुढे उड्या टाकल्या आणि शत्रूच्याच मशीनगन्स्‌ची तोंडे वळवून पळपुट्या सैनिकांवर मारा सुरू केला. मागून आणखी लाल सैनिक लोंबकळत येतच होते. आणि मुळीच वेळ न गमावता ते आग विझवू लागले. तोवर दुसऱ्याच दिवशी मागे पडलेली उत्तर किनाऱ्यावरची लाल तुकडी जवळपास येऊन पोचली होती आणि तिनेही इतर ठिकाणी दबा धरून बसलेल्या श्वेत तुकड्यांवर उंचावरून मारा सुरू केला. पुलाच्या उत्तर टोकावरील सारे श्वेत सैन्य मग मात्र जीव घेऊन पळत सुटले.

पुढचा प्रश्न अगदी सोपा होता. साखळ्यांवर भराभर फळ्या चढविण्यात आल्या आणि तासाभराच्या अवधीत अवघी लाल सेना विजयाच्या जोषात हर्षाने गाणी गात पूल तुडवू लागली. काही वेळातच दूर उंचावर चँग-कै-शेकची बाँबर विमाने आली. पण आजूबाजूचे कडे खूप उंच होते. वैमानिकांनी पुलावर बाँबफेक करण्याचा खूप प्रयत्न केला. पण व्यर्थ.

असा हा तातू नदीवरील संग्राम. या विजयी संग्रामावर असंख्य गाणी आणि कथा कम्युनिस्टांनी लिहिल्या आणि गायल्या. चिनी कम्युनिस्टांच्या इतिहातील हा

अतिशय रोमांचकारक प्रसंग. विशेष म्हणजे आन-जेन-शेंग आणि लिउचा पूल या दोन्ही ठिकाणी नदी प्रथम पार करण्यासाठी स्वयंस्फूर्तीने जिवावर उदार होऊन पुढे होणारे तरुण सारे विशीच्या आतले होते.

## निष्ठा आणि भाडोत्रीपणा

चँग-कै-शेकने आपले सारे सामर्थ्य पणाला लावले असताना आणि श्वेत सैन्ये अधिक सुसज्ज व सोयीच्या ठिकाणी असतानाही कम्युनिस्टांना एवढे भरघोस यश कसे मिळाले ? याला कारणे अनेक आहेत. एक म्हणजे कम्युनिस्टांची आपल्या कामावरची जबरदस्त निष्ठा. पूर्वी माणसे धर्मासाठी अशीच जिवावर उदार होऊन लढत. कम्युनिझमचेही तसेच आहे. लाल सैनिकांमध्ये कम्युनिस्ट राजकीय प्रचारक इतक्या प्रभावीपणे निष्ठेची भावना रुजवीत की ते मुक्तपणे आपले तनमन आपल्या कामाला अर्पण करीत.

शिवाय श्वेत सैन्याचा गलथानपणा. लाल सैन्याला आपल्या अस्तित्वासाठीच लढणे जरूर होते. चँग-कै-शेकला जरी तिडीक असली तरी दूरदूरच्या श्वेत सैनिकांना लाल सैनिकांशी लढण्याची एवढी पोटतिडीक असणे शक्य नव्हते. अगोदर लष्करी सरदारांकडचे सेनापती चँग-कै-शेक हाताशी धरी. मग ते सेनापती त्या त्या ठिकाणी श्वेत सैनिक गोळा करीत. त्या अधिकाऱ्यांमध्येच लढण्याची आस्था कमी. सैनिक केवळ खायला मिळते म्हणून श्वेत सैन्यात भरती होत. कित्येक ठिकाणी तर त्यांना आपण कुणाशी, का लढतो आहोत हेही ठाऊक नसे. त्यामुळे लढण्याचा जोष, ईर्ष्या त्यांच्यांत मुळीच नसे. त्यामुळे त्वेषाने जिवावर उदार होऊन लढणारे लाल सैनिक पाहिले की ते गर्भगळीत होऊन पळू लागत. ठिकठिकाणच्या सेनापतींना कम्युनिस्टांविरुद्धच्या लढ्याचे एवढे महत्त्व वाटत नसे. आणि कम्युनिस्टांच्या वाटचालीच्या वेगाची तर त्यांना मुळीच कल्पना नसे म्हणूनच ते साऱ्या बोटी जाळून टाकण्याविषयी वा पूल उडविण्याविषयी टंगळमंगळ करीत. पराभव झाल्यानंतर तर कित्येक अधिकारी आणि सैनिक लाल सैन्याच्या शौर्याने प्रभावित होऊन कम्युनिस्टांना येऊन मिळत. थोडक्यात म्हणजे लाल सैनिक ध्येयाने प्ररीत होऊन म्हणा किंवा जीव वाचविण्याच्या उद्देशाने म्हणा पण कोणत्यातरी प्रेरणेने लढत होते आणि श्वेत सैनिक नुसते भाडोत्री होते. या फरकामुळेच आणि लाल सैनिकांच्या केवळ निर्भीड शौर्यामुळेच लाल सेना ठिकठिकाणच्या कोंड्या फोडून पुढे जाण्यात यशस्वी होत गेली.

[ अपूर्ण ]

## पुस्तके

# नाद

आजचे मराठी वाङ्मय फारच झपाट्याने विस्तारत आहे. साहसकथा, विज्ञान-कथा, रहस्यकथा, सामाजिक–ऐतिहासिक कादंबऱ्या, टीकावाङ्मय, रहस्यपूर्ण नाटके अशा कितीतरी अंगोपांगांनी त्यात प्रतिदिनी नवी नवी भर पडत आहे. मध्यमवर्गीय माणसाच्या सुखदुःखाबरोबरच दलितांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी यांना वाङ्मयात स्थान मिळू लागले आहे. या साऱ्या गोष्टी वरवर पाहता मराठी वाङ्मयाचा विकास दर्शविणाऱ्या असल्या, तरी या सर्वांत मन प्रसन्न करणारे, वाचकाला अखेरच्या पानापर्यंत खेचीत नेणारे वाङ्मय किती, असा प्रश्न केला तर मात्र या साऱ्या गोष्टींत उणीव भासू लागते. मन नाराज होते.

या अपरंपार भांडारात क्वचित एखादेच पुस्तक काही नाव घेण्याजोगे, आवर्जून वाचण्याजोगे असते, असे आढळून येईल. श्री. गोपालकृष्ण भोबे यांचा 'नाद' हा संग्रह असेच लोभसवाणे वेगळेपण व्यक्त करणारा आणि म्हणूनच वाचायला घेतल्यावर शेवटपर्यंत खाली ठेवावासा न वाटणारा असा आहे. प्रत्येक पानन् पान अशा प्रसन्न शैलीने नटलेले आहे, की वाचक त्याकडे आकृष्ट न झाला तरच नवल !

# प्रसन्न शैलीने नटलेला संग्रह

असा हा 'नाद' आहे तरी कसला ? श्री. मोबे यांच्याच शब्दांत सांगायचं तर "या पुस्तकात वेल्हाळपणे सांगितलेल्या संगीत गोष्टी आहेत." आता गोष्टी सांगायच्या म्हणजे त्यांत एक महत्त्वाचे पथ्य पाळावे लागते आणि ते म्हणजे त्यांत अखेरपर्यंत टिकणारी रंजकता ! पण श्री. मोबे यांची शैलीच अशी रसाळ आहे की रंजकता आणण्यासाठी त्यांना वेगळे कष्ट करावेच लागत नाहीत. या संग्रहातील प्रत्येक पान आणि त्यातील प्रसंग मरगळलेल्या मनाला उत्साहित करण्याच्या योग्यतेचा आहे.

भारतवर्षात कलाक्षेत्राइतके समृद्ध क्षेत्र कुठलेच नाही. कितीतरी विविध कला इथे जोपासल्या गेल्या, भरभराटीला आल्या. अशा सर्वांमध्ये नृत्य आणि संगीत यांना तर अग्रक्रम द्यावा लागेल. कारण कला म्हणून त्या जशा श्रेष्ठ दर्जाच्या आहेत त्याचप्रमाणे त्यांची साधनाही खडतर आहे. कलाकाराचा कस पाहणारी आहे. अशा या कलेची साधना करणारे जे महान कलाकार होऊन गेले, आजही आहेत, त्या सर्वांचे आयुष्य म्हणजे एकेक चमत्कार आहे. त्यांच्या कलेचा आस्वाद घेणे म्हणजे एक महान आनंद आहेच. पण हा आस्वाद घेणे सर्वांनाच कसे जमावे ? त्यासाठी सहृदयता तर हवीच. पण ही साधना किती खडतर आहे, याचेही ज्ञान हवे ! मोबे यांच्याजवळ हे दोनही गुण पुरेपूर असल्याने त्यांनी आजवर जे काही ऐकलं, पाहिलं, ज्या अदभुत् गुणवैशिष्टचाने त्यांना मुग्ध केले; ते सारे प्रसंग, त्या गोष्टी तुमच्या-आमच्यासाठी त्यांनी इथे रेखाटल्या आहेत. ते भांडार खुले केले आहे.

आपली कला ही गुलाम आहे याची जाणीव होऊन तडफडणारा संगीतसम्राट तानसेन (रामतनू मिश्रा). सम्राटाने त्याच्या कलेचा बहुमान केला तरी गुस्तई विठ्ठलनाथासारख्या कलातपस्व्याकडून आपल्याला श्रेष्ठ नायकपद मिळावे म्हणून त्याचा आत्मा तडफडत आहे; पण त्याच्या कलेची किंमत त्या श्रेष्ठींनी, पंडितांनी कवडीकिंमतीची ठरविली. कलेच्या सामर्थ्याचा रामतनूने अपव्यय केला म्हणून त्यांनी त्याचा अपमान केला. ह्या अपमानाचा वणवा मनात पेटलेला असतानाच रामतनू मिश्रा निधन पावला. कलेचे सामर्थ्य, संप्रदायाचे संकेत, कलेचे स्वातंत्र्य यांच्याविषयी बेफिकीर राहणाऱ्या या महान कलाकाराची हृदयविदारक शोकान्तिका

## ग्रं थ वा र्ता

श्रीगजाननाच्या प्रेरणेने व आशीर्वादाने '**श्रीगणेश प्रताप**' नावाचा, गणेशपुराणावरून ११७ वर्षांपूर्वी श्री. नातू यांनी प्राकृतात ओवीबद्ध केलेला ग्रंथ चैत्र शु. प्रतिपदा शके १८८९ रोजी प्रसिद्ध होत आहे.

सदर ग्रंथामध्ये ५६ अध्याय असून ओवीसंख्या ५६६५ आहे. (ग्रंथ २ खंडात आहे. खंड १ ला 'उपासना खंड' २२ अध्यायांचा व खंड २ रा 'क्रीडा खंड' ३४ अध्यायांचा.) हा ग्रंथ आख्यान कवी श्रीधरांच्या पद्धतीस अनुसरून लिहिलेला असून तो समजण्यास अत्यंत सुलभ आहे. ग्रंथात अष्टविनायकांची उत्पत्ती–कथा, दूर्वामाहात्म्य, शमीमाहात्म्य, उंदीर हे श्रीगणेशाचे वाहन कसे झाले, श्रीगणेशाचे तीन अवतार कोणते इ. विषयांसंबंधी खूप माहिती आहे.

ग्रंथ डबल क्राऊन आकाराचा सुमारे ४०० पृष्ठांचा पोथीपद्धतीचा, पांढऱ्या उत्तम कागदावर मोठ्या टाइपात उत्तम छपाईयुक्त, हाफ्‌बाऊंड (बाईंडिंग) असून सोवळ्यातही वापरावयास चालेल. मुखपृष्ठावर चित्रकार दीक्षित यांनी चितारलेले ऋद्धिसिद्धिसहित श्रीगजाननाचे चार रंगांत मनोहर दर्शन, ग्रंथात सुरुवातीला आर्टपेपरवर थोड्या माहितीसह महागणपतीदर्शन, वेदमूर्ती पंडितजी सातवळेकर यांचे श्रीगणेश उपासकांसाठी चार शब्द असे ग्रंथाचे अंतर्बाह्य स्वरूप राहणार आहे.

'**श्रीगणेश प्रताप**' ग्रंथाची किंमत फक्त १५ रुपये असून प्रसिद्धीपूर्वी पैसे भरून ग्रंथाची नोंदणी करणाऱ्या गणेशभक्तांना **रु. ११–२५** किंमतीला देणार आहे. बाहेरगावच्या गणेशभक्तांनी पोस्टेजसाठी **२ रुपये** अधिक पाठवावेत.

'श्रीमयूरेश प्रकाशन' रुक्मिणी निवास, ब्लॉक नं. २ मोरबाग रोड, दादर, मुंबई नं. १४ यांचेतर्फे ग्रंथ प्रकाशित होत आहे.

**ग्रंथ-नोंदणी करण्याचा पत्ता :**

श्री. माधव त्रिंबक परचुरे

बलवंत पुस्तक भांडार, गिरगाव नाका, मुंबई नं. ४

**मुंबई व पुणे येथील प्रमुख ग्रंथविक्रेत्यांकडेही नोंदणी सुरू आहे.**

भोव्यांनी समर्थपणे सांगितली आहेच; पण त्याचप्रमाणे त्यात हळूवारपणाही ओतप्रोत भरलेला आहे. आणि म्हणूनच कुणाच्याही मनाला हे प्रकरण चटका लावून जाते.

**जुगलबंदी-संगीतातील झुंज**

आपल्या कलासामर्थ्याविषयी ज्यांना जबरदस्त आत्मविश्वास असतो ते त्या कलेनेच आव्हान देत आपले श्रेष्ठत्व सिद्ध करतात. संगीतक्षेत्रात ' जुगलबंदी ' या शब्दात हे भयानक आव्हान साठविलेले असते. यामध्ये जसे कलाकाराला श्रेष्ठत्व देण्याचे सामर्थ्य असते, त्याचप्रमाणे त्याला नामशेष करण्याचीही ताकद सामावलेली आहे. अशा या झुंजीचे वर्णन ' जुगलबंदी या प्रकरणात मांडले आहे. पतियाळाच्या फत्ते-अलीखाँ यांनी विजिगीषु वृत्तीने असेच एक आव्हान दिले. आधीच होऊन गेलेल्या त्यांच्या बैठकीने ग्वाल्हेर दरबारात त्यांचा वचक बसला होता. त्यांना मागे टाकू असा विश्वास कोणत्याच दरबारी गायकाला नव्हता. पण याच वेळी दरबारची अब्रू वाचविण्यासाठी शंकरलाल नावाचा एक सामान्य गायनमास्तर पुढे आला. आपल्या तेजस्वी, बुलंद गाण्याने आणि शास्त्र-ज्ञानाने पाहुण्या फत्तेअलीखाँ यांना त्याने मंत्रमुग्ध केले. अशा या सामान्य वाटणाऱ्या पण थोर गुणवत्तेच्या शंकरलाल-बरोबरच संगीतक्षेत्रात मानाचं पान मिळविणाऱ्या बैजूबावराची झालेली जुगलबंदीही भोव्यांनी मोठ्या खुमासदार आणि वेधक पद्धतीने रंगविली आहे. भोव्यांची लेखन-शैली नुसती आकर्षकच नाही तर जाताजाता या जुगलबंदीमागील बैजूचे जिद्दी, निष्ठावान पण शेवटी विरक्त झालेले मनही भोव्यांना समजले आहे. आणि त्या मनाचेही दर्शन ते घडवितात. हा फार मोठा विशेष !

पण ही झाली वानगी. टप्पा गायकी निर्माण करणारे शौरी मियाँ, बंदेअलीखाँ, आणि कलेसाठी स्वत:ला समर्पण करून घेणारे चुन्ना, ज्ञान देणारे पण तान तुटू न देणारे हस्सूखाँ, खूष झालेल्या गव्हर्नरकडून रेल्वेचा फुकट पास मागून घेणारे निस्सार हुसेन खाँ, असे अनेक कलाकार आणि त्यांचे कित्येकदा विक्षिप्त वाटणारे जीवन भोव्यांनी समजावून घेतले आहे. आणि तितक्याच प्रसन्नपणे रंजकतेने. त्या कलाकारांवर जरादेखील अन्याय होऊ न देता आपल्यापुढे मांडले आहे.

तसे पाहू गेले तर पुस्तकाचे सरळसरळ दोन भाग होऊ शकतील. पहिला भाग म्हणजे होऊन गेलेल्या बुजुर्गांविषयीच्या आठवणी, आणि आख्यायिका. आता अशा या कथांतील ऐतिहासिकता कुणी तपासू म्हणेल तर तो केवळ एक वेडेपणा ठरेल. शिवाय या गोष्टी ऐतिहासिक सत्य आहेत, असा दावा खुद्द भोवेही करणार नाहीत. संगीतकलेची साधना करताना अपार श्रद्धा, निष्ठा आणि जिद्द या गोष्टी अंगी असाव्या लागतात. किंबहुना कोणतीही कला आत्मसात करायची म्हणजे या गुणांचा थोडा अतिरेक असणेच चांगले, आणि म्हणूनच क्वचित कधी लहरी-विक्षिप्त कलाकारांचे दर्शन घडते. अशा या गुणांचा परिपोष झालेल्या जुन्या कलाकारांचा परिचय हा भोव्यांच्या ' नाद 'चा एक सर्वांत मोठा विशेष आहे.

त्या अनंत संगीत गोष्टींपेक्षा धुंद करणाऱ्या संगीताचा प्रत्यक्ष प्रत्यय भोवे जेव्हा शब्दांकित करू पाहतात तेव्हा त्यांच्या शैलीचा एक वेगळाच डौल प्रत्ययास येतो. कलेचा आस्वाद म्हणजे आत्मानुभूती आहे. अमूक एक गायक कसा गायला, असे विचारले तर त्याच्या गाण्याचे कणभर वर्णन करणेसुद्धा कदाचित शक्य होणार नाही. फार तर त्या गाण्याने आपली अवस्था काय झाली, हे सांगता येईल. ते गाणे शास्त्रसंगत होते किंवा काय, हे कदाचित सांगता येईल. पण हा अनुभव शब्दांत साकार करणे कसे शक्य आहे ? भोव्यांनी मोठमोठ्या मैफिलींची वर्णने कसोशीने टाळली आहेत हे वैशिष्टच !

### मैफिलींचे नेटके वर्णन

पण तरीसुद्धा त्यांनी ऐकलेल्या मैफिलींचे वातावरण, त्या वेळी आलेला बेभानपणा, आणि विशेष जाणवलेल्या एखाद्या गोष्टीचे रेखीव वर्णन ते मोठ्या बहारीने करतात. ओंकारनाथांच्या मर्चंट-क्लबमधील गाण्याच्या वेळचे वातावरण, ओंकारनाथांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांचे ते अलौकिक गाणे यांनी भारावून गेलेले भोवे लिहितात, " सारे सभागृह मुग्ध झाले होते. विस्मित होऊन पंडितजींची किमया ऐकत होते. काडकन् आवाज करून विजली चमकावी तशी एकेक अतिद्रुत तान येत होती. काय सांगू ? किती सांगू ? असे परिणामकारक, मंत्रमुग्ध करणारे मर्दानी गाणे मी तोपर्यंत ऐकलेले नव्हते. " शब्दांच्या मर्यादा आणि सामर्थ्य या दोनही गोष्टी पूर्णपणे जाणणारे भोवे कलेचा अनुभव नुसत्या दृष्टांतांनी समजाविण्याच्या भरीस पडत नाहीत. बडे गुलाम अलीखाँ, गिरीजादेवी, सुरेशबाबू यांच्या मैफिलींचेही असेच नेटके पण वेधक चित्रण ह्या संग्रहात आढळेल.

नृत्याचाही रमणीय साक्षात्कार त्यांना झालेला आहे. रोशनकुमारी, मंजुश्री बानर्जी, सितारादेवी अन् बिरजू महाराज यांच्या नृत्यांचे वर्णन करणे फार कठीण काम ! पण या नृत्याचा जो विलक्षण परिणाम रसिक आणि मर्मज्ञ भोव्यांवर झाला, त्याचे वर्णन वाचताच मूळच्या कलेचे सामर्थ्य, दर्जा कळून येईल आणि म्हणूनच ते वर्णन प्रत्येकाने मुळातूनच वाचणे जरूर आहे.

आणि कलाकारही अखेर माणूसच आहे. कलेच्या मागे लागल्यावरही त्याच्यातला माणूस जागा राहतो आणि मग असा हा सामान्य माणूस आणि कलाकार यांच्यात कधी संघर्ष होतो. कधी समेळ होतो. गिरिजादेवी, अल्लारखाँ, राम नारायण अशा विद्यमान किंवा अनेक होऊन गेलेल्या कलाकारांची विस्तृत किंवा छोटी शब्दचित्रे भोवे सहजसुंदरतेने रेखाटतात.

आणि हे सारे वाचताना प्रकर्षाने लक्षात येतो तो भोव्यांचा दीर्घ अनुभव, व्यासंग आणि नाद. तबल्याची निर्मिती कशी झाली, सतारीची कशी झाली, सारंगीचा विकास कसा झाला, त्यातले पूर्वासूरी कोण होते, त्यातले बाज कोणते, घराणी कोणती, धृपद, धमार, ख्याल, ठुमरी, टप्पा यांची निर्मिती कशी झाली, कुणी केली,

संगीतकला कशी निर्माण झाली, लोकसंगीतातून का यदृच्छया, त्या कलेच्या क्षेत्रातले संकेत वगैरे विविध महत्त्वाच्या गोष्टीही जाताजाता सांगायला ते विसरत नाहीत आणि हे सारं भांडार त्यांच्याजवळ अमाप आहे. कष्टाने, तळमळीने जमविलेले आहे. ते एकदा नजरेखाली घालणं हा तर आनंद आहेच, पण त्यातल्या कितीतरी गोष्टी सदैव साठवून ठेवाव्या अशा आहेत. आता ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे तो त्या उचलणार इतकेच !

'अख्तरमियाँ' या प्रकरणाचा स्वतंत्ररीत्या मुद्दाम निर्देश करायला हवा. एका रसिकाग्रणीची ही दर्दभरी कहाणी. लखनौचा हा केवळ नामधारी बादशहा. त्याने सारा जन्म कलाविलासात घालविला. वेड्या रसिकांचा तर हा केवळ अग्रणी. अशा या अख्तरमियाँप्रमाणे रसिक वाचक आयुष्याचे काही क्षण जरी जगला तरी श्रेष्ठ कलावंत म्हणजे काय हे सहज कळून येईल.

प्रत्येकाने एकवार तरी हा संग्रह वाचावा इतका तो छान आहे. भोब्यांकडून अशाच तऱ्हेचे विपुल, कसदार आणि समर्थ लिखाण उत्तरोत्तर लिहिले जावो, अशी अपेक्षा !

**—सुधीर दामले**

**[ "नाद" : लेखक : गोपालकृष्ण भोबे, प्रकाशक : पॉप्युलर बुक डेपो ]**


# "डायमंड"

## टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

**डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,**

११८० बुधवार पेठ, पुणे २.

## डायमंड वॉच कंपनी

**११७९ बुधवार पेठ, पुणे २.**

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारचा घड्याळे व इन्स्ट्रूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.




ॲड. माधव कानिटकर

लेखांक – तिसरा

*अचानक कर्तारसिंग आणि करमसिंग गाव सोडून गेले. सगळं गाव आश्चर्यचकित झालं. तरीसुद्धा गावकऱ्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला. आता कुणाच्या घराला 'आपोआप' आगी लागणार नव्हत्या, लूटमार, मारामारी होणार नव्हती. काहींच्या मनात मात्र संशयाची पाल चुकचुकली. त्यांना फार वेळ संशयात राहावे लागणार नव्हते.*

*इन्स्पेक्टर हझारासिंगांच्या टेबलावरचा फोन खणाणला. "सरपंच हरजितसिंग आणि गज्जनसिंग या दोघांचा सिंघावाला खेड्यात खून झाला."*

*इन्स्पेक्टरसाहेबांची जीप व त्याच वेगानं त्यांच्या डोक्यातले विचार धावू लागले ...*

# पंजाबमधील

# एक गाजलेला खून खटला

" **मी** आणि गज्जनसिंग इथे अंगणात बसून गप्पा मारत होतो. त्याची बायको आणि मुलगा हे असे इथेच बसले होते. कुठून कोण जाणे, पण अचानक करमसिंग आणि त्याचे तीन साथीदार आमच्यासमोर येऊन उभे राहिले. त्यांच्यापैकी एका साथीदाराच्या हातात कुऱ्हाड चमकत होती आणि बाकिच्यांच्या हातात बंदुका होत्या ! त्यांना पाहिल्याबरोबर आम्ही चमकलो ! आम्हांला उठायचीदेखील फुरसत न देता—एका क्षणात—काहीही न बोलता, न विचारता त्यांनी आमच्यावर बंदुकीच्या फैरी झाडल्या ! कानठळ्या बसविणारा आवाज झाला, धुराचे लोट उठले आणि पायाला जबरदस्त दुखापत झाल्याबरोबर मी गव्हाणीत जीवघेणी उडी मारली ! माझे केविलवाणे ओरडणे त्या गोंधळात कुणीच ऐकले नाही. मी ती उडी कशी मारू शकलो, याचे आता मला आश्चर्य वाटतंय इन्स्पेक्टरसाहेब ! पुन्हा तशी उडी मला मारता येणार नाही ! गुरांपुढे बांधलेल्या २।।—३ फूट उंचीच्या भितीमागे मी पडून राहिलो आणि हा सगळा प्रकार एका क्षणात घडला. बंदुकांचे आवाज बंद झाल्याबरोबर मी भीतभीतच मान वर काढून कानोसा घेतला. हल्लेखोर अंगणाचं फाटक उघडून बाहेर पडत होते—आणि अंगणात रक्ताच्या थारोळ्यात गज्जनसिंग अस्ताव्यस्त मरून पडला होता ! इतका प्रकार घडेपर्यंत मी माझ्या पायाकडे पाहिलेच नव्हते ! खरं म्हणजे तो सुरुवातीला बसलेल्या फटक्यानंतर फारसा दुखतही नव्हता ! गव्हाणीत उठण्याचा प्रयत्न केल्याबरोबर जबरदस्त कळ उठली आणि मी खाली कोसळलो ! माझ्या पायाकडे पाहिल्याबरोबर मी ढसढसा रडू लागलो. पायातून अजस्त्र रक्तस्राव होत होता ! पायाचे हाड बाहेर पडले होते, भाजलेले मांस भेसूर रीतीने लोंबत होते ! पायाच्या वेदनेपेक्षा माझ्या नजरेनेच ती जखम अधिक भयानक झाली होती ! माझ्या अंगाला दरदरून घाम फुटला. घशाला अचानक कोरड पडली—".

त्या प्रसंगाच्या आठवणीने निरंजनसिंग एकाएकी रडू लागला ! इन्स्पे. हझारासिंगांनी त्याच्या पाठीवर थोपटल्यासारखे केले—पाठीमागच्या जीपमधून आलेल्या डॉक्टरांनी निरंजनसिंगाच्या मणक्यात इंजेक्शन देऊन त्याचा जखमी पाय बधीर करून टाकला ! प्राथमिक उपचार करून त्यांनी एका लाकडी फळीवर त्याचा पाय बांधून काढला आणि जखम दिसू नये म्हणून वर हलकेच बँडेज बांधले. " थँक्यू

डॉक्टर ! " अशा अर्थाने डॉक्टरांकडे पाहिल्यासारखे करून इन्स्पे. हझारासिग निरंजनसिगाच्या कानाशी लागले आणि "पुढे ? " असा प्रश्न त्यांनी हलक्या आवाजात विचारला !

गुडघ्यात घातलेली मान वर करून निरंजनसिंगाने फाटलेल्या शर्टाच्या बाहीने डोळे पुसले आणि तो पुढे सांगू लागला. "…भिंतीचा आधार घेऊन मी थोडासा पुढे सरपटत गेलो आणि माझ्या अंगावर काटा उभा राहिला ! हल्लेखोर शेजारच्या गल्लीच्या तोंडावरच उभे होते ! कुऱ्हाड घेतलेले साथीदार टेहळणी करीत होते ! आणि त्याच गल्लीमधून हरजितसिंग आणि त्याचा मुलगा बैलगाडीतून येत होते. मुलगा गाडी हाकत होता आणि गाडीतल्या पोत्यांवर हरजितसिंग मजेत बसला होता. अचानक हरजितसिंग पोत्यावर ओणवा उभा राहिला ! जिवाच्या धास्तीने मी त्याला इशारे देऊ शकलो नव्हतो. समोरच 'तय्यार'मध्ये उभ्या असलेल्या चौघांना हरजितसिंगाने पाहिले होते ! बैलगाडीतून एकदम रस्त्यावर उडी मारून हरजितसिंग जीव घेऊन पळत सुटला होता ! त्या चौघांनी गाडी तशीच जाऊ दिली ! आणि गाडीच्या मागच्या दिशेने तोंड करून पळणाऱ्या हरजितसिंगावर इतक्या जलद गतीने फैरी झाडल्या, की पळणारा हरजितसिंग आकडी आल्यासारखा वेड्यावाकड्या हालचाली करीत धडपडत खाली पडला ! इतक्या लांबूनदेखील त्याचे ते धडपडणारे शरीर नखशिखान्त तांबडेलाल दिसत होते ! क्षणार्धात त्याच्या सर्व हलचाली थंडावल्या !

हल्लेखोर मागे सरकल्यासारखे वाटले म्हणून जमिनीकडे तोंड करून पडून राहिलो आणि...आणि पुढचं मला काहीच आठवत नाही! शुद्धीवर आलो तेव्हा हल्लेखोर पळून गेले होते !"

"निरंजनसिंग, आता फक्त एकच प्रश्न – हल्लेखोरांनी तोंडावर बुरखे घातले होते ? "

" नाही साहेब."

" त्यांच्यापैकी तुझ्या ओळखीचे... ? "

" फक्त करमसिंगाला ओळखला साहेब ! "

" आणखी कोणाला ? "

" बाकिच्यांना मी ओळखत नव्हतो साहेब ! "

इन्स्पे. हझारासिंगांच्या पुढे एक गंभीर प्रश्न पडला. निरंजनसिंगाने कर्तारसिंगाचे नाव अजिबात घेतले नव्हते ! खुनाच्या वेळी तो तिथे नव्हताच ! आपला अंदाज चुकलाच तर !

गज्जनसिंगाची बायको, त्याचा मुलगा आणि हरजितसिंगाचा मुलगा यांनी आपापल्यापुरत्या दिलेल्या जबान्यांत निरंजनसिंगाने सांगितलेल्या हकीकतीतील काही भाग जसेच्या तसे पुन्हा सांगितले आणि त्या सर्वांनी एक विशेष महत्त्वाची



**आणि हरजितसिंग**
**आकडी आल्यासारखा**
**खाली पडला.**
**... त्याच्या सर्व**
**हालचाली थंडावल्या.**

गोष्ट कायम केली होती ! कर्तारसिंगाचे नाव त्यांच्यापैकीही कोणी घेतले नव्हते ! फक्त करमसिंग आणि त्याचे तीन अनोळखी साथीदार !

पण नेमक्या याच संगतीने इन्स्पे. हझरासिंगांचा कर्तारसिंगाविषयी असलेला संशय कायम केला होता ! कारण कर्तारसिंग आणि करमसिंग म्हणजे 'यत्र यत्र धूमः तत्र तत्र वन्हीः ।' एवढे धाडसी खून एकटयाने करण्याचे कारण (Motive) किंवा डोके करमसिंगाला नव्हते ! करमसिंग निश्चित खुनी आहे याचाच अर्थ कर्तारसिंगही निश्चित खुनी असलाच पाहिजे ! मात्र तसे शाबीत करणारा पुरावा अजून तरी इन्स्पे. हझरासिंगांना मिळला नव्हता.

रिकाम्या काडतुसांचा आणि प्रेतांचा पंचनामा करायला सांगून साहाय्यक अधिकाऱ्यावरोबर त्यांनी निरंजनसिंगाला सरकारी इस्पितळात नेण्याचा हुकूम दिला. इन्स्पे. हझरासिंग जीपमध्ये बसले. जीपच्या चाकापेक्षाही त्यांची विचारचक्रे एकीकडे अधिक गतीने चालू होती.

'निरंजनसिंगाने सांगितलेली हकीकत कितपत खरी असेल ? का खरी असू नये ? वास्तविक कर्तारसिंग या सर्व साथीदारांचा कट्टर शत्रू आहे. त्याचे नाव त्यांना आकसाने सहज गोवता आले असते. नव्हे तशी सुवर्णसंधी त्यांना चालून आली होती ! पण असे असूनदेखील त्यांच्यापैकी कोणीही कर्तारसिंगाचे नाव घेत नव्हता. खून झालेले प्रत्यक्ष डोळयांनी पाहिलेले (Eye-witnesses) साक्षीदार ठामपणे सांगतात की, खून झाले त्या वेळी कर्तारसिंग त्यांच्यांत नव्हता ! फक्त करमसिंग आणि त्याचे तीन

अनोळखी साथीदार! निरंजनसिंगाला बनावट हकीकत तयार करून सांगायला पुरेसा वेळदेखील मिळालेला नाही! त्याने सांगितलेली हकीकत खरी असली पाहिजे! पण मग करमसिंगाबरोबरची ती तीन अनोळखी माणसे कोण होती? या भयानक हत्याकांडात भाग घेण्याचे त्यांना कारणच काय? त्या तीन अनोळखी व्यक्ती कर्तारसिंगाच्या टोळीतल्याच असतील किंवा कदाचित नसतीलही! करमसिंगाने आपला चेहरा लपविण्याचा यत्किंचितही प्रयत्न केलेला नाही. त्याच्याबरोबर असलेल्या तीन अनोळखी व्यक्तींचे वर्णन सिंघावाला खेड्यातले लोक करू शकत होते पण त्यांच्यापैकी एकाचेही नाव त्यांना ठाऊक नव्हते!'

पोलिस स्टेशनच्या आवारात एक झकास वळण घेत असतानाच, काही का असेना प्रथम कर्तारसिंगाचा व करमसिंगाचा ठावठिकाणा शोधून काढला पाहिजे, या विचाराने इन्स्पे. हझारासिंगांच्या मनात घर केले.

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी कर्तारसिंगाच्या घरीच जाण्याचे इन्स्पे. हझारासिंगांनी ठरविले! कर्तारसिंगाच्या घराला कुलूप होते! इन्स्पे. हझारासिंगांनी शेजारीपाजारी चौकशी सुरू केली. कर्तारसिंग किंवा त्याच्या कुटुंबियांपैकी कोणीच गावात नव्हते! शेजारच्या घरातील एका माणसाला इन्स्पे. हझारासिंगांनी सहज म्हणून विचारले आणि चौकशी करणारा इसम हा बडा पोलिस अधिकारी आहे हे न समजल्यामुळे त्यांना कर्तारसिंगाचा 'पाहुणा' समजून तो शेजारी पटापट उत्तरे देऊ लागला!

"केव्हा गेले सर्वजण इथून...?"

"कर्तारसिंगांना जाऊन ४–५ दिवस झाले."

"कुठे गेले ते?"

"मला नक्की ठाऊक नाही, पण आग्र्याला गेले असं ऐकलं!"

"आग्र्याला कोण आहे त्यांचं?"

"तिथं त्यांची स्वतःची ट्रान्स्पोर्ट फर्म आहे! ते नेहमीच जात-येत असतात तिथून."

"अस्सं!...आणि बाकीचे लोक?"

"कोण जाणे बुवा...पण काल दुपारी त्यांची 'ती' घन्नो, तिचा भाऊ बचनसिंग आणि करमसिंग दरवाजात उभे राहून गप्पा मारीत होते!–"

"––––"

"नंतर २–३ माणसं तिथं आली."

"तुम्ही ओळखता त्या २–३ माणसांना?"

"नाही बुवा, नवीनच दिसली!"

"अच्छा! मी चलतो तर!"

इन्स्पे. हझारासिंगांना धागा सापडला होता! 'कामा'ला निघण्यापूर्वी कर्तार-

सिंगाच्या घरातून करमसिंग बाहेर पडला होता ! 'ती' तीन माणसे त्याला तिथेच येऊन मिळाली होती ! आणि 'त्या' तीन माणसांना धन्नो आणि बचनसिंग ओळखत असली पाहिजेत ! त्या दोघांना तावडतोब पोलिस स्टेशनवर आणायला पाहिजेच. माणूस एकदा का पोलिस स्टेशनवर आला, की त्याला बोलता करून त्याच्याकडून खरं काय ते काढून घेण्याची कला इन्स्पे. हझारासिंगांना चांगली अवगत होती! आणि दुसरी गोष्ट म्हणजे कर्तारसिंग आग्र्यात आहे की नाही, ते पाहणं अत्यंत आवश्यक होतं !

दरवाजाकडे पाहत इन्स्पे. हझारासिंग ओरडले,—

"५७२६ ऽऽ!"

"यस् सर् ऽऽऽ!"

"आत्ताच्या आत्ता बचनसिंगाच्या घरी जा."

"यस् सर् ऽऽ !"

"......आणि त्याला येताना इकडे घेऊन ये."

"जी साहेब......"

"......आणि हे बघ."

"यस् सर् ऽऽ"

"ती धन्नो दिसली तर तिलाही घेऊन ये ऽऽ"

"यस् सर् ऽऽऽ"

कॉन्स्टेबल गेल्याबरोबर इन्स्पे. हझारासिंगांनी बंदुकीचे लायसेन्स बाळगणाऱ्या लोकांची यादी असलेले पुस्तक काळजीपूर्वक पाहायला सुरुवात केली ! कर्तारसिंग आणि करमसिंग या दोघांनीही बंदुका बाळगण्याची लायन्सेस फार पूर्वीच मिळवली होती ! आणि ती अजूनही त्यांच्याच नावांवर होती ! कदाचित कर्तारसिंगाची बंदूक या खुनात वापरली गेली असेल ! हातातल्या लाल पेन्सिलीने त्यांनी दोघांच्या नावांखाली रेघा ओढल्या. लायन्सेस नंबर्स, पुस्तक–क्रमांक, व पृष्ठक्रमांक केस-पेपर्सवर टिपून ठेवले व पुस्तक दूर केले !...... आणि ट्रान्स्पोर्ट कंपन्यांचे रजिस्टर चाळायला सुरुवात केली ! आग्र्याला असलेल्या कर्तारसिंगाच्या ट्रान्स्पोर्ट कंपनीत कुंदनसिंग नावाचा आणखी एक पार्टनर होता ! त्या तीन अनोळखी माणसांपैकी एक कुंदनसिंग तर नसेल ? सराईत गुन्हेगारांचे निरनिराळ्या अँगल्सनी घेतलेल्या फोटोंचा आल्बम इन्स्पे. हझारासिंगांनी मागविला......आणि गावकऱ्यांनी दिलेल्या वर्णनाबरहुकूम त्यांच्यापैकी कोणी आहे की काय, हे प्रत्येक फोटोकडे निरखून पाहत त्यांनी पडताळून पाहायला सुरुवात केली !

५७२६ ने अचानक आत येऊन सलाम ठोकला. तशी इन्स्पे. हझारासिंगानी मान वर केली.

"बचनसिंग कुठाय ?"

"तो घर सोडून गेलाय साहेब !"

"चौकशी केलीस ?"

"होय साहेब ! काल सकाळी तो घर सोडून गेला तो अजून आलेलाच नाही !"

"......आणि घन्नो ? "

"ती पण त्याच्याबरोबर गेलीय् साहेब !"

"जा परत तसाच ! आणि घरावर पाळत ठेव."

पुन्हा एकदा सलाम ठोकून कॉन्स्टेबल निघून गेला !

त्यानंतर अनेक दिवस काम करूनदेखील इन्स्पे. हझरासिंगांना महत्त्वाचे असे काहीच मिळाले नाही ! अनेक इसमांना त्यांनी बक्षिसाची लालूच दाखविली. कुणाबरोबर गोड बोलून पाहिलं ! कुणाला पोलिस स्टेशनवर बोलावून तासन् तास प्रश्न विचारून हैराण केला ! तर कुणाला इन्क्वायरी रूममध्ये नेऊन यथेच्छ बडवला ! केविलवाणा रडेल इतका ठोकला ! पण रामा–शिवा–गोविंदा ! साम–दाम–दंड–भेद सगळे उपाय थकले ! अनेक 'दादा' लोक मार खाऊन थकले ! पण कर्तारसिंग, करमसिंग, घन्नो किंवा बचनसिंग यांचा काहीच पत्ता लागत नव्हता ! आग्रा पोलिसांकडून आलेल्या 'रिपोर्टात' कर्तारसिंग आणि कुंदनसिंग आग्र्यात नसल्याचे समजले ! त्यांच्या ट्रान्स्पोर्ट कंपनीच्या ट्रक्सपैकी एकही ट्रक सबंध पंजाबात कुठेच नव्हता ! आणि त्यांच्या ट्रान्स्पोर्ट कंपनीच्या जागेत दुसरीच कुठलीतरी ट्रान्स्पोर्ट कंपनी तळ ठोकून होती ! कंपनीच्या नावाचा बाहेरचा ट्रेडमार्क आणि साईनबोर्ड बदलून तिथे नवी पाटी झळकत होती. . . . !

अखेरचा उपाय म्हणून इन्स्पे. हझरासिंगांनी पंजाबमधल्या प्रमुख वृत्तपत्रांतून 'WANTED' अशा ठळक शीर्षकाखाली 'कर्तारसिंग हा पोलिसांना हवा असलेला गुन्हेगार आहे,' अशी जाहिरात त्याच्या फोटोसकट प्रसिद्ध केली ! आणि त्याच 'जाहीर खबरी' खाली कर्तारसिंग एका आठवड्याच्या आपण होऊन पोलिस स्टेशनवर हजर न झाल्यास त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्यासाठी योग्य ती कायदेशीर पावले टाकली जातील, अशीही त्याला धमकी देऊन ठेवली ! एकीकडे कसून शोध चालू ठेवला.

......एक आठवडा उलटून गेला. कर्तारसिंग कुणाच्याही हाताला लागला नाही, की तो आपणहूनही पोलिस स्टेशनवर आला नाही !

क्वचितच चिडणारा माणूस एकदा का चिडला म्हणजे त्याचा चेहरा जसा दिसतो तसा इन्स्पे. हझरासिंगांचा चेहरा दिसू लागला.

कर्तारसिंगाच्या शोधासाठी आग्र्यात कायमचा तळ देऊन बसलेले सब–इन्स्पेक्टर हंसराज नुकतेच ड्यूटीवर येऊन चहाचा पहिला कप घेत होते, तोच टेलिफोनची घंटा खणखणली. एकीकडे चहाचा घोट घेता घेता हंसराजनी रिसीव्हर उचलला.

"हॅलो ; आग्रा पोलीस स्टेशन प्लीज ! S. I. हंसराज हियर !"

"इन्स्पे. हझरासिंग फ्रॉम मोघा पोलिस स्टेशन......ऽऽऽऽ......ऽऽऽऽ"

सब इन्स्पेक्टर हंसराजनी चहाचा कप चटकन् खाली ठेवला ! साहेबांच्या नुसत्या आवाजावरूनच ते तिकडे किती संतप्त झाले असले पाहिजेत, याचा त्यांना अंदाज आला होता ! टेलिफोनवरून इन्स्पे. हझरासिंगांनी सब इन्स्पे. हंसराजांची कडक शब्दांत हजेरी घेतली. निर्भर्त्सना केली. जणू काही इन्स्पे. हझरासिंग समोर उभे राहूनच 'फायर' करीत होते ! त्यांचे जळते शब्द कसेबसे ऐकून घेऊन त्यांनी कसातरी एकदा रिसीव्हर खाली ठेवला...आणि सब इन्स्पेक्टर हंसराजांची विचारशक्ती काम करू लागली....

६ एप्रिल १९५४ ला कर्तारसिंग व करमसिंग यांनी आग्र्याला जाण्यासाठी म्हणून तिकिटे काढताना त्यांना पाहिल्याचे सांगणाऱ्या साक्षीदाराची त्यांना सहज आठवण झाली आणि अचानक योग्य त्या दिशेने त्यांची कल्पना धावू लागली ! वरून दम मिळाला की त्याचा परिणाम 'खाली' असा चांगला होतो ! करमसिंग ८ एप्रिलला—खुनाच्या दिवशी—सिघावाला खेड्यात होता हे नक्की. मग कर्तारसिंग आग्र्याला कशासाठी आला असेल. सराईत गुन्हेगार प्रत्यक्ष गुन्हा करण्यापूर्वी त्यातून सुटण्याचा बचाव किंवा त्यासाठी हवा असलेला भक्कम पुरावा अगोदरच तयार करून ठेवतो आणि त्यातला नेहमीचा आणि सर्वांत सोपा बचाव म्हणजे "अमुक ठिकाणी गुन्हा घडला त्या वेळी मी तिथे नव्हतोच हा !" (Perfect Alibi) आणि हे सिद्ध करून देण्याचा सगळ्यात चांगला मार्ग म्हणजे गुन्हा घडण्याच्या वेळी स्वतःच कुठल्यातरी पोलिस कस्टडीत असणं ! यासाठी गुन्हा घडण्याच्या पूर्वीच काही तास अगोदर आरोपी स्वतःच कुठलातरी लहानसहान गुन्हा करून स्वतःला अटक करवून घेतो ! अचानक सब इन्स्पे. हंसराज यांच्या डोक्यात वीज चमकली ! ८ एप्रिल १९५४ ला कर्तारसिंगाने स्वतःला अटक करवून तर घेतली नसेल ? तसे असेल तर एक तर तो अजून कुठल्यातरी तुरुंगात असेल किंवा सुटला तरी जामिनावर असेल. त्याच पोलिस स्टेशनवर किंवा कोर्टात तारखांना हजर राहत असेल. मात्र वृत्तपत्रांत जाहिरात देऊनदेखील तो सापडला नव्हता याचाच अर्थ त्याने स्वतःला अटक करवून घेताना नाव आणि वेष बदलला असला पाहिजे ! कोलंबसाच्या आनंदाने सब इन्स्पे. हंसराजनी त्यांच्या जीपमध्ये उडी मारली – आणि आग्र्याच्या आजूबाजूच्या सर्व पोलीस ठाण्यांवर जारीने चौकशी सुरू केली – वायरलेसवरून संदेश पाठविण्यास सुरुवात केली—टेलिफोनवरून संधान बांधून चौकशी केली, की "अंदाजे ४२ वर्षे वयाचा, एकच डोळा असलेला कोणी गोरा पंजाबी शीख ७ किंवा ८ एप्रिलला एखाद्या गुन्ह्यावरून पकडण्यात आला होता का ? असल्यास तो आत्ता कुठे आहे ?"

[ अपूर्ण ]

नवी कहाणी स्मृती पुराणी

# वरच्या पातळी-वरील नाटक

रंगभूमि

शरद गोखले

'कथा कुणाची व्यथा कुणा' या नाटकाच्या उदंड लोकप्रियतेनंतर रंगभूमीवर आलेले गो. गं. पारखींचे नवे नाटक 'नवी कहाणी स्मृती पुराणी' अनेक दृष्टींनी वैशिष्टचपूर्ण आहे.

पारखींच्या या नवीन नाटकाभोवती रहस्याची वेवक गुंफण असली, तरी नाटक हे केवळ रहस्य निर्मिती व त्याची उकल एवढयापुरते मर्यादित न राहता मनोविश्लेषणात्मक भागावर भर दिला गेल्यामुळे त्याची उंची वाढली आहे.

'गजानन नाटच मंदिर' या मुंबईच्या नाटच संस्थेने मोठ्या जिद्दीने नाटक रंगभूमीवर उतरवले आहे. विजया खोटे, दत्ता भट, श्रीकांत मोघे यांसारखे मातब्बर कलावंत उभे राहिल्यावर नाटचप्रयोग चांगलाच रंगला. हे किंवा यासारखे अन्य प्रशस्तीपत्र देऊन प्रयोगाचे गुणगान करणे सहज शक्य आहे. परंतु या सर्व मंडळींची अभिनयाची जबरदस्त ताकद या पूर्वी अनेक वेळा मान्य करण्यात आली असल्याने पुन्हा तेच जुने गुऱ्हाळ लावण्यापेक्षा नाटकाचे लेखनात्मक मोल अजमावणे वास्तव ठरेल.

नंदा आणि आनंदा या आपल्या दोन मुलांना मृदुलाबाई तारेने बोलावून घेतात. आईची अपरंपार माया लाभल्याने तार पोहोचताच दोन्ही मुले धावत येतात. परंतु घरामध्ये आई नसल्याचे पाहून त्यांना धक्का बसतो.

आई आल्यावर व ती सुखरूप असल्याचे पाहिल्यावर स्वाभाविकपणे घरातील सर्व माणसे कौटुंबिक गप्पागोष्टींमध्ये गढून जातात.

आनंदी व सुखी कुटुंबाचे चित्र प्रेक्षकांसमोर उभे राहत असले तरी आईच्या वागणुकीतून व बोलण्यातून येणाऱ्या अकल्पित घटनांची चाहूल लागते.

बॅरिस्टर शिरवाडकरांच्या आगमनाने हा नवीन बदल स्पष्ट होतो.

आणि स्फोटक परिस्थितीमध्येच आपल्या व मृदुलेच्या (विजया खोटे) बॅरिस्टर शिरवाडकर (दत्ता भट) लग्नाची बातमी नंदा (कुमुद कानेटकर) व आनंदा (राजा वाणी) यांना सांगतात.

आपल्या श्रद्धास्थानाला तडा गेल्याचे पाहून नंदा व आनंदा दोघेही हबकून जातात. आपल्या वडिलांचा स्मृतिगंध ज्या घरामध्ये दरवळत आहे असे 'आपले घर'ही आईने विकून टाकावे, ही कल्पनाच दोघांना सहन होत नाही. दोघेही घर सोडून जातात ते कायमचे.

## सूडाचे जाळे

नाटककाराने दुसऱ्या अंकामध्ये उभ्या केलेल्या प्रसंगांना नाट्यमय झालर असली, तरी त्यांनी आपल्या समर्थ लेखणीतून उतरवलेल्या प्रसंगनिष्ठ नाट्याशी प्रेक्षक एकरूप होतो.

मृदुलेचे पूर्वायुष्य मोठे नाट्यमय असते. आपले प्रेम वडिलांजवळ व्यक्त करून, मनाजोगता पती मिळवण्याच्या कल्पनेवर शिक्कामोर्तब करून घेण्यास असमर्थ ठरलेली मृदुला प्रेमपूर्तीच्या ओढीने लग्नमंडपातून पलायन करते. बिचारा नवरा-मुलगा–मुकुंद खिरे–याची अवस्था विलक्षण केविलवाणी होते.

वर्षांमागून वर्षे जातात. घडलेल्या प्रसंगांची स्मृतीही बुजली जाते. अकाली वैधव्य आलेली मृदुला शाळेत नोकरी करू लागते. शाळेसाठी देणगी गोळा करण्या-साठी हिंडणारी मृदुला बॅ. शिरवाडकरांच्या दारात उभी राहते. नवीन प्रकरणाची परिणती विवाहामध्ये होते.

मुलांसाठी झिजणारी मृदुला स्वतःच्या सुखासाठी लग्न करते. आणि लग्नाच्या पहिल्याच रात्री बॅ. शिरवाडकरांकडून सूडाच्या कल्पनेचा आघात होतो. निपुत्रिक धनवानाच्या मांडीवर दत्तक गेलेला मुकुंद खिरे हे बॅरिस्टर शिरवाडकरच होते. दाराशी आलेल्या मृदुलेला अचूक ओळखून बॅ. शिरवाडकर सूडाचे जाळे विणतात आणि मृदुला या जाळ्यात अलगद येऊन पडते.

सूडाच्या पाशवी कल्पनेने पछाडलेले बॅ. शिरवाडकर मृदुलाला आपल्या पाशवी अत्याचारांनी असंख्य यातना देतात.

सूडाचे हे अखंड चक्र थांबवण्याच्या एकमेव मार्गाकडे नाटककार वळतो. मृदुलेला दिवस जातात. सूडाच्या जागी प्रेमाचा ओलावा निर्माण होतो. या सुखद पार्श्व-भूमीवर नाटकाचा तिसरा अंक संपतो.

नाटकामध्ये राधिकाबाई व त्यांचा मुलगा यशवंत श्रीकांत मोघे यांना महत्त्वपूर्ण स्थान असले तरी कथानक सांगताना त्यांना सहेतुक दूर ठेवले आहे. मनोविश्लेषणात्मक पार्श्वभूमी असलेल्या कथानकामध्ये या दोघांना स्थान नाही. परंतु नाटकामध्ये 'रहस्याचा मसाला' भरण्यामध्ये मात्र या दोघांना व विशेषतः, यशवंताला महत्त्व-पूर्ण स्थान आहे. अर्थात यशवंताचे व्यक्तिचित्रण हाही महत्त्वपूर्ण भाग असला तरी मूळ कथावस्तूशी त्याचा फारसा संबंध नसल्यामुळे त्याचा स्वतंत्रपणे विचार करता येणार नाही. राधिकाबाई व यशवंत यांना नाटकामध्ये तुलनात्मकदृष्ट्या गौण स्थान देण्यामध्ये व पहिल्या अंकामध्ये मृदुला व बॅ. शिरवाडकर यांच्यावर लक्ष केंद्रित करण्यामध्ये श्री. पारखी यशस्वी झाले आहेत.

अंकाच्या क्रमाने नाटकाचा विचार करता पहिला अंक प्रेक्षकांची पकड घेतो. घडणाऱ्या घटनांची चाहूल लागत असली तरी प्रेक्षकांची उत्सुकता कायम राहते. मात्र तोतऱ्या पोस्टमनला बळेच बोलका करून थोडा फार विरस केला आहे.

दुसऱ्या अंकाच्या पूर्वार्धामध्ये (यशवंत प्रवेश करीपर्यंत) विजया खोटे व दत्ता भट यांचा प्रभावी अभिनय व पारखींची नीटस बांधणी यांचे आकर्षक प्रत्यंतर पाहावयास मिळते.

बॅ. शिरवाडकरांचा खून करण्याच्या हेतूने यशवंताचे येणे, परंतु त्यांचा मृत्यू ही आत्महत्या आहे असे भासवण्याचा प्रयत्न करणे, या बेताची कल्पना असलेल्या धूर्त शिरवाडकरांनी आपली सुटका करून घेणे एवढ्या घटना घडण्यास पारखींनी फार वाव दिला आहे. त्यामुळेच दुसऱ्या अंकाच्या शेवटी प्रेक्षक काहीसा नाराज होतो. या अंकाच्या उत्तरार्धात यशवंताला अवास्तव महत्त्व दिलेले आहे. श्रीकांत मोघे त्याचा पुरेपूर लाभ उठवतात हा भाग वेगळा.

मृदुलेला दिवस गेल्याची कल्पना ही याच अंकाच्या अखेरीस येते. मृदुला–शिरवाडकर कथानक वास्तविक येथेच संपते. राधिकाबाई आणि यशवंत यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्यास वाव देण्यासाठी तिसरा अंक आहे असे वाटते.

बाईंवरील अपार श्रद्धेपोटी सर्वस्वाचे बलिदान करणारा यशवंत तिसऱ्या अंकामध्ये प्रेक्षकांच्या मनामध्ये ठसतो.

प्रेमविवाह करून दोन मुलांची माता असलेली मृदुला पुर्नविवाह करण्यास धजावणे शक्य आहे काय ? ही शंका काहींच्या मनामध्ये निर्माण झाली तरी एकटेपणाची पोकळी भरून काढण्यासाठी नवीन प्रेमाचा आधार घेणारी मृदुला एकदा मान्य केल्यावर मात्र नाटककाराने मृदुलेची कहाणी नाट्यपूर्ण व बऱ्हंशी तर्कशुद्ध पद्धतीने सांगितली आहे, हे मान्य करावे लागते.

ज्या परिस्थितीतून होरपळून निघाल्यामुळे बॅ. शिरवाडकर सूडाच्या भावनेने प्रेरित होतात, त्या परिस्थितीला मृदुला सर्वस्वी जबाबदार असल्याने काही काळ-तरी प्रेक्षकांची सहानूभूती निर्विवादपणे शिरवाडकरांना मिळते. मृदुला व शिरवाडकर यांची भेट, यशवंत व बॅ. शिरवाडकर यांचे वडील एकच असणे, या घटनांना योगायोगाचा आधार आहे.

पारखींच्या या नाटकाला, त्यातील दोष झाकून प्रायोगिक यश देण्यामध्ये दिग्द-र्शिका विजया खोटे या मोठ्या प्रमाणात यशस्वी झाल्या आहेत.

नाट्यनिर्मितीची बाजूही समाधानकारक आहे. मृदुलेचा पहिला पती रसिक कलाकार असावा, अशी खात्री पहिल्या अंकातील नेपथ्य पटवून देते. प्रत्यक्ष मांडणीमध्ये फारसा बदल न करताही बॅ. शिरवाडकरांच्या सूडामुळे घराचे बदललेले स्वरूप त्यांनी अचूकपणे दाखवले आहे.

नाव आणि नाट्यकृती यांचा सुरेख मेळ प्रदीर्घ काळानंतर पारखींच्या नाटकात पाहावयास मिळाला. विशिष्ट प्रेक्षकवर्गाला रुचणारे नाटक असल्यामुळे व रिपीट् ऑडिअन्स मिळण्याची शक्यता अत्यल्प असल्याने प्रयोग समाधानकारक होऊनही नाटकाच्या आर्थिक यशाबद्दल मात्र साशंकता वाटते.

रवीन्द्र गुर्जर

‘ नाट्यभारती ’

इन्दोर

# कारकून

‘ इन्दूरची पुण्यावर स्वारी ’ अशी जाहिरात परवा वर्तमानपत्रात पाहिली. पुण्याच्या रंगभूमीवर स्वारी ही जरा धाडसाचीच गोष्ट नव्हे काय ? (अर्थात हा सगळा कंत्राटदाराचा ‘ चावटपणा ’ असला म्हणून काय झाले ! ) मोठ्या काळजीने मी जातीने हजर राहिलो. पण विशेष गोष्ट म्हणजे श्री. बाबा डिके यांचा ‘ कारकून ’ पाहून ‘ धन्य मी कृतार्थ मी ’ अशी स्थिती झाली. प्रयोग सर्व दृष्टींनी अप्रतीम झाला. पहिला अंक चालू झाल्यावर अचानक लक्षात आले, की हे तर सर्व आपल्याच घरातले प्रसंग ! आजूबाजूला व पुढेमागे बघतो तर प्रत्येकाला तसेच वाटत होते.

उत्तम लेखक हा उत्तम नट–दिग्दर्शक असणे हा ‘ अलभ्य ’ योग आहे. एका हाताच्या बोटांवर फारतर मोजता येतील, इतकी नावे घेता येतील. श्री. बाबा डिके यांचे हे नाटक अत्यंत प्रभावी आहे. मध्यमवर्गाच्या घरोघर घडणाऱ्या सुखदु:खाचे प्रसंग जसेच्या तसे यात दिसून येतील. कारकून ‘ जमाती ’पैकीच एकाची–फक्त ज्याला लाचलुचपतींचे पथ्य आहे, अशाची–ही कथा आहे. अशा लोकांची जगाच्या दृष्टीने किंमत शून्य. स्वतः लेखकाच्या पंतांच्या भूमिकेला तोड नाही. त्याला ‘ वेणू आक्कां ’च्या भूमिकेत सुमन धर्माधिकारी यांची मिळालेली जोड स्तुतीच्या पली-कडील आहे. दोघांच्याही भूमिका समजून उमजून, समरसतेने व सफलतेने वठल्या आहेत. परीक्षणात हे तिन्ही ‘ स ’कार क्वचितच येतात. इतर सर्वांच्या भूमिकाही उजव्या झाल्या. त्यातल्या त्यात गायतोंडे (दीनानाथ होळकर), दिवटे (गोविंद धर्माधिकारी) व गंपू (श्रीपाद देशपांडे) चमकून जातात. दोष काढण्यास वाव नाही असे हे बऱ्याच वर्षांनंतर पाहिलेले नाटक आहे. पहिला अंक मात्र थोडासा मोठा वाटतो.

वास्तविक, हा पुण्यातला दुसरा प्रयोग होता. मुंबईच्या नाट्यमहोत्सवात बक्षिस-पात्र ठरलेले हे नाटक आहे. तरीही पुणेकरांकडून म्हणावी तशी याला दाद मिळा-लेली नाही. रसिक पुणेकरांकडून आपल्या नाटकाचे कौतुक व्हावे म्हणून आपल्या-पैकीच असलेली पण महाराष्ट्रापासून दूर राहून नाट्यकलेची सेवा बजावणाऱ्या ‘ नाट्यभारती ’च्या पदरी निराशा पडावी ही चांगली गोष्ट नाही. इथले प्रेक्षक ‘ उडदामाजी काळेगोरे ’ निवडू शकतात, असा एक समज आहे. त्याला धक्का लागू नये. केवळ कंपनीच्या व नटांच्या मोठमोठ्या नावांवर आपले प्रेक्षक जात नाहीत ही गोष्ट जर सत्य असेल तर या नाटकाला पुणेकर चांगली दाद देतील अशी आशा आहे.

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ मते नसलेल्या मिशा

मते आणि मिशा यांचा संबंध का जोडण्यात आला, याचा मला अजून पत्ता लागलेला नाही. तसे पाहिले तर माणसाच्या वैचारिक जीवनात केसांचे स्थान काय, याचे उत्तर भिंतीला तुंबड्या लावीत बसलेला एखादा रिकामा न्हावीदेखील देऊ शकणार नाही, अशी माझी 'वालंवाल' खात्री आहे. पण तो संबंध आहे एवढे मात्र नक्की. इंग्लंडच्या इतिहासात तीनशे वर्षांपूर्वी 'कॅव्हेलियर' आणि 'राउंडहेड' (राजपक्ष व लोकपक्ष) असे दोन तट पडले तेव्हा त्यांनी आपला सवता सुभा कसा दाखवला? राजपक्षीयांनी लांबलचक केस वाढवले, तर लोकपक्षीयांनी ते आखूड कापले. आता राजाच्या डोक्याने मुकुटाबरोबर लांब केसांच्या जंगलाचेही ओझे वाहिले पाहिजे, असे कुठल्या राजधर्मात सांगितलेले आहे? तसेच आखूड केस म्हणजे आखूड मते असे समीकरण होऊ शकेल काय?

जे पूर्वीच्या इंग्लंडात तेच आताच्या हिंदुस्थानात. केस नीट विंचरलेला साम्यवादी रस्त्यात भेटला तर तो ओळखताच येणार नाही. कारण डोक्यातले अराजक व डोक्यावरचे अराजक यांचा साम्यवादात घनिष्ट संबंध आहे. क्रांतीच्या लाटेने केसांची घडीदेखील विस्कटली नाही तर देश काय बदलणार?

राजकीय क्षेत्रांतच काय, सामाजिक अन् सांस्कृतिक मतांची आधुनिकताही हल्ली न्हाव्याच्या कार्यावर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, बीटल–छाप झुलपांच्यामुळे जगाकडे काणाडोळा करावा लागल्याखेरीज आपण जगाच्या पुढे आहोत हे सिद्ध होणार नाही, अशी हल्लीच्या अतिनवयुवकांची खात्री आहे. आणि माझ्या मते ती एका अर्थी बरोबरही आहे. कारण, झापडे लावलेला टांग्याचा घोडा हा टांग्यात बसलेल्या माणसांच्या नेहमी पुढेच असणार, नाही का? पण हाय! इंडोनेशियाच्या सेनाधिकाऱ्यांना ही सलून–संस्कृती पटलेली दिसत नाही. उलट त्यांनी या आधुनिकतेचा अगदी केसाने गळा कापण्याचे सत्र आरंभले आहे. परवा वर्तमानपत्रांत वाचले की इंडोनेशियाची राजधानी जकार्ता येथे रस्त्यावरून जाणाऱ्या बीटल–छाप तरुणांना सैनिक पकडतात अन् तेथल्या तेथे त्यांचे डोके भादरतात. काय हा अविचार! वास्तविक पाहता इंडोनेशियातल्या प्रत्येक तरुणाने बीटल–छाप केशरचना केलीच पाहिजे, अशी तेथल्या सेनाधिकाऱ्यांनी सक्ती करावयास हवी. कारण तेथल्या तरुण

वर्गाने सध्याच्या दुर्धर परिस्थितीकडे डोळेझाक करून शांत राहावे, असे सेनाधिकाऱ्यांना वाटत असेल तर बीटल्–छाप केस हेच एकमेव साधन नाही का ?


## ☐ पक्षाच्या बायकोचा प्रश्न

गरीब जीव–जिवाणूदेखील प्रसंगी उलटतात म्हणे. मेंढीने लांडग्यावर अन् गाईने वाघावर हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत असे सांगणारे सांगतात. माझा आतापर्यंत विश्वास बसत नव्हता–पण परवा एक नवरादेखील उलटल्याचे वर्तमानपत्रांत वाचले. तेव्हापासून शेळ्या–मेंढ्या अन् गरीब गाईंच्या प्रासंगिक वीरवृत्तीचे मला आश्चर्य वाटेनासे झाले आहे. इटलीत एक बायको आपल्या नवऱ्याला नेहमी भांडी विसळायला अन् केर काढायला लावायची. पण त्याने अस्मादिकांप्रमाणे जेवणाच्या आधीच मूग गिळून कोपऱ्यातली केरसुणी उचलली काय ? नाही. त्या मर्दाने सरळ कोर्टात फिर्याद केली– " बायको आपला छळ करते; सबब घटस्फोट मिळावा. " कोर्ट म्हणाले, " होय, हा छळच आहे. घटस्फोट मंजूर. " आता बोला ! नवऱ्यासारख्या चुकार पददलित प्राण्यातदेखील असा शूर वीर निघाला हे खरोखरीच कौतुकास्पद नाही का ?

मर्द मराठ्यांच्या महाराष्ट्रात असा वीर केव्हा उपजेल ? तसा तो जन्माला येईपर्यंत आम्ही पामरांना काहीच तरणोपाय नाही काय ? अहो, इटलीत बायको नवऱ्याला केर काढायलाच सांगते, पण आपल्याकडे ती चक्क " माझ्याबरोबर हिंदी सिनेमाला चला, " असे म्हणते. मानसिक छळाची ही पहिली पायरी. कारण सिनेमा पाहून आल्यावर तब्बल आठवडाभर " अय्या, देव आनंद कित्ती कित्ती छान दिसतो, नाही तर. . . . " असे म्हणून वाक्य सूचकपणे अर्धवट सोडण्यात येते. नवरा–छळाच्या अस्सल महाराष्ट्रीय तंत्रात वरची जरा अधिक क्रूर पायरी म्हणजे जेवताना " बरं झालंय की नाही ? " असा प्रश्न. या प्रश्नाचे उत्तर धर्मराजाच्या पक्षाने तरी आपल्या बायकोला नीट देऊन दाखवावे असे आपले आव्हान आहे. ' बरं झालं नाही ' असे म्हणायची अर्थातच टाप नाही. पण ' बरं झालंय ' असे म्हटले की लगेच " म्हणजे चांगलं नाहीच का ? " असा खडा सवाल ! नवऱ्याच्या छळाचा पराकोटीचा निर्घृण प्रकार म्हणजे शॉपिंग. एका बाजूला गळ्यात दोरी बांधलेला मोत्या अन दुसऱ्या बाजूला सुटा सोडलेला नवरा अशा थाटात शॉपिंगसाठी मोकाट सुटलेली बायको कोथिंबिरीच्या काड्या घेता घेता दोन–चार साड्या कशी घेते हे डोके फिरविणारे कोडे ब्रह्मदेवालाही सुटायचे नाही–फक्त त्याच्या बायकोला सुटेल.

●

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



## श्री. गो. जोशी
### सायनाचार्य, नासिक
### दि. २१ ते २७ जानेवारी १९६७

**मेष :–** तुमच्या राशीसमोर मंगळ पवित्र्यात उभा आहे. त्याचे आव्हान स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. तुम्हांला पेचात पकडण्याचा हा शनि-मंगळाचा कटच आहे. पण खात्री बाळगा की, दशमातील रवि-शुक्र हा त्यांचा कट उघडकीस आणतील आणि तुमचा पेचप्रसंग टळेल.

कोणत्याही कामात अपयशाची भीती नाहीच. पण सतत झगडावे लागणार आहे. अशा प्रखर विरोधाच्या समयीच तुमच्यातील जिद्द जागी होते, निर्धार पेटून उठतो.

या काली विरोधकांशी एकदा दोन हात करून सोक्षमोक्ष लावून घ्यावा लागेल. नम्रता, माघार, अपयश हे तुमच्या रक्तातच नाही. तुमचे मंगळाशी हे द्वंद्वयुद्ध सतत १४५ दिवस चालणार आहे. शेवटी विजय तुमचाच.

दि. २३ ते २५ या काली तर हातघाईवर याल.

**वृषभ :–** भाग्यात रवि-शुक्र-बुध, एकादशात शनी आणि षष्ठात मंगळ एवढ्या प्रचंड सामग्रीनिशी आपण रणांगणात उतरला आहात. पहिल्याच हल्ल्यात शत्रू नेस्तनाबूद कराल, निवडणुकीत घवघवीत यश मिळवाल, क्रीडा-कला क्षेत्रांतही नाव कमवाल.

या कालापासून तुम्हांला सतत धावपळीचे कार्यक्रम आखावे लागतील, अनेक सभा गाजवाव्या लागतील. तुमचे वक्तृत्व

शस्त्रापेक्षाही तीक्ष्ण असल्याचा प्रत्यय क्षणोक्षणी येईल. तुमच्या हल्ल्यांनी शत्रू बेजार होईल.

हा काल स्वास्थ्याचा नव्हे. पण अपयशाचा खास नाही. या काली मोठाले लाभ होतील, अशी अपेक्षा मुळीच करू नका. पण अपेक्षेपेक्षाही फार मोठी प्रतिष्ठा लाभेल. बदली-बढतीचे योग येतील. तुम्हांपैकी काहींना परदेशी जाण्याचेही भाग्य लाभावे.

दि. २४ ते २७ या काली बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हाव्यात.

**मिथुन** :– चौथ्या मंगळाची डोकेदुखी एकदाची थांबली. आता शांत विचाराने, प्रसन्न मनाने नव्या प्रभावी योजना आखण्यास अवसर मिळेल.

तुमच्या साऱ्या स्थगित कार्यांना गती मिळेल. रात्रीचा दिवस करून असंख्य कामाचे डोंगर उपसले जातील. निर्मळ स्वास्थ्याचा आणि घवघवीत यशाचा हा काल नसला तरी पूर्वीप्रमाणे माघार, अवमान, नैराश्य असले प्रसंग कधीच उद्भवणार नाहीत. वैचारिक संघर्ष मिटू लागतील. विरोधी गटांशी दिलजमाई झाल्यामुळे, निवडणुकीत सर्वसाधारण यश तरी आपण मिळवूच अशी खात्री वाटायला लागेल. काही काळ नम्रता, लीनता यांचे धडे गिरवावे लागतील. वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल. थोरांचे चिरंतन सहकार्य लाभेल.

दि. २३ ते २५ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**कर्क** :– चौथा मंगळ म्हणजे सारेच मुसळ केरात असेच काही नसले तरी हे दिवस अटीतटीचे आहेत एवढे खास; गुरूसारखा महान ग्रह आपल्या पाठीशी उभा आहे या भरंवशावर जाऊ नका. चौथा मंगळ तुम्हांला केव्हा तोंडघशी पाडील याचा नेमच नाही. पैशाअडक्याची चणचण तीव्रतेने जाणवू लागेल. स्थावराचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करील, निवडणुकीचे क्षेत्र क्षणाक्षणाला रंग पालटू लागेल. या वेळी आपणांस प्रकृतीबद्दल अधिक जपायला हवे. कामाचे प्रचंड डोंगर उलंडून टाकायचे आहेत. या वेळी आरोग्य नरम गरम राहून कसे भागेल? दूरच्या प्रवासाचे टाळा. न पेलण्यासारख्या जबाबदाऱ्या उचलायला प्रवृत्त होऊ नका.

दि. २१-२२-२६-२७ काहीसे यश याच काली लाभावे.

**सिंह** :– तृतीयस्थ मंगळाच्या सहकार्यामुळे तुमचे कर्तृत्व धारदार बनेल. आता या आठवड्यापासून तुमच्या सिंहगर्जनांनी दशदिशा दणाणून जातील. गुरु-शनीच्या प्रतिकूलतेची तमा न बाळगता तुम्ही पुढे पाऊल टाकलेत तर विजयावर विजय मिळवाल. क्रीडाक्षेत्रात तर जागतिक विक्रम संपादू शकाल.

स्थित्यंतर, बदल, नवे कार्यक्षेत्र हस्तगत करणे यांपैकी काहीही घडू शकेल. राजकीय क्षेत्रातील तुमचा आवाज ऐकून विरोधी गट गर्भगळीत बनेल. पराक्रमातील मंगळाचे वास्तव्य चांगले पाच महिन्यांचे आहे. या कालखंडात भव्य-दिव्य-नेत्रदीपक असे काही करून दाखवाल. याच कालापासून तुमच्या प्रतिष्ठेत फार मोठी भर पडेल.

दि. २३ ते २५ अनेक संस्मरणीय चांगल्या घटना या वेळीच घडाव्यात.

**कन्या** :– तुमच्या राशीतून मंगळाचे उच्चाटन झालेलेच आहे. आता तुमच्या प्रगतीच्या आड येण्याचे धाडस सहसा कोणी करू शकणार नाही. अकराव्या गुरूचे मांगल्य आताच प्रकटेल आणि सूर्य-हर्षल त्रिकोणाचे आगळे माहात्म्य येथूनच प्रत्ययास यायला लागेल. हा साराच आठवडा अनेक अनन्यसाधारण प्रगतिकारक घटनांनी भरलेला जाणवेल. दूरचा प्रवास घडेल, कौटुंबिक मंगलकार्यात भाग घ्यावा लागेल. हेवा करावा असे समाजातील अत्युच्च मानाचे स्थान लाभेल.

निवडणुकीचा रागरंग अनुकूल दिसू लागेल. आगामी भारतीय निवडणुकीत घवघवीत यश हीच अकराव्या गुरूची चिरंतन देणगी. या गुरुमुळेच तुमच्या जीवनात एक नवा अध्याय लिहिला जाणार आहे.

दि. २४ ते २७ या कालखंडातील प्रत्येक दिवस विशेष यश देणारा जाणवेल.

**तूळ** :– मंगळ तुमच्या राशीत आल्यापासून सांपत्तिक पेचप्रसंग सुटू लागले तरी स्वास्थ्य हरवल्यासारखे वाटू लागेल. मनात अनंत बऱ्यावाईट विचारांचे तुफान उठेल, चित्तवृत्ती अप्रसन्न बनेल, नेमके काय केले म्हणजे सुखासमाधानाने जगता येईल, हे कळनासे होईल.

पण,व्यावहारिक बाजू खंबीर बनेल, अनेक नव्या योजना आकार घ्यायला लागतील. तुमच्या असाधारण कर्तृत्वाकडे पाहून समाज तुमच्याकडे आदराने व कौतुकाने पाहू लागेल. मंगळ अनिष्ट असला तरी गुरू तुमची पाठराखण सदैव करीत असल्यामुळे वैचारिक कोलाहलाखेरीज अन्य त्रास कोणताच होऊ शकणार नाही. पैसा अमाप हाती येईल पण खर्चही सहस्र पटीने वाटू लागेल. तुम्हांला स्वास्थ्य हवे असेल तर निवडणुकीच्या दंगलीत शिरू नका.

दि. २४ ते २७ या काली अनेक गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडून याव्यात.

**वृश्चिक** :– एकटया मंगळाखेरीज बाकीचे सारे ग्रह तुमच्या बाजूला उभे आहेत. एखादी गोष्ट तुम्ही मनात आणायचा अवकाश की ती अपेक्षेप्रमाणे घडून आलीच म्हणून समजावे. रवि-शुक्र पराक्रमात आल्यापासून तर चैतन्य रोमारोमांतून सळसळत आहे याची अनुभूती येत असेल. गुरू तर तुमच्यावर निहायत खूष आहे.

कर्तृत्वाची धार अधिक तीक्ष्ण बनेल. भाग्याला उधाण येईल, दाही दिशा तुमच्या स्वागताला सिद्ध आहेत, असे दृश्य पावलोपावली दिसू लागेल. तुमच्या असीम महात्मतेचा सर्वत्र गौरव होऊ लागेल आणि निवडणुकीच्या राजकारणात विक्रमी यश लाभू शकेल. नोकरीधंद्यातही अनेक उच्चांक गाठू शकाल. धनोत्पादनाचे नवे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. दि. २५ ते २७ या कालाचे महत्त्व अनन्यसाधारण जाणवेल.

**धनू** :– ग्रहस्थिती अनुकूल बनू लागल्याचा प्रत्यय या आठवडयापासूनच यायला लागेल. दबलेला आवाज उठेल याच कालात. आजवर खूप धडपड करूनही जी कामे यशस्वी होत नव्हती ती सारी कामे घवघवीत यश घेऊन उठतील याच

आगामी ४–५ दिवसांत. तुमचा अनिष्ट काल संपल्यासारखाच आहे.

निवडणुकीची धमाल मात्र तुम्हांला मानवण्यासारखी नाही. त्या क्षेत्रापासून चार हात दूरच राहा. धावपळ, धडपड वाया जाईल आणि पदरात नामुष्की पडेल.

फक्त आकार घेऊ लागेल व्यावहारिक बाजूच. कोणत्याही सामाजिक, राजकीय क्षेत्राशी संबंध ठेवला नाहीत तर तुमच्यासारखा सुखी प्राणी दुसरा नाही.

दि. २२ ते २५ काही गोष्टी अपेक्षेप्रमाणे घडाव्यात.

**मकर :–** सूर्य-शनी-मंगळ या ग्रहांची बैठकच अशी आहे की, तुमच्याकडे पाहून कुणीही हेवा करावा. हे सारे ग्रह तुम्हांला हवं ते द्यायला कटिबद्ध आहेत. परमेश्वरी कृपा किंवा ग्रहांची अनुकूलता म्हणतात ती यालाच !

सहज पाऊल टाकावे आणि ते पवित्र्यातच पडावे, मनात आणावे आणि ते विनासायासाने घडून यावे, या साऱ्या गोष्टींचा हातोहात प्रत्यय याच वेळी यावा.

समाज तुमच्यावर स्तुतिसुमनांची उधळण करील, अधिकारी तुमच्यावर निहायत खूष होतील. पैसा खूप मिळेल, प्रतिष्ठा उंचावेल, प्रज्ञा विकसेल. इतका चांगला काल यापूर्वी आपण क्वचितच अनुभवलेला असेल. या वेळच्या अनन्यसाधारण यशात सिंहाचा वाटा भाग्यस्थ हर्षलचाच. दि. २२–२३–२६–२७ अपेक्षासाफल्याचा काल.

**कुंभ :–** मंगळ भाग्यात आला आणि तुमचा साराच नूर पालटून गेला. चेहरे प्रसन्न दिसू लागतील. अंगीकृत कार्ये गती घेऊ लागतील. तुमच्या आजवरच्या खडतर तपस्येची फलश्रुती याच वेळी लाभावी. आगामी ८–१५ दिवस खूपच धावपळीचे व घाईगर्दीचे जातील. या वेळी आपणांस अनंत कामे हातावेगळी करावी लागतील. नोकरीधंद्याचा प्रश्न अपेक्षेप्रमाणे सुटेल, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल राजकीय संघर्ष मिटतील, विरोधकांशी दिलजमाई होईल.

साहित्य–कला क्षेत्रांतही तुमचे सत्कार झडू लागतील. वृत्तपत्रीय प्रसिद्धी फार मोठ्या प्रमाणावर लाभेल आणि अपेक्षेप्रमाणे साऱ्या गोष्टी घडून यायला लागतील.

दि. २४ ते २७ या काली प्रगतीला पोषक घटना घडू लागतील.

**मीन :–** रवी–शुक्र–बुध एकादशात. इतके चांगले ग्रह एकादशात येणे असे क्वचित घडते आणि म्हणूनच हा काल अनन्यसाधारण प्रगतीचा व अनपेक्षित लाभ देणारा जाणवतो. मंगळ अष्टमात आला असला तरी लाभस्थ ग्रहांचे माहात्म्य कमी ठरणार नाहीच. आगामी १५–२० दिवसांच्या कालखंडात कधी मिळाले नाही एवढे घवघवीत यश तुमच्या पदरी पडू शकेल.

निवडणुकीचे तंत्र जरी आपणांस जमले नाही तरी औद्योगिक क्षेत्रात तुम्ही निश्चित नाव काढाल. आपल्या व्यावसायिक क्षेत्रात महान् क्रान्ती-उत्क्रांती घडवून आणावी अशीच या ग्रहांची आंतरिक इच्छा दिसते. कौटुंबिक मंगलकार्ये थाटात पार पडतील. अनेक जिवाभावाचे नवे स्नेहसंबंध जुळून यायला लागतील.

दि. २५–२६–२७ सर्वोत्तम यशाचे दिवस.

●

# विरोधकांचा बालेकिल्ला, पुणे

[पृष्ठ २३ वरून]

आलेल्या मुळशी मतदारसंघात कोणत्याही विरोधी पक्षाचे काडीचेही वजन नाही. उलट काँग्रेसचे कार्य तेथे जबरदस्त आहे. मामासाहेब मोहोळांसारखे काँग्रेसचे मातब्बर उमेदवार या मतदारसंघातून विधानसभेसाठी उभे आहेत. त्यामुळे केवळ मुळशी तालुक्यातच काँग्रेसच्या लोकसभा उमेदवाराला एकदम फार मोठी आघाडी मिळणार आहे.

**बहुसंख्य विरोधी मत**

पण एवढी एक बाब सोडली तर इतर सर्व गोष्टी श्री. एस्. एम्. जोशी यांच्या जमेच्याच बाजूच्या आहेत. पहिली १९५२ ची सार्वत्रिक निवडणूक सोडल्यास बाकी दोन्ही सार्वत्रिक निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांचे एकूण मत पुणे लोकसभा मतदारसंघामध्ये काँग्रेसच्या मतापेक्षा जास्तच होते. १९५२ साली कै. काकासाहेब गाडगीळ या मतदारसंघातून १ लाख ४० हजार मते पडून निवडून आले. त्या वेळी एकूण विरोधी मते १ लक्ष ८ हजार होती. (श्री. एस्. एम्. जोशी ४४ हजार व केशवराव जेधे ६४ हजार!) पण १९५७ साली संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी श्री. ना. ग. गोरे आणि कै. गाडगीळ असा सरळ सामना झाला, तेव्हा श्री. गोरे यांना १ लाख ४३ हजार आणि कै. गाडगीळांना ९९ हजार ५८६ मते पडली होती. तसेच १९६२ साली कै. शंकरराव मोरे १,१५,४०२ मते मिळवून विजयी झाले. तेव्हा एकूण विरोधी मते १,५२,६१३ होती (गोरे : ६६,९९६, अत्रे ५८,८६२ आणि जगन्नाथराव जोशी २६,७५५).

तेव्हा पुणे लोकसभा मतदारसंघातून विधानसभेसाठी जरी काँग्रेसचे उमेदवार निवडून जात असले तरी बहुसंख्य लोक वरचे मत विरोधी उमेदवारालाच देतात हे यावरून स्पष्ट होते.

या मतदारसंघातील लोकसभेचे विरोधी मत फुटलेले नाही, ही त्यात श्री. जोशी यांना फायद्याची गोष्ट. पण याचा अर्थ १९५७ च्या निवडणुकीत जशी श्री. ना. ग. गोरे यांची सरसकट सरशी झाली तशी श्री. जोशी यांची होईल असा नव्हे. तसेच गेल्या निवडणुकीत फुटलेली सर्व विरोधी मते श्री. जोशी यांना मिळतील, असेही नव्हे. कारण ५७ प्रमाणे सर्व विरोधी मतप्रवाहांना समान असा एकही सर्वव्यापी प्रश्न या निवडणुकीत नाही की ज्यामुळे सारे विरोधी मत एस्. एम्. भोवती गोळा होऊ शकेल. ६२ साली सर्व तऱ्हेच्या विरोधी मतप्रवाहांना आपले मत व्यक्त करण्यासाठी संधी होती. तशी संधी आता नाही.

प्रजासमाजवादी पक्ष आणि जनसंघ यांनी बहुरंगी लढत टाळण्यासाठी लोकसभेसाठी आपला उमेदवार उभा केला नसला तरी त्यांचा एस्. एम्. यांना पूर्ण पाठिंबा आहे, असे नाही. उलट खाली विधानसभेसाठी सदाशिव पेठेत जनसंघाच्या विरो-

धात समितीचा उमेदवार उभा केला म्हणून एस्. एम्. बद्दल नाराजीच आहे.

तेव्हा सर्व विरोधी मते बिनदिक्कतपणे पदरात पडण्याची जरी श्री. जोशी यांना आशा नसली तरी एकूणच बहुसंख्य विरोधी मतांचा त्यांना आधार आहे. शिवाय गेल्या पाच वर्षांतील काँग्रेसच्या कर्तव्यशून्यतेमुळे जनतेत निर्माण झालेला उद्वेग विधानसभांच्या जागांपेक्षा लोकसभा निवडणुकीतच दिसून येतो. त्या दृष्टीनेही विरोधी मतांत निश्चितच वाढ झालेली आहे. तेव्हा हा सामना अटीतटीचा होणार, हे निश्चित.

## अटीतटीची हौस

नाहीतरी असे अटीतटीचे सामने देण्याची, हार जीत सोसण्याची एस्. एम्. यांना सवयच आहे. त्यांचे सारे आयुष्यच झगडण्यात गेले आहे. अन्यायाविरुद्ध टक्कर देण्यात, हालअपेष्टा सोसण्यात, तुरुंगाच्या वाऱ्या करण्यात, स्वपक्षीयांकडून टीका सहन करण्यात त्यांचे सारे जीवन गेले आहे. आणि तरीही त्यांची अखंड ध्येय-निष्ठा, सहृदयता, व्रतस्थ वृत्ती आणि प्रामाणिकपणा कायम राहिला आहे.

बरेचसे लोक एस्. एम्. यांना राजकारणी मानीतच नाहीत. कारण राज-कारणात दुर्गुण ठरणारे हेच त्यांचे सद्‌गुण. एस्. एम्. राजकारणी नाहीत. लोकां-वरील अन्यायाची चीड असलेले, लोककल्याणाची प्रामाणिक पोटतिडीक असलेले, अतिशय निष्कपट, अकृत्रिम मनाचे ते एक थोर कार्यकर्ते आहेत. पण त्यामुळेच त्यांचे असामान्यत्व उजळून उठते. लहानपणापासून अमुक एक गोष्ट स्वतःसाठी करायची असे ठरवून एस्. एम्. कधीच वागले नाहीत. अन्यायाची चीड येऊन त्यासाठी झगडण्याची तळमळ त्यांना जिकडे वाहवत नेईल तिकडे ते वाहवत गेले आणि याचे त्यांना वाईटही वाटत नाही.

या तळमळीमुळेच शालेय जीवनापासूनच त्यांनी राजकारणात उडी घेतली. अतिशय खस्ता खात दारिद्र्यावस्थेतच त्यांनी आपले शिक्षण घेतले. शाळा-कॉलेजांत ते एक हुशार, तरतरीत तसेच हूड विद्यार्थी म्हणून गाजले. काँग्रेस चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला आणि मनाच्या भावनाप्रधानतेने ते समाजवादी चळवळीत ओढले गेले. १९४२ च्या आंदोलनात ते जिवाला धोका पत्करून दोन वर्षे मुस्लिम वेषात भूमिगत होते.

१९५३ साली श्री. बाबासाहेब घोरपडे यांनी पब्लिक सर्व्हिस कमिशनमध्ये जाण्यासाठी आपल्या विधानसभेच्या उमेदवारीचा राजीनामा दिला. त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत याच मतदारसंघातून एस्. एम्. निवडून गेले. १९५७ साली संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी ते शुक्रवार मतदारसंघातून प्रचंड बहु-मताने विधानसभेवर निवडून गेले. विरोधी पक्षनेता म्हणून त्यांनी विधानसभा गाजविली.

एस्. एम्. म्हणतात, " आम्ही लोकशाहीवादी आहोत. पण याचा अर्थ विधान-

सभा किंवा लोकसभा यांचा उपयोग केवळ फोरमसारखाच केला पाहिजे असे नाही. तर जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी या संस्थांचा भरीव उपयोग झाला पाहिजे. त्यासाठी वाटल्यास विधानसभेबाहेरील चळवळीचीही मदत घेतली पाहिजे." (एक्स्ट्रॉ पार्लमेंटरी ॲक्टव्हिटीज़)

## लोकसभेतील उपस्थिती

बरेचसे प्रश्न आपण विधानसभा–लोकसभेमधून सोडवू शकू, असे श्री. एस्. एम्. यांना वाटते. उदाहरणार्थ, ते नरसिंगगिरजी मिल्स् प्रकरणाचा दाखला देतात. ते म्हणतात, "हा प्रश्न सोडविला नाही तर सत्याग्रह करू, असा विधानसभेत आवाज उठविला तेव्हा कुठे सत्याग्रहाशिवाय तो प्रश्न सुटला. तेव्हा नेहमीच प्रत्यक्ष प्रतिकाराच्या चळवळीची आवश्यकता नसते. दुसरं साधन नसेल तरच अशी चळवळ आवश्यक आहे, असे मला वाटते."

आपल्या सुमारे आठ वर्षांच्या आमदारकीच्या काळात एस्. एम्. यांनी अनेक प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविला. हरिजनांवर होत असलेल्या अन्यायासंबंधी त्यांनी मांडलेला तहकुबीचा ठराव, कामगारांचे प्रश्न, प्रीमियर ऑटोमोबाईल्सचे प्रकरण आदी अनेक मोठमोठ्या प्रश्नांत त्यांनी जागरूकता दाखविली. नरसिंगगिरजी मिल्सच्या नव्याने नेमलेल्या बोर्डावर त्यांची नेमणूक झाली होती. तसेच स्टेट फार्मिंग बोर्डावरही त्यांनी काम केले. महाराष्ट्रावर बेळगाव–कारवार बाबतीत होणाऱ्या अन्यायाला दिल्लीत वाचा फोडणारे कुणी नाही. आपण ते काम करू शकू, असे त्यांना वाटते.

आपण लोकसभेत जाण्यासाठी का उत्सुक आहोत हे सांगताना श्री. जोशी म्हणतात, "सध्या आपला देश फार मोठ्या आणीबाणीच्या परिस्थितीतून जात आहे. पुढच्या २–३ वर्षांत महत्त्वाचे निर्णय लागणार आहेत. तेव्हा जर मी देशातील सर्वोच्च अधिकार असलेल्या संस्थेत असलो तर आपल्या स्वातंत्र्याच्या, स्वराज्याच्या कल्पनांशी सुसंगत असं काही करता आलं तर करू शकेन. या वेळी तिथं असणं आवश्यकच आहे. माझ्या शक्तीनुसार योग्य ते मी करीनच."

१९५२ साली एस्. एम्. यांनी मतदारसंघात पराभव पत्करला होता पण त्यामुळे ते हटले नव्हते. पुण्यामध्ये एस्. एम्. यांना ओळखत नाही असा माणूस नाही. त्यांचे कार्य, त्यांची निष्ठा आणि त्यांचा प्रामाणिकपणा सर्वमान्य आहे. म्हणूनच त्यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती निमित्त काढलेल्या गौरव-ग्रंथात श्री स. का. पाटील यांच्यापासून तो विनोबांपर्यंत सर्वांच्या शुभेच्छा येतात. येत्या सार्वत्रिक निवडणुकीत जनतेच्या त्यांच्याबद्दलच्या शुभेच्छा किती फलद्रूप होतात हे बघायचे.

●

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं




मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९, नारायण पेठ, पुणे २

MANOOS (Weekly) 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर